# नवी मुंबई महानगरपालिका

# शहर आपत्ती व्यवस्थापन



## आराखडा -१

# तात्काळ कृती केंद्र

## टोल फ्री नंबर : १८००२२२३०९ / ३१०

| नियंत्रण कक्ष स्थळ | दूरध्वनी क्रमांक | संबंधित अधिकाऱ्याचे नाव | |
|---|---|---|---|
| **तळ मजला, नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय** | २७५६७०६०<br>२७५६७०६१<br>२७५६७८९०<br>(फॅक्स) | **श्री. सुनिल ठाकूर**<br>(समन्वय अधिकारी) | ९८२०००८२५१ |

## नियंत्रण कक्षाची माहिती

| विभाग | नियंत्रण कक्ष | दूरध्वनी क्रमांक | संबंधित अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|---|---|
| सी.बी.डी बेलापूर | सी.बी.डी अग्निशमन केंद्र | २७५७२१११ | श्री. शिवराम ढुमणे<br>सहा. केंद्र अधिकारी<br>९३२१३४२००७ |
| नेरुळ | नेरुळ - अग्निशमन केंद्र | २७७०७१०१ | श्री. ए.डी. बोराडे<br>सहा. केंद्र अधिकारी<br>९८६९४८०३६८ |
| सानपाडा / वाशी / तुर्भे/ कापरखैरणे | वाशी-मध्यवर्ती अग्निशमन केंद्र | २७८९४८००<br>२७८९५९०० | श्री. व्ही. बी. म्हात्रे<br>सहा. केंद्र अधिकारी<br>९८६९००७८८० |
| घणसोली/ ऐरोली/दिघा | ऐरोली - अग्निशमन केंद्र | २७७९२४००<br>२७७९५२०० | श्री. ए. आर. पवार<br>सहा. केंद्र अधिकारी<br>९७०२७५६७०६ |

# महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन योजना

# नवी मुंबई महानगरपालिका

# शहर आपत्ती व्यवस्थापन

# आराखडा - १

## धोका निर्धारण व नंतरची कार्यवाही

## २०१५

# अनुक्रमणिका

## प्रास्ताविक


१.१ स्थान १
१.२ क्षेत्र आणि विभागणी १
१.३ ठळक प्राकृतिक वैशिष्ट्ये आणि जमीन वापराचे स्वरूप २
१.३.१ मृदा २
१.३.२ भूशास्त्र आणि भूरूपिकी २
१.३.२.१ नवी मुंबई महानगर पालिका मुख्य भूप्रदेश ३
१.४ हवामान व पर्जन्यमान ३
१.५ सामाजिक - आर्थिक वैशिष्ट्ये ३
१.५.१ जनसांख्यिकी वैशिष्ट्ये ४
१.५.२ ऐतिहासिक, धार्मिक आणि पर्यटन स्थळे ४
१.६ वीजकेंद्रे / विद्युत संयंत्रे (प्रापण केंद्र) ४
१.७ पाणीपुरवठा व स्वच्छता ५
१.८ झोपडपट्ट्या ५
१.९ अर्थव्यवस्था व औद्योगिकीकरण ५
१.१० वाहतूक आणि दळणवळण यंत्रणा ६
१.१०.१ भूपृष्ठ वाहतूक ६
१.१०.२ परगावचा प्रवास ७
१.१०.३ जलमार्ग ७
१.१०.४ हवाई वाहतूक ........................................... ७
१.१०.५ वाहतूक यंत्रणेचा तपशील ................................. ७
**२. धोका निर्धारण आणि असुरक्षितता विश्लेषण** ......................... ८
२.१ असुरक्षित वसाहती ............................................ १०
२.२ पूर ........................................................ १०
२.३ आगी ....................................................... ११
२.४ भूकंप आणि घरे कोसळणे ...................................... १२
२.५ भूस्खलन .................................................... १२

२.६ रस्त्यांवरील अपघात ........................................ १३
२.७ औद्योगिक व रासायनिक अपघात ........................................ १३
२.८ चक्रीवादळे ........................................ १५
२.९ दंगे ........................................ १५
२.१० त्सुनामी ........................................ १५
**३. तीव्रता कमी करण्याचे तंत्र ........................................ १६**

३.१ आपत्तीसंबंधातील सिध्दता ........................................ १८
३.२ आपत्तीची तीव्रता कमी करणे ........................................ १८
३.३ तीव्रता कमी करण्याच्या कार्यतंत्राची उद्दिष्टे ........................................ १८
**४. नवी मुंबईसाठी तीव्रता कमी करण्याच्या उपाययोजना ................ १९**

**४.१ पायाभूत सोयींची सुधारणा ........................................ २१**
४.१.१ पायाभूत सोयींमध्ये सुधारणा ........................................ २१
४.१.२ सेवा आणि संबंधित पायाभूत सोयी ........................................ २३
४.१.३ गृहनिर्माण विषयक पायाभूत सोयी ........................................ २५
**४.२ संदेशवहन आणि सार्वजनिक माहिती यंत्रणा ................ २६**
४.२.१ बिनतारी संदेशवहन ........................................ २६
४.२.२ माहितीपत्रक ........................................ २६
४.२.३ लोकल गाड्यांमधील जनसंबोधन यंत्रणा ........................................ २६
४.२.४ रेल्वेस्थानके आणि बसस्थानके येथील जनसंबोधन यंत्रणा ..... २६
४.२.५ केबल टी.व्ही. नेटवर्क ........................................ २७
४.२.६ जागतिक माहिती सेवा ........................................ २७
४.२.७ आकाशवाणी सेवा ........................................ २७
**४.३ जमीन वापराविषयक धोरण व नियोजन ................ २७**
४.३.१ सुरक्षित जागी स्थलांतर ........................................ २७
४.३.२ जमीन भरावाच्या जागांची सुधारणा व संरक्षण ............... २७
४.३.३ भराव टाकून जमिनीचे पुन:प्रारण करण्यावर नियंत्रण ........ २७
४.३.४ साठवण करणारी व धोकादायक युनिटे निवासी क्षेत्रांतून अन्यत्र ...
हलविणे ........................................ २८

४.३.५ दाटी कमी करणे ........................................ २८

५. **समन्वय यंत्रणांची आवश्यकता** २९

५.१ नवी मुंबईची खास वैशिष्ट्ये ........................................ ३०

६. **संस्थात्मक स्वरूपाच्या व्यवस्था ........................................ ३२**

६.१ नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापक समिती ........................................ ३४

६.२ नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन समितीची कामे ........................................ ३५

६.३ नवी मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापक ........................................ ३६

७. **नियंत्रणकक्षांची कामे ........................................ ४०**

७.१ पोलिस नियंत्रणकक्ष ........................................ ४०

७.२ नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्ष ........................................ ४०

७.३ अग्निशमनदल नियंत्रण कक्ष ........................................ ४२

७.४ रेल्वे नियंत्रण कक्ष ........................................ ४२

७.५ ठाणे जिल्हा नियंत्रण कक्ष ........................................ ४२

७.६ आपत्तीच्या काळातील आरोग्यविषयक कामे ........................................ ४३

७.७ नागरी संरक्षण नियंत्रण कक्ष ........................................ ४३

७.८ सेनादल नियंत्रण कक्ष ........................................ ४३

८. **अशासकीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था ........................................ ४५**

८.१ सामुहिक सिध्दतेस उत्तेजन देणे ........................................ ४७

८.२ परस्पर सहाय्य आणि साधनस्त्रोत गट ........................................ ४८

८.३ सामुहिक सहभागाचे क्षेत्र ........................................ ४९

८.३.१ स्थलांतर करताना ........................................ ४९

८.३.२ आपत्तीच्या वेळी ........................................ ४९

८.३.३ मदतकार्य व पुनर्वसन करतेवेळी ........................................ ५०

९. **अहवालविषयक नमुने ........................................ ५१**

९.१ सद्यस्थिती आणि करण्यात आलेली ........................................ ५३
कार्यवाही यावरील एकत्रित अहवाल

९.२ पालिका आयुक्त (क्षेत्र) यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात .. ५५
आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल

९.३ पोलिसदलासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली ............. ५७
कार्यवाही यासंबंधीचा अहवाल.
९.४ सहाय्यक पोलिस आयुक्त (वाहतूक), यांच्यासाठी .............. ५८
सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल .........
९.५अग्निशमनदल अधिकाऱ्यांसाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली ६०
कार्यवाही यासंबंधीचाअहवाल
९.६वैद्यकीय सहाय्य विषयक कामांसाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली
कार्यवाही यासंबंधीचा अहवाल ...................................... ६१
९.७रेल्वेस्थानक प्रबंधक यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली ...
कार्यवाही यासंबंधीचा अहवाल ...................................... ६२
९.८नवी मुंबई महानगरपालिका परिवहन (एनएमएमटी / बीईएसटी) यांच्यासाठी
सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल. ... ६४
१०. **सामुहिक शिक्षणाद्वारे योजनेचा प्रसार** ......................... **६६**
११. **प्रभाग स्तरावरील अनुकृती (रिस्पॉन्स) योजना** ............... **६८**
११.१पालिका उपआयुक्त (परिमंडळ) यांच्या जबाबदाऱ्या ........... ७०
११.२आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्भवल्यानंतर विभाग ....
क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या .................................... ७१
११.३विभाग अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या ............................ ७१
११.४आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्भल्यानंतर पोलिस .....
उपआयुक्त / सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्या जबाबदाऱ्या ......... ७२
११.५आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्भल्यानंतर सहाय्यक ...
पोलिस आयुक्त (वाहतूक) यांच्या जबाबदाऱ्या ....................... ७३
११.६आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्भल्यानंतर अग्निशमन .
दल अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या ...................................... ७४
११.७आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्भवल्यानंतर वैद्यकीय ..
अधिकारी (अपघात) यांच्या जबाबदाऱ्या ............................ ७४
११.८आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्भल्यानंतर किंवा ती ...
उद्भल्यानंतर रेल्वेस्थानक प्रबंधक यांच्या जबाबदाऱ्या ................ ७५

११.९आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर व्यवस्थापक एनएमएमटी (नवी मुंबई महानगर पालिका परिवहन सेवा/ सहाय्यक आगार व्यवस्थापक बीईएसटी यांच्या जबाबदाऱ्या) .......................... ७५
११.१० आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उपकेंद्र अभियंता यांच्या जबाबदाऱ्या ७६ ...
११.११ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर महानगर टेलिफोन निगम लिमिटेड यांच्या क्षेत्र प्रबंधकाच्या जबाबदाऱ्या ........ ७६
११.१२ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक ............ अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या ........................................ ७६
११.१३ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्याच्या ..... जबाबदाऱ्या. ...................................... ७७
११.१४ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात शिधावाटप .. अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या. ...................................... ७७
११.१५ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात ............ महाव्यवस्थापक, सिडको यांच्या जबाबदाऱ्या. ......................... ७७
११.१६ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात उपप्रादेशिक. परिवहन अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या. ............................... ७८
११.१७ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात पुढील कामे . करणे ही कमांडट यांची जबाबदारी असेल. ............................ ७८
११.१८ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर .. उपनियंत्रक, नागरी संरक्षण यांच्या जबाबदाऱ्या ...................... ७८

# १. प्रास्ताविक

## १.१ स्थान

नवी मुंबई महानगरपालिकेचे क्षेत्र हे ठाणे जिल्हा या एका महसुली जिल्हयातून गठीत करण्यात आलेले असून, नवी मुंबई ही भागश: औद्योगिक आणि भागश: नागरी वसाहत आहे. १८° आणि १९° या उत्तरे कडील अक्षांशामध्ये आणि ७०° आणि ७३° या पूर्वकडील रेखाशांमध्ये वसलेले आहे. तिची पूर्व पश्चिम लांबी ५ किलोमीटर इतकी असून ती सर्वाधिक रुंद आहे, आणि तिची दक्षिणोत्तर लांबी सुमारे २५ किलोमीटर इतकी आहे.

औद्योगिक दृष्टया सांगायचे झाल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेचे क्षेत्र हा पारसिक हिल्सच्या टेकड्या आणि काहीसा विस्तीर्ण उपसागर यांच्यामुळे मुख्य भूप्रदेशापासून वेगळा झालेला महाराष्ट्रातील कोकणाचा समुद्रतटीय भूप्रदेश आहे. सध्या त्यात खाडी, जमिनीसह उत्तरकोकणाच्या मूळ जमीन घटकाचा समावेश आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे व्याप्ती क्षेत्र पूर्वेस पारसिक डोंगर रांगा आणि पश्चिमेस ठाणे खाडी व मुंबई शहर यांनी सीमीत झालेले असून नव्या मुंबईच्या उत्तरेस ठाणे शहर आहे आणि दक्षिणेस जवाहरलाल नेहरु पोर्ट-ट्रस्ट व पनवेल शहर आहे. नवी मुंबई महानगरपालिकेची हद्द ठाणे शहराजवळ दिघा गावापासून खारघर वसाहतीजवळच्या तिच्या उत्तर-पूर्व टोकाकडील बेलापूरपर्यंत आहे. नवी मुंबई ही बृहन्मुंबई खाडीच्या पूर्वेस आणि खाडीच्या दुसऱ्या बाजूने पारसिक हिल्सच्या डोंगरश्रेणीने वेढलेली आहे. ते समुद्रसपाटीपासून अगदीच नगण्य असलेल्या ५ ते २ मीटर उंचीवर आहे. काही भाग हा समुद्र तटावरील भराव टाकून पुन:प्रायण करण्यात आलेला भाग आहे. नवी मुंबई शहर हे भारतातील प्रथमच सुनियोजित केलेल्या शहरांपैकी एक शहर आहे.

नवी मुंबई ही महाराष्ट्र राज्याची माहिती तंत्रज्ञान व उपयोग यांच्या दृष्टीने राजधानी आहे. येथे आशियातील सुप्रस्थापित व सर्वात मोठे औद्योगिक क्षेत्र आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी नव्यामुंबईत आपल्या व्यापाराची मुख्य केंद्र उभारली आहेत त्यामुळे तिला जागतिक स्तरावर देखील महत्व प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे हे शहर भारताच्या अन्य भागांशी ऐरोली आणि वाशी मार्ग, द्रूतगती महामार्ग आणि पूर्वद्रूतगती महामार्ग यांनी आणि मुंबईतील देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळाशी व त्याप्रमाणे भारताच्या औद्योगिक क्षेत्राची बहुतांश मालवाहतूक हाताळणाऱ्या जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या सर्वात मोठया आंतरराष्ट्रीय बंदराशी चांगल्या प्रकारे जोडले गेले आहे. नवी मुंबई शहर हे पश्चिम नौदल क्षेत्राचे मुख्यालय आणि भूदल, वायूसेना व तटरक्षक दल यांची महत्वाची कार्यालये असलेल्या मुंबईच्या जवळचे शहर असल्याने त्याला संरक्षणदृष्टया महत्व प्राप्त झालेले आहे.

## १.२ क्षेत्र आणि विभागणी

नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये १०८.६३८ चौरस किलोमीटर इतक्या क्षेत्राचा समावेश असून हे क्षेत्र महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्राच्या ०.०६४ टक्के इतके आहे. नवी मुंबई शहराची लोकसंख्या ११.३० लक्ष (अंदाजे) २०११ च्या जनगणने नुसार असून ठाणे, मुंबई, कल्याण -डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ या ठाणे जिल्हायातील आणि पनवेल या रायगड जिल्हयातील महानगरपालिका क्षेत्रांतून येणाऱ्या लोकसंख्येसह मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे या जिल्हयांतून येणारी प्रत्येक नगरपालिका दिवसाची चल लोकसंख्या खूपच मोठी आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या नागरी क्षेत्रामध्ये केवळ ८३.९४८ चौरस किलोमीटर इतक्या क्षेत्राचा समावेश आहे. या क्षेत्राच्या भूमि अभिलेख प्रशासनाचे काम नागरी भागात सिडकोकडून आणि २४.६९ चौ.मी. क्षेत्र असलेल्या औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून केले जाते. सर्व इतर प्रशासकीय स्वरुपाचे काम महानगरपालिकेच्या प्रशासकीय विभागांनुसार केले जाते. महानगरपालिकेत "अे" ते एच " असे ८ महानगरपालिका विभाग आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेचे एकूण क्षेत्र १०८.६३८ चौरस किलोमीटर इतके आहे. या क्षेत्रात एका प्रशासकीय तहसीलचा (म्हणजे ठाणे) समावेश आहे. प्रत्येक विभाग हा एक विभाग अधिकाऱ्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे. नवी मुंबई महापालिकेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी पोलीस आयुक्तांचे कार्यालय असून पोलीस आयुक्त हे त्याचे प्रमुख आहेत व त्यांचे मुख्यालय बेलापूर येथे आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने अधिनियमानुसार अग्निशमन दल १.४.९९ रोजी सिडकोकडून आपल्या ताब्यात घेतले असून त्याचे मुख्यालय वाशी येथे आहे. नव्या त्याशिवाय, महापे येथे ठाणे-बेलापूर औद्योगिक संघाकडून चालवणे जाणारे अग्निशमन दल तेथे कार्यरत आहे. आणि त्या प्रत्येक उपविभागाचा कार्यभार एका अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

## १.३ ठळक प्राकृतिक वैशिष्टये आणि जमीन वापराचे स्वरुप

### १.३.१ मृदा

नवी मुंबईतील मृदा आवरण हे प्रामुख्याने वालूकामय आहे व हे मृदा आवरण गाळमाती आणि मातीवाळूच्या स्वरुपाचे आहे.

| **जमीन वापर** | **नवी मुंबई शहर जिल्हा** (क्षेत्र चौरस किलोमीटरमध्ये आणि टक्केवारी) |
|---|---|
| वसलेले क्षेत्र | ८३.९४८ |
| औद्योगिक क्षेत्र | २४.६९ |
| एकूण | १०८.६३८ चौरस किलो मीटर |

नवी मुंबई महानगरपालिकेकडे अरबी समुद्रातील ठाणे खाडीवर पुन:प्रायण केलेली मोठी क्षेत्रे आहेत.

### १.३.२ भूशास्त्र आणि भूरुपिकी

नव्या मुंबईचे संपूर्ण क्षेत्र केटेशसचा उत्तरार्ध आणि ईओसीनचा पूर्वाध यांच्या मधील कालावधीत बाहेर पडलेल्या प्रवाहांनी तयार झालेले डेक्कन बेसाल्ट स्तर आणि त्यांचे अधिसिलिक आणि अल्पसिलिक प्रकार यांनी व्यापलेले आहे. बेसाल्टचे स्तर हे आडवे संस्तरित झालेले आहेत आणि फार मोठया क्षेत्रात त्यांचे स्वरुप जवळजवळ एकसारखे आहे. नवी मुंबईत आणि तिच्या जवळपासच्या क्षेत्रात बेसाल्टी जमिनीशी संबंध्द अशी काही बहि:स्ठावी आणि अंतर्भेदी मॉफिक प्रकारची क्षेत्र आढळून येतात. सर्वसाधारणपणे डेक्कन बेसाल्टच्या बाबतीत नेहमी दिसून येणाऱ्या एकरुपतेशी हे विसंगत आहे. त्याशिवाय, नवी मुंबई क्षेत्रात, मोठया प्रमाणात प्राणीजाती असलेले मुख्यत्वे करुन टुफी उद्भव असलेले आणि अंशत: गोडया पाण्यातील उद्‌भव असलेले जीवाश्मय अवसार (सेडिमेन्ट्रस ) आढळून येतात. नवी मुंबई क्षेत्रातील खडकांचा स्तारिक काम खाली केल्या प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अलिकडील भूशास्त्रीय कालखंड | : जलोढ वालुका आणि अलिकडील पिंडाश्म |
| फेटेशस ते ईओसीन काळखंड | : जांभा<br>बंध भित्ती<br>आंतरस्तरित राखेचे स्तर आणि जीवाश्मय<br>गोडया पाण्याचे शेक्स असलेले |

ज्वालामुखीय

समूहन आणि संकोणाश्म बेसाल्ट स्तर.

नवी मुंबईच्या भूप्रदेशाला पूर्वच्या बाजूने कडे आहेत. नवी मुंबई शहर हे दरवर्षीच्या जमिनीत भरावटाकून पुन:प्रापण केलेल्या जमिनीवर उभारण्यात आलेले आहे. पश्मिेकडील कडा हा दलदलीची जमीन आणि मोठा अन्डेसाईटिक लाव्हा स्तर यांच्या मिळून बनलेला असून हे दोन्ही कडे किंचित पश्चिमकडे झुकलेले आहेत. पूर्वकडील कडयामध्ये खडकांचा वेगवेगळया प्रकारचा गट दिसून येतो. खडक तळापासून वरच्या टोकपर्यंत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या पूर्वकडील भागात दक्षिणोत्तर जात पश्चिमेकडील ओहोटीच्या दलदलीत जाऊन मिळणारी टेकडयांची एक रांग आहे, पूर्वेस या टेकडया तुरळक छोटया टेकडया असलेल्या विस्तीर्ण मैदानाला जाऊन मिळतात. दिघापासून किल्ले गावठाण व त्यापुढे जाणाऱ्या मोठया कडयाच्या घडणीमध्ये मुख्य घटक बेसॉल्ट आहे. काही ठिकाणी त्यांच्या रकावी खडक फुटामध्ये राखेचे संस्कार दिसून येतात आणि ते मुख्यत्वे करुन बेसॉल्टच्या प्रकारचे आहेत.दिघा ते तुर्भे या टापूतील दगडखापी बेसॉल्ट खडकांमध्ये १०० मीटर पेक्षा अधिक उंचीचे प्रेक्षणीय पंचकोनी स्तंभ असलेले परिपूर्ण असे स्तंभीय संधीयन (जॉईन्टिंग) दिसून येते.

### १.३.२.१ नवी मुंबई महानगरपालिकेचा मुख्य भूप्रदेश

विस्तीर्ण ओहोटी मैदान आणि मध्यभागी असलेल्या लहान टेकडयांच्या दक्षिणोत्तर रांगा यामुळे हा भूप्रदेश ठाणे आणि रायगड जिल्हयांपासून वेगळा झालेला आहे. फाटे फुटलेले स्तर आणि खडकाच्या भिंत्ती असलेले, महासागरी ॲकराईट आणि मॉल्थक्वाईट इत्यादी नावांनी संबोधलेले जाणारे किंचित पश्मिेकडे झुकलेले भरित कुहरी ऑलिव्हिन बेसाल्टचे फेर्साजही या क्षेत्रात दिसून येतात.

## १.४ हवामान आणि पर्जन्यमान

नवी मुंबई नैऋत्य मोसमी वाऱ्यांपासून पाऊस पडतो, तो सर्वसाधारणत: जूनच्या पहिल्या पंधरवाडयात सुरु होतो आणि ऑक्टोबरच्या पहिला आठवडयापर्यंत टिकून राहतो. एप्रिल ते मे मध्ये पर्जन्यपूर्व सरी येतात. काही वेळा, ईशान्य मोसमी वाऱ्यांपासून ऑक्टोबर व नोव्हेंबरमध्ये पावसाच्या सरी येतात, परंतु संपूर्ण पावसाळयात त्या दोन पेक्षा अधिक वेळा क्वचितच येतात.

नवी मुंबई शहरातील सरासरी कमाल तापमान ३२ अंश सेल्शियस इतके तर सरासरी किमान तापमान २३ अंशसेल्शियस इतके आहे. सरासरी वार्षिक एकूण पर्जन्यमान ३५०० मिलीमीटर इतके आहे.

नवी मुंबई विभागाच्या विविध पर्जन्यमान केंद्रांमध्ये नोंदवण्यात आलेल्या मुंबईतील हवामान आणि पर्जन्यमान यांचा तपशील खालील प्रमाणे आहे. वाशी, कोपरखैरणे आणि ऐरोली.

## १.५ सामाजिक आर्थिक वैशिष्टये

गेली २५ वर्षे मुंबई शहर, ठाणे जिल्हा, रायगड जिल्हा आणि पश्चिम महाराष्ट्र यांतून नवी मुंबईमध्ये आणि आता पनवेल व खारघरमध्येही लोकसंख्येचे सातत्याने स्थंलातर होत आहे.

### १.५.१ जनसांख्यिकीय वैशिष्टये

२०११ च्या जनगणनेनुसार नवी मुंबईमध्ये पुढील जनसांख्यिकीय वैशिष्टये दिसून आली :

| | |
|---|---|
| एकूण लोकसंख्या (२०११ च्या जनगणेनुसार) | ११,१९,३२० (अंदाजे) |
| पुरुषांची एकूण लोकसंख्या | ६,१०,९३२ |
| स्त्रियांची एकूण लोकसंख्या | ५,०७,९७९ |
| इतर | ४०९ |

### १.५.२ ऐतिहासिक धार्मिक व पर्यटन स्थळे

नवी मुंबईमध्ये शासकीय व निमशासकीय अनेक ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटन स्थळे आहेत. नवी मुंबईतील अशी महत्वाची स्थळे पुढील प्रमाणे

**शासकीय व निमशासकीय आस्थापना**

कोकण भवन, सिडको, भारताची रिझर्व्ह बँक, सी.बी.डी. बेलापूर येथील केंद्र शासनाची कार्यालये, नवी मुंबई पोलीस आयुक्तांचे कार्यालय.

**धार्मिक स्थळे :** किल्लेगावठाण येथील गोवर्धनी मंदिर, नेरुळ, वाशी येथील मंदिर संकुले, नेरुळ येथील हनुमान मंदिर, पारसिक हिल येथील कृष्ण मंदिर, नेरुळ येथील माता अमृतानंद मयी मठ, पावणेश्वर, शिवमंदिर व इतर मंदिरे

**करमणुक केंद्र :** विष्णूदास भावे नाटयगृह, वाशी येथील मेघराज सिनेमा, आर्ट गॅलरी सीबीडी, सागर विहार सीबीडी-वाशी, वाशी गॅलेरिया येथील ॲडलॅब्ज आणि विविध मॉल्स

**सामूहिक संर्पक स्थळे :** एन बी एस ए ग्राऊंड, नेरुळ जिमखाना, नेरुळ येथे डी. वाय पाटील विद्यापीठाने उभारलेले नवीन स्टेडियम, आगरी कोळी भवन, वाशी येथील नवी मुंबई मर्चंट जिमखाना, महापालिकेचे राजीव गांधी स्टेडियम, सीबीडी, बेलापूर

## १.६. वीजपुरवठा केंद्र / विघुत संचमांडणी (प्रेषण केंद्र )

फार मोठया औद्योगिक आणि नागरी क्षेत्राच्या संबंधात असलेली नव्यामुंबईची विजेची गरज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून पुरविली जाते. ऐरोली आणि खारघर येथे विद्युत भार वितरित करणारी ४०० किलोवॅट क्षमतेची २ मुख्य केंद्रे असून ती वेस्टर्न ग्रिडला जोडलेली आहेत व त्या केंद्रांमधून नवी मुंबईला मिळणाऱ्या विजेचा पुरवठा केला जातो . नवी मुंबई मध्ये नेरुळ, वाशी, कोपरखैरणे, महापे आणि नोसिल येथे एकूण ५ उपकेंद्र आहेत. उच्च दाब आणि पुरवठयाचे ग्राहक धरुन विजेची जास्तीत जास्त एकूण मागणी ६०० मेगावॅट इतकी आहे. ग्राहकांची एकूण संख्या १.७५ लाख इतकी आहे.

## १.७ पाणी पुरवठा व स्वच्छता :

नवी मुंबई महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या सुमारे १२ लक्ष इतकी असून तरंगती लोकसंख्या (Floating Population) सुमारे २ लक्ष इतकी आहे. सध्या नवी मुंबई महानगरपालिका स्वत:च्या मोरबे धरणातून दररोज अंदाजे ३९० द.ल.लि. पाणी घेते. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी धरणातून शीळ एम.बी.आर. येथे दररोज ३५ द.ल.लि. व झोपडपट्टी क्षेत्रासाठी स्वतंत्र नळ जोडणीद्वारे २५ द.ल.लि. पाणी घेण्यात येते. मोरबे धरणातून प्राप्त होणाऱ्या पाण्यापैकी सुमारे ३७ द.ल.लि. पाणी सिडकोच्या कामोठे क्षेत्रासाठी व ३. द.ल.लि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कळंबोली ते कोकणभवनच्या नळजोडण्यांना वितरीत करण्यात येते. अशाप्रकारे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ४१० द.ल.लि. प्रति दिन इतका पाणी पुरवठा केला जातो. नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणाची दररोज पाणी पुरवठा करण्याची क्षमता ४५० द.ल.लि. इतकी असून भोकरपाडा येथे ४५० द.ल.लि. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र कार्यरत आहे. घनकचरा टाकण्याच्या जागा तुर्भे येथे निश्‍चित करण्यात आल्या आहेत. घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी क्षेपणभुमी शास्त्रोक्त जमीन भरणा पध्दतीने तुर्भे येथे विकसित करण्यात आली असून त्यात नवी मुंबई महानगरपालिका देशात अग्रेसर आहे.

## १.८ झोपडपट्टी

नवी मुंबईतील एकूण लोकसंख्येच्या १९.६९ टक्के लोकसंख्या झोपडपट्टी वसाहतीत राहतात. जमिनीच्या आणि बांधकाम साहित्याच्या वाढत्या किंमती आणि सातत्याने वाढत असलेली लोकसंख्या यांमुळे संख्येने प्रचंड असलेल्या कुटुंबांसाठी मालकी तत्वावर किंवा भाडेतत्वावर देखील निवासी मालमत्ता घेणे निव्वळ अशक्य होऊन बसलेले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने अधिकृत झोपडपट्टयांमध्ये पाणी प्रसाधनगृहे आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यावर आपले प्रयत्न केंद्रित केलेले आहेत. तरीही फार मोठया प्रमाणातील लोकसंख्या अनाधिकृत झोपडपट्टयांमध्ये राहत असून अशा झोपडपट्टयांमध्ये अशा मूलभुत सुविधांचा वाणवाच आहे. अधिकृत किंवा अनाधिकृत असलेल्या या सर्व झोपडपट्टया पूर, आरोग्याच्या संबंधातील धोके, आगी आणि वादळे त्यांना तोंड देण्याची दृष्टीने फारच दुबळया ठरतात.

## १.९ अर्थव्यवस्था आणि औघोगिकीकरण

नवी मुंबईत रोजगार संख्या २००१ मध्ये ७.३२ लाख इतकी होती आणि आर्थिक कार्यव्यवरांचा  हा स्तर महाराष्ट्राच्या उवरीत भागापेक्षा वरचा आहे. उत्पादक, निर्माण आणि सेवा क्षेत्रांतील रोजगाराच्या स्वरुपाच्या संबंधीत सांगायचे झाल्यास, उत्पादक आणि निर्माण क्षेत्रांमध्ये महिला कामगारांचे प्रमाण खूपच कमी आहे. मुख्य कामगारांचा त्यांच्या वास्तव्य ठिकाणांनुसार असलेली  भौगोलिक विभागणी पाहिली तर असे दिसून येते की कामगारवर्ग हा नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरुळ, कोपरखैरणे, ऐरोली आणि घणसोली प्रभागांमध्ये केंद्रीत झालेला आहे. आणि श्रमिकवर्गाच्या संबधात सांगायचे झाल्यास हा श्रमिकवर्ग नवी मुंबई शहरातून आणि ठाणे व पनवेल भागातून येत असतो.

औद्योगिक वसाहतींची संख्या आणि औद्योगिक कार्यव्यवहार यांवरुन आणि जहाजी मालांच्या वाहतूकीवरुन औद्योगिक वसाहतींची संख्या आणि औद्योगिकरणांची व्याप्ती दिसून येते.

| **औद्योगिक करणांची व्याप्ती :** | **दिघापासून नेरुळ पर्यंत** |
|---|---|
| औद्योगिक वसाहतींची संख्या | ३९८ |
| रासायनिक उघोग / टँक फार्म्स यांची संख्या | २८५ |
| उद्योगांमधील एकूण कामगार वर्ग | ४.५ लाख |
| रसायने वाहून नेणाऱ्या वाहिन्यांची संख्या | ३ |
| संभाव्य धोका असलेल्या ठिकाणांची संख्या | ३५ |
| उद्योगांसाठी धोकादायक कच्चा मालाची वाहतूक | |

करणाऱ्या वाहनांची संख्या (एका महिन्यातील) संख्या १५००
उघोगांमधून धोकादायक तयार उत्पादनांची वाहतूक
करणाऱ्या वाहनांची (एका महिन्यातील) संख्या १८५०
कंटेनर टर्मिनलची संख्या
उद्योगाचे प्रकार
अभियांत्रिकी, मुद्रण, कपडे, प्लॉस्टिक, वस्त्रनिर्माण,
रासायनिक नवे केंद्र इत्यादी.

संचालक, औद्येगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई यांनी, वाहतूक किंवा जाणारी मुख्य स्वरुपाची धोकादायक रसायने आणि तयार उत्पादने पुढील प्रमाणे असल्याचे कळविले आहे. १) क्लोरीन २) इयिलिज ३) एल.पी.जी. ४) मोटर स्पिरिट ५) उच्च प्रतीचे क्लोरोसीन तेल ६) मेथॅनॉल ७) आमोनिआ
८) हेक्झेन ९) नॅफ्था १०) प्रापिलीजन ११) ब्युटीलीन १२) स्टायरीज १३) सोडिअम हायडॉक्सॉईड १४) सल्फ्युरिक ॲसिड
१५) हायड्रोक्लोरिक ॲसिड १६) क्लोरीन १७) ब्रोमाईन १८) नायट्रिक ॲसिड १९) ॲसिटिक ॲसिड २०) कॉस्टिक सोडा २१) फर्नेस ऑईल इत्यादी

## १.१० वाहतूक व दळणवळण यंत्रणा

नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात सीबीडी बेलापूर, उरण वाशी, शीव, मुलुंड आणि नवी मुंबई विटावा या ठिकाणी ६ मुख्य प्रवेश व निर्गमन स्थाने आहेत. विटावा पासून तुर्भे पर्यंतचा ठाणे -बेलापूर महामार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १२ याकडे जाणारा पनवेल -सायन महामार्ग हे मुख्य रस्ते आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाचा औद्योगिक क्षेत्रात दिघापासून उरणपर्यत जाणारा एक समांतर मार्ग आहे आणि पामबीच मार्गाच्या स्वरुपात विटावापासून बेलापूरपर्यंत आणखी एक समांतर रस्त्याचे बांधकाम चालू आहे.

### १.१०.१ भूपृष्ठ वाहतूक

हार्बर रेल्वे लाईनची वाशीपासून बेलापूरपर्यंत आणि मध्य रेल्वेची वाशीपासून ठाण्यापर्यंत कार्यरत असलेली रेल्वे सेवा आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बीईएसटी, एनएमएमटी आणि केडीएमटी यांची नवी मुंबई महानगरपलिकेच्या हद्दीत आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राबाहेर पनवेल, ठाणे, मुलुंड, कल्याण पर्यंत असलेली बस वाहतूक सेवा ही सामूहिक वाहतुकीची मुख्य साधने आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका वाहतूक सेवेच्या एकूण २२६ बसगाडया २६ मार्गांवर चालविण्यात येत आहेत आणि त्या दररोज ६०,००० किलोमीटर इतका प्रवास करतात. नवी मुंबई महानगरपालिका वाहतूक सेवेच्या बसगाडयांमधून प्रवास करणाऱ्या प्रवशांची संख्या प्रतिदिन १.५ लाख इतकी आहे आणि जवळजवळ तेवढेच प्रवासी बीईएसटी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या बसगाडयांनी व रेल्वेने प्रवास करतात एकूण ६.०० लाख लोक मुंबईच्या विविध भागात प्रवास करतात.

### १.१०.२. परगावचा प्रवास

परगावी प्रवास करण्यासाठी बेलापूर वाशी पासून हार्बर रेल्वेची सेवा उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने वाशी, सीबीडी बेलापूर डेपो येथून बसगाडयांची सेवा उपलब्ध केलेली आहे. त्याशिवाय अनेक खाजगी वाहतूक व्यावसायिक परगावच्या ठिकाणी जाणाऱ्या आराम आणि निमआराम बस गाडयांची वाहतूक सेवा चालवीत आहे.

### १.१०.३ जलमार्ग

अलीकडेच पावसाळयाचा कालावधी वगळता गेट वे ऑफ इंडिया पासून वाशी, सी.बी.डी. बेलापूर, उरण, अलिबाग, रेवस आणि जुहू पर्यंत हॉवरक्राफ्ट सेवा आणि फेरी सेवा सुरु करण्यात आलेला आहे.

### १.१०.४ हवाई वाहतूक

आंतरराष्ट्रीय विमानतळ जवळचे सहार-मुंबई येथे असून तेथून दररोज सुमारे ४ दशवस प्रवाशांची ये - जा सुरु असते.

देशांतर्गत वाहतुकीचा विमानतळ जवळच सांताक्रुझ -मुंबई येथे असून व तेथून दररोज सुमारे ४.२ दशलक्ष प्रवाशांची ये-जा सुरु आहे.

त्याच प्रमाणे खारघर येथे एक नवीन आंतरराष्टीय विमानतळ प्रस्तावित केलेला आहे.

### १.१०.५ वाहतूक यंत्रणांचा तपशील

| | |
|---|---|
| राष्ट्रीय महामार्गची संख्या | १ |
| राष्ट्रीय महामार्गची (किलोमीटर मध्ये) लांबी | १५ |
| नद्या / नाले यांवरील पुलांची संख्या | १४ |
| एस.टी./बीसीएसटी आगारांची संख्या | ९ |
| लदान धक्के (जेटी ) यांची संख्या | २ |
| रस्ता पुलांची संख्या | ८ |
| रेल्वे स्थानकांची संख्या | ११ |
| रेल्वे पुलांची संख्या | १२ |
| कर्मचारी विरहित रेल्वे कॉसिंगची संख्या | ० |
| हेलिपॅडची संख्या | २ |

# धोका निर्धारण
# आणि
# असुरक्षितता विश्लेषण

# भाग - २

## धोका निर्धारण आणि असुरक्षित विशेषण


| | |
|---|---|
| २.१ | असुरक्षित वसाहती |
| २.२ | पूर |
| २.३ | आगी |
| २.४ | भूकंप आणि घरे कोसळणे |
| २.५ | भूस्खलन |
| २.६ | रस्त्यावरील अपघात |
| २.७ | औद्योगिक व रासायनिक अपघात |
| २.८ | चक्रीवादळ |
| २.९ | दंगे |
| २.१० | त्सुनामी |


## २. धोका निर्धारण आणि असुरक्षिता विशेषण

### २.१ असुरक्षित वसाहती

नवी मुंबईमध्ये २००१ च्या सर्वेक्षणानुसार एकूण ४९ झोपडपट्टी वसाहती आहेत. या झोपडपट्टयांना ज्या ज्या ठिकाणी वसल्या आहेत त्या ठिकाणांमुळे व त्याठिकाणी असणाऱ्या पायाभुत असुविधांमुळे असुरक्षित वसाहती म्हणून समजण्यात येते. या ठिकाणांमध्ये टेकड्या, उतारावरील जागा, नाले, सखल भाग (भरती वेळी पाणी भरणारा), समुद्रकिनाऱ्यावरच्या जागा, उच्चदाब वीज वाहिन्याखालील जागा, महामार्गाच्या दुतर्फा असलेल्या जागा, रेल्वे मार्गाच्या दुतर्फा असलेल्या जागा, औद्योगिक क्षेत्रातील जागा, मुख्य जलवाहिन्यांच्या दुतर्फा असलेल्या जागा, खुल्या गटारांच्या दुतर्फा असलेल्या जागा यांचा समावेश आहे.

मुख्यप्रभागातील असलेल्या झोपडपटयांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| **प्रभागाचे नांव** | **झोपडपट्टयाची संख्या** |
|---|---|
| अ. बेलापूर गांव | ६ |
| ब. नेरुळ | ५ |
| क. वाशी | ० |
| ड. तुर्भे | ७ |
| ई. कोपरखैरणे | ५ |
| फ. घणसोली | ५ |
| ग. ऐरोली | ९ |
| घ. दिघा | १२ |

या झोपडपट्टया राज्य शासन, सिडको, एमआयडीसी यांच्या जमिनींवर आणि

वन जमिनी व खाजगी जमिनी यांवर वसलेल्या आहेत.

## २.२ पूर

खाली दिल्याप्रमाणे हार्बर रेल्वे खालून जाणारे काही भुयारी मार्ग आहेत, ते अतिवृष्टी झाल्यावर पाण्याखाली जात असतात:

बेलापूर, नेरुळ, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा जेथे पुराचे पाणी भरते अशी अनेक ठिकाणे असून त्यामुळे वाहतूक विस्कळीत होत असते तसेच तेथील वसाहतीमध्ये पाणी शिरते.

प्रत्येक प्रभागामधील पुराचे पाणी भरण्याऱ्या ठिकाणांची संख्या खाली दिली आहे.

पुराचे पाणी भरणाऱ्या ठिकाणांची प्रभागनिहाय संख्या खाली दिली आहे.

| प्रभाग | बाधित होणाऱ्या ठिकांणाची संख्या |
|---|---|
| बेलापूर | १ |
| नेरुळ | १ |
| वाशी | १ |
| तुर्भे | २ |
| कोपरखैरणे | १ |
| घणसोली | २ |
| ऐरोली | २ |
| दिघा | १ |

पुराचे पाणी भरणाऱ्या सर्व ठिकाणांचा प्रभाग निहाय तपशील खंड दोन मध्ये दिला आहे. पुराचे पाणी भरणारी ही बहुतांश ठिकाणे प्रभाग नकाशात नमुद करण्यात आलेली आहे आणि त्याच्या परिणाम स्थान सिमित असतो. तथापि पुराचे पाणी भरणाऱ्या अशा काही ठिकाणांमुळे वाहतूक विस्काळीत होते आणि शहरातील जनजीवनाचे व्यवहार बंद पडतात.

अशा प्रकारे पाणी भरु नये म्हणून नवी मुंबई महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासन यांच्याकडून मलवाहिन्यातील गाळ काढणे आणि नाले मोकळे करुन स्वच्छ करणे यांसारख्या अनेक उपाययोजना केल्या जातात. तथापि, अतिवृष्टी आणि भरती या घटना एकाच वेळी घडल्यावर अशी पूरजन्य स्थिती अनिवार्य होते.

## २.३ आगी

आगीच्या बाबतीत नव्या मुंबईमध्ये मोठी विविधता असून तेथे प्रत्येक प्रकारच्या आगीचा संभवनीय धोका आहे.

## पुढील स्त्रोतांमधून आगीचा धोका उद्‌भवू शकतो

- इमारतीत लाकडाचा वापर करुन दाटीवाटीने बांधण्यात आलेल्या फारमोठी संख्या असलेल्या गावांतील जुन्या इमारती.
- पुरेशा प्रमाणात अग्निशमनाच्या सुविधा नसलेल्या बहुमजली इमारती
- सर्व वसाहतीमंधील वाणिज्यक कार्यव्यवहार
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील लहान, मध्यम व मोठया स्वरुपाचे धोकादायक उद्योग
- तुर्भे प्रभागातील ऑईल रिफायनर्स

## तुर्भे प्रभागातील पेट्रोकेमिकल्स उपयोग

आगीचा मुकाबला करण्यासाठी पुढील यंत्रसामग्रीसह ४ केंद्रांमध्ये (१ एमआयडीसी पावणे ) १ ३ ४ अधिकारी व कर्मचारी आहेत.

- वाशी अग्निशमन केंद्र

| | | |
|---|---|---|
| १ | रेस्क्यू टेंडर | १ |
| २ | फायर टेंडर | १ |
| ३ | डी सी पी टेंडर | १ |
| ४ | ब्रॉन्टोस्काय लिफ्ट | २ |

- नेरुळ अग्निशमन केंद्र -

| | | |
|---|---|---|
| १ | वॉटर टेडंर | १ |
| २ | मिनी वॉटरटेडंर | १ |
| ३ | ब्रॉन्टोस्काय लिफ्ट (५ २) मी | १ |

- सी बी डी अग्निशमन केंद्र -

| | | |
|---|---|---|
| १ | रेस्क्यू व्हॅन | १ |
| २ | टँकर | १ |
| ३ | ॲम्ब्युलन्स | २ |

- ऐरोली अग्निशमन केंद्र

| | | |
|---|---|---|
| १ | फायर इंजिन | १ |
| २ | फायर टेंडर | १ |
| ३ | ॲम्ब्युलन्स | १ |
| ४ | फायर जीप | १ |

- पावणे संकटकालीन सहाय्यक केंद्र (एम आय डी सी)

| | | |
|---|---|---|
| १ | वॉटर टेंडर | १ |
| २ | फोम टेंडर | १ |
| ३ | ॲम्ब्युलन्स | १ |

## २.४ भूकंप आणि घरे कोसळणे

गेल्या काही वर्षात नवी मुंबई प्रदेशात झालेले सौम्य स्वरुपाचे भुकंप : २००१ च्या जनणनेनुसार, नवी मुंबईत निवासी, व्यापारी आणि औद्योगिक आस्थापना धरुन एकूण २०३७६८ इमारती आहेत. त्यापैकी केवळ ४० टक्के इमारती या प्रबलित क्रॉंकीटचा वापर करुन बांधण्यात आलेला आहे. तर ३० टक्के इमारती या घडीव दगडाचा वापर करुन बांधलेल्या आहेत. अशाप्रकारे या सर्व बांधकामापैकी ४० टक्के बांधकाम ही अभियांत्रिकी प्रकियेचा अवलंब न करता बांधण्यात आलेले आहेत. फार मोठया प्रमाणात लोकसंख्या झोपडपटयातून राहत आहे हे त्यामागचे एक कारण असू शकते. त्यामुळे अभियांत्रिकी प्रकियेचा अवलंब न करता बांधण्यात आलेल्या इमारती हा संभवनीय धोका असलेल्या इमारतींची मोठी संख्या आहे. नवी मुंबई मध्ये २०३७६८ उपकर प्राप्त इमारती असून यांपैकी बहुतांश इमारती सिडकोने बांधलेल्या आहेत.

सिडकोचे अभियानाने या इमारतींची वारंवार तपासणी करत असतात आणि त्यांच्या कमकुवत रचनेमुळे त्या कोसळू नयेत म्हणून सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करीत असतात. सर्वसाधारणत: या इमारतींच्या धोकादायक भागाला टेकू देण्यात येतात आणि अनेक बाबतीत धोकादायक भाग पाडून देखील टाकला जातो.

कायदेशीर अडचणीबरोबरच निधीची कमतरता असल्याने सिडकोचे या इमारतींची दुरुस्ती करण्याचे काम बरेच मंदावले आहे. त्यामुळे घर कोसळणे ही एक नित्याची घटना झाली आहे. पुरेशा प्रमाणात संक्रमण कालीन जागांची सोयच उपलब्ध नसल्याने घर कोसळण्याची घटना घडल्यास सकंटकालीन निवारा पुरवणे ही एक मोठी गरज होऊन बसली आहे.

## २.५ भूस्खलण

जमिनीवर मोठया प्रमाणात ताण पडत असल्याने, टेकडयांच्या उतारावरील आणि टेकडयांच्या पायथ्याशी असलेल्या अनेक मोकळया जागांवर वस्त्या निर्माण झालेल्या आहेत त्यामुळे त्यांच्या बाबतीत भूस्खलणाचा धोका निर्माण झालेला आहे. भूस्खलणाच्या बहुतांश घटना जोरदार वादळी वाऱ्यांसह आतिवृष्टी येत असेल तेव्हा घडत असतात. त्यामुळे काही वेळा जीवित हानी होते.

## नवी मुंबई शहरातील भूस्खलनाच्या दृष्टीने असुरक्षित असलेल्या जागा पुढीलप्रमाणे आहेत.

| प्रभागाचे नांव | ठिकाण / जागा |
|---|---|
| अ. बेलापूर | दुर्गामाता झोपडपट्टी |
| ब. नेरुळ | महात्मा गांधी झोपडपट्टी, रमेश मेटल क्वारी, |
| ड. तुर्भे | इंदिरानगर झोपडपट्टी |
| फ. घणसोली | रबाडे-भीमनगर, अश्विन क्वारी, आंबेडकर नगर झोपडपट्टी |
| घ. दिघा | इलठाणपाडा झोपडपट्टी |

नवी मुंबईतील भूस्खलनाच्या दृष्टीने असुरक्षित असलेल्या अनेक जागा या कामबंद करण्यात आलेल्या दगडवाणी आणि टेकडयांच्या रांगा यांवर किंवा त्यांच्या नजीक आहेत. टेकडयांच्या बाजूच्या जमिनी त्या प्रामुख्याने राज्य शासन / केंद्र शासन किंवा वनविभाग यासारखा वेगवेगळया प्राधिकरणांच्या मालकीच्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम केला असून याद्वारे विनिर्दिष्ट क्षेत्रांतील झोपडपट्टया या विनियामित झोपडपट्टया म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे. व त्यांनी १९९५ पासून झोपडपट्टया सुधार कार्यकमासाठी निवड करण्यात आलेली आहे. वाल्मिकी आंबेडकर आवास योजना आणि जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान यांच्या माध्यमातून या झोपडपट्टयांची सुधारणा करण्यात येत आहे. या झोपडपट्टयात नागरी भागातील गरीबांसाठी मुलभुत सुविधा पुरविण्यात येत आहेत. भूस्खलनामुळे होणारे नुकसान टाळावे यासाठी नवी मुंबई महानगरपालिका आधारभिंत बांधण्याचा एक कार्यक्रम राबवित आहे.

### २.६ रस्त्यांवरील अपघात

नवी मुंबईशहरामध्ये प्राणघातक व गंभीर स्वरुपाच्या इजा होण्यास कारणीभूत ठरणारी अपघात प्रवण असलेली प्रमुख रस्त्यावरील ठिकाणे असून ती खाली दिली आहेत.

| **अ.क्र** | **ठिकाण** |
|---|---|
| १ | ठाणे-बेलापूर मार्ग |
| २ | पाम बीच मार्ग |
| ३ | सायन-पनवेल महामार्ग |
| ४ | एम आय डी सी मार्ग |
| ५ | उरण जंक्शन |
| ६ | सीबीडी. |

पुढील ठिकाणी वाहतुकीची घनता सर्वाधिक आहे.
वाशी सेक्टर -१७,१०,१४,२९, तुर्भेनाका, सी बी डी - बेलापूर, नेरुळ, सानपाडा जंक्शन, विटावा जंक्शन, महापे जंक्शन, कोपरखैरणे जंक्शन.

## २.७ औद्योगिक व रासायनिक अपघात

या क्षेत्रात धोकादायक मालाची निर्मिती आणि प्रक्रिया करणारे किंवा धोकादायक मालाची साठवण करण्याचे काम २८५० उद्योग आहेत. वस्तुस्थिती दर्शक पत्रकांसह (फॅक्ट शीटस)या उपयोगांची एक सविस्तर सूची एका वेगळया खंडा मध्ये देण्यात आली आहे. यापैकी अनेक गोदामे निवासी क्षेत्रांच्या किंवा अन्य मालाच्या साठवण व्यवस्थांच्या अगदी निकट आहेत त्यामुळे निवासी व तसेच औद्योगिक वसाहतीमध्ये आगीचा आणि रासायनिक विस्फोट होण्याचा मोठा धोका संभवतो.

अंदाजे २४.६९ किलोमीटर क्षेत्र व्यापलेल्या आणि मोठी रासायनिक उद्योंग सकुंले, रिफायनरी आस्थापना आणि केंद्र असलेल्या ठाणे -बेलापूर औद्योगिक पट्टयात हे धोकादायक उपयोग प्रामुख्याने केंद्रित झालेले आहेत. अशा प्रकारची कामे करणारी विविध युनिटे एका ठिकाणी असल्याने ती अधिकच असुरक्षित झाली आहेत.
एचपीसीएल आणि बीपीसीएल ही या पटटयात कार्यरत असलेल्या धोकादायक उद्योगांपैकी काही युनिटे आहेत जेथून धोकादायक स्वरुपाच्या मालाची वाहतुक केली जाते त्या जेएनपीटीच्या बंदराच्या कार्यक्षेत्राच्या देखील जवळ असणारे हे क्षेत्र आहे. जेएनपीटीने ज्यांची हाताळणी व साठवण आवश्यक असते अशी जहाजातून भरली आणि उतरवली जाणारी ३२ घातक रसायने निश्चित केलेली आहेत. या रसायनांची एक सूची, हाताळणी क्षमता आणि संकट उद्भवल्यास करावयाची आवश्यकती कार्यवाही यांसह "धोकादायक उद्योग तसेच वस्तुस्थितीदर्शक पत्रके" यावरील खंड तीन मध्ये देण्यात आली आहेत.
जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांची स्वत:ची स्वतंत्र अग्निशमन सेवा आणि आपत्ती व्यवस्थापन योजना आहे. या क्षेत्रातील परस्पर सहाय्यक योजनेमध्ये सर्व औद्योगिक युनिटांचा समावेश आहे. या उपयोगांच्या संयुक्त साधनस्त्रोतांमुळे आग /संकट त्यामुळे होणारी हाती कमी होण्याची मोठया प्रमाणात हमी मिळाली आहे.
एचपीसीएल, बीपीसीएल, रिलॉन, हर्डेलिया, आयसीआय, सविता केमिकल्स, युनिक केमिकल, स्टार केमिकल्स इत्यादी या सर्वांकडे त्यांच्या स्वत:च्या जागेवर आवश्यक ते मनुष्यबळ आणि साधनसामग्री असलेल्या आपापल्या योजना आहेत. या प्रदेशातील ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील उद्योग जरी ज्वालाग्राही आणि विषारी द्रवपदार्थ व वायू (गॅसेस) हाताळीत असले तरी, त्यांच्याकडे किरकोळ किंवा मध्यम स्वरुपांच्या आपत्तींना तोंड देण्यापुरतीच साधनसामग्री आहे. त्यामुळे या युनिटांच्या जवळच्या परिसरात असलेल्या वस्तीला वाढता संभाव्य धोका निर्माण झालेला आहे व त्यांना क्षेत्रबाह्य (ऑफ साईट)

आपत्ती व्यवस्थापनाची गरज आहे. यापैकी कोणत्याही संघटनेकडे आपत्तींच्या क्षेत्रबाह्य परिणामांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता नाही. त्यामुळे आपत्ती उद्‌भवलेल्या त्याच्या स्वरुपानुसार नवी मुंबई अग्निशमन दल आणि एफआयडीसी अग्निशमन यंत्रणा यांच्याकडून कुमक मागवावी लागेल. या उद्योगांची तपशीलवार वस्तुस्थितीदर्शक पत्रके ( फॅक्ट शॉर्टस ), धोकादायक उपयोग तसेच वस्तुस्थिती दर्शक पत्रके यावरील खंड तीन मध्ये देण्यात आली आहेत.

या वस्तुस्थितीदर्शक पत्रकामध्ये, प्रत्यक्ष परिणामांच्या स्वरुपात धोकादायक रसायनांचा असणारा विशिष्ट धोका आणि आपत्तींचा मुकाबला करण्यासाठी या उद्योगांकडे उपलब्ध असलेली साधन सामग्री या बाबी विशेषत्वाने नमूद केलेल्या आहेत. या वस्तुस्थिती दर्शक पत्रकांमध्ये (फॅक्ट शॉट्स) कामांच्या संबंधात अन्य संघटनांशी समन्वय साधण्यास जबाबदार व्यक्ती निश्चित करण्यात आलेल्या आहेत. प्रभाग स्तरावर प्रभाग अधिकारी हा आपत्तीनंतरच्या कार्यवाहीत समन्वय साधण्यास जबाबदार आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता या सर्व युनिटांनी, सर्व प्रकारच्या संकटकालीन परिस्थितीमध्ये आणि प्रत्यक्ष युनिटच्या ठिकाणी संकटकालीन परिस्थिती उद्‌भवली तरीही, प्रभाग अधिकाऱ्याशी संपर्क प्रस्थापित करणे आवश्यक असेल. यामुळे अधिक चांगल्या प्रकारे कामात समन्वय साधला जाईल आणि अगिशमन दलाकडून वेळेवर कुमक मिळण्यास मदत होईल आणि क्षेत्रबाह्य कार्यवाही आवश्यक असेल तेव्हा राखीव व्यवस्थांचा उपयोग करुन घेता येईल.

त्याशिवाय, काही नागरी क्षेत्रांमध्ये पाईपलाईनद्वारे अशोधित (कच्च्या) तेलाचा पुरवठा होत असतो. यामध्ये एचपीसीएल, बीपीसीएल, रेलीन यांचा समावेश आहे आणि त्याबाबतीत जमिनीखालील गळती होण्याच्या व तसेच आग लागण्याच्या घटना घडलेल्या आहेत. या पाईपलाईन्सवर आणि विशेषत: त्या शहरातील निवासी आणि झोपडपट्टीच्या वसाहतीला लागून असलेल्या भागातून जात असतील तेव्हा बारकाईने लक्ष ठेवण्याचे काम सध्या संनियंत्रण केंद्राकडून केले जाते. त्यामुळे या पाईपलाईन्सच्या स्वरुपात एक धोका निर्माण झालेला आहे.

धोकादायक रसायने हाताळणाऱ्या कंपन्यांची सूची आणि नवी मुंबईतून होणारी त्यांची वाहतुक यांचा तपशील संबंधित उपाययोजनांसह खंड तीनमध्ये देण्यात आलेला आहे.

## २.८ चक्रीवादळ

बेट शहराच्या जवळ असल्याने आणि वरच्या बाजूस डोंगराळ भाग असल्याने समुद्रतटीस प्रभाग (अरबी समुद्राच्या समोर असलेले) हे वादळी वारे आणि चकीवादळे यादृष्टीने प्रवण असलेले प्रभाग आहेत. मूलत: मासेमारी करणारी गावे समुद्र किनाऱ्याच्या बाजूने वसलेली होती. त्यामध्ये बेलापूर, दिवाळे, करावे, नेरुळ, वाशी, कोपरखैरणे, घणसोली, रबाडा, दिघा आणि ऐरोली यांचा समावेश आहे. त्यात भर म्हणून या बहुतांश प्रभागांमध्ये किनाऱ्याच्या बाजूने अनेक झोपडपट्टया उभ्या राहिल्या आहेत. घरबांधणीसाठी वापरण्यात

आलेल्या सामग्रीची पाहणी करता असे आढळून येते की या वस्त्या अत्यंत असुरक्षित आहेत आणि चक्रीवादळाच्या तडाख्यात त्या तग धरुन राहण्याची शक्यता खूपच कमी आहे. चक्रीवादळाचा तडाखा बसण्याची शक्यता असलेल्या अशा वस्त्या आणि मोडकळीस आलेल्या इमारती यांची प्रभागनिहाय सूची खाली देण्यात आली असून त्या प्रत्येक प्रभागाच्या नकाशातही दर्शविण्यात आल्या आहेत.

## २.९ दंगे

नव्या मुंबईच्या वसाहतीमध्ये उर्वरित महाराष्ट्रातून व भारतातून वस्तीसाठी आलेल्या स्थानिकेतर लोकांचा जास्तीत जास्त प्रमाणात समावेश असल्याने, नव्या मुंबईत बहु सांस्कृतिक, बहुभाषिक आणि बहुवांशिक वस्ती आढळून येते. सर्व प्रकारच्या सांस्कृतिक व राष्ट्रीय कार्यक्रम आणि उत्सव यामध्ये एकोपा आढळून येतो. परंतु जनसमूहांमध्ये गैरसमज होण्याची आणि मतमतांमध्ये संघर्ष निर्माण होण्याची व त्यातून दंगे उद्‌भवण्याची शक्यता असते. घणसोली आणि आजूबाजूच्या भागात मागे झालेल्या दंग्यामुळे जीवितहानी व मोठया प्रमाणात आर्थिक हानी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना आणि भीती निर्माण झाली. या दंग्यांमुळे प्रवासी आणि नागरिक यांचे दैनंदिन व्यवहार ठप्प झाले होते आणि जखमी, आजारी, वृध्द, गरीब व्यक्ती आणि छोटे-मोठे विक्रेते यांना त्याची अधिक झळ पोचली. अशा परिस्थितीत त्या भागांतील लोकांना निवाऱ्याच्या तात्पुरत्या ठिकाणी किंवा निश्चित केलेल्या सुरक्षित जागी हलविण्याची आवश्यकता असते.

## २.१० त्सुनामी

नव्या मुंबईला अरबी समुद्राचा २५ किलोमीटर लांबीचा किनारा लाभलेला आहे आणि त्यामुळे संभाव्य त्सुनामीचा कायमचा धोका निर्माण झालेला आहे. अगोदरच्या अनुभवावरुन नव्या मुंबईला नेहमीच त्सुनामीची भीती वाटत आलेली आहे असे दिसून येते. मूलत: मासेमारी करणारी गावे किनारपट्टीवर वसलेली आहेत. यामध्ये बेलापूर, दिवाळे, करावे, नेरुळ, वाशी, कोपरखैरणे, घणसोली, रबाडा, दिघा आणि ऐरोली यांचा समावेश आहे. त्यात भर म्हणून या बहुतांश प्रभागामध्ये किनारपट्टीच्या बाजूने अनेक घरेदेखील बांधण्यात आली आहेत. घरबांधणीसाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीचा दर्जा लक्षात घेता, या वस्त्या अतिशय असुरक्षित आहेत आणि त्सुनामीच्या आघाताच्या दृष्टीने प्रवण असलेल्या अशा वस्त्यांची सूची खंड दोन मध्ये देण्यात आलेली आहे आणि प्रत्येक प्रभागाच्या नकाशामध्येही त्या नमूद करण्यात आलेल्या आहेत. जीवितहानी टाळण्याच्या दृष्टीने या भागातील लोकांना इशाऱ्याच्या टप्प्यावरच सुरक्षित ठिकाणी हलविण्याची आवश्यकता असेल. त्याचप्रमाणे खारफुटी वनस्पतीमुळे त्सुनामीचा आघात लक्षणीय प्रमाणात कमी होण्यास मदत होते म्हणून लोकांना तेथून निघून जाण्याचा इशारा देण्यासाठी खूपच कमी वेळ मिळत असल्याने अशा वनस्पतींच्या लागवडीस उत्तेजन देणे आवश्यक असेल.

# तीव्रता कमी करण्याचे

# कार्यतंत्र

# भाग - ३

३. तीव्रता कमी करण्याचे कार्यतंत्र

३.१ आपत्ती संबंधातील सिध्दता

३.२ आपत्तीची तीव्रता कमी करणे

३.३ तीव्रता कमी करण्याच्या कार्यतंत्राची उद्दिष्टे

## ३. तीव्रता कमी करण्याचे कार्यतंत्र

असुरक्षितता विश्लेषण आणि धोका निर्धारण या विषयावरील अगोदरच्या प्रकरणांमध्ये धोक्याच्या दृष्टिकोनातून संबंधित क्षेत्र, तेथील जनता आणि मालमत्ता यांच्या असुरक्षिततेची व्याप्ती आणि असा धोका उद्‌भवण्याची शक्यता निर्धारित करण्याचे काम करण्यात आले आहे. योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाय योजना आणि तीव्रता कमी करण्याची कार्यतंत्रे निश्चित करण्याच्या दृष्टीने या पुर्वावश्यक बाबी आहेत. विश्लेषणावरुन असे दिसून येते की, नवी मुंबईतील विविध ठिकाणे ही वेगवेगळया आपत्तींच्या दृष्टीने कमी अधिक प्रमाणात असुरक्षित आहेत. म्हणून सिध्दतेच्या आणि तीव्रता कमी करण्याच्या योजना तयार कराव्या लागतील आणि आपत्तींच्या आघाताची तीव्रता कमी करण्यासाठी प्रभाग स्तरावर स्थानिकरित्या त्यांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवावे लागेल. अशा सिध्दतेच्या आणि तीव्रता कमी करण्याच्या क्षेत्र विशिष्ट योजना तयार करताना असुरक्षिततेच्या प्रकारांनुसार सिध्दता व तीव्रता कमी करण्याची कार्यतंत्रे यांचे स्तर निश्चित करावे लागतील. संपूर्ण समाजाची असुरक्षितता लक्षात घेताना या कार्यतंत्रामध्ये सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास असलेल्या जनसमूहांकडे प्राधान्याने लक्ष पुरविण्यात येण्याची आवश्यकता असेल.

## ३.२ आपत्तीची तीव्रता कमी करणे

आपत्तीपूर्व नियोजनामध्ये, आपत्तीची तीव्रता कमी करणे आणि संभाव्य आपत्तीच्या संबंधात सिध्दता करणे यासारख्या कामांचा समावेश आहे. आपत्तीची तीव्रता कमी करण्याच्या कार्यतंत्रामध्ये, आपत्तीला कारणीभूत होणाऱ्या धोक्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले असून त्याद्वारे त्याचे प्रत्यक्ष होणारे परिणाम नष्ट किंवा मोठया प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. इमारतींना चक्रीवादळ किंवा भूकंप यांच्यादृष्टीने प्रतिकारक्षम करण्यासाठी त्यांचे मजबूतीकरण, मोठया प्रमाणात धोका असलेल्या क्षेत्रांमध्ये विकासाची

कामे करण्यावर निर्बंध घालण्यासाठी जमीन वापराच्या स्वरुपाचे नियंत्रण करणे आणि वेगवेगळया क्षेत्रांत हानीची भरपाई होण्याची हमी असावी यादृष्टीने आर्थिक कार्यव्यवहारांचे विकेंद्रीकरण करणे यांचा उदाहरण दाखल निर्देश करता येईल. धोका असलेल्या घटकांची असुरक्षितता कमी करण्याच्या दृष्टीने रचना करण्यात आलेले संरक्षक बांधकामे किंवा रचनेतील फेरफार यांच्या बांधकामासारख्या संरचनात्मक उपाय योजना आणि जमीन वायदा आणि बांधकाम संहिता यांचे विनियमन करणे आणि नुकसान कमी व्हावे यासाठी अंमलबजावणी विभागांना साधनसामग्रीनिशी सुसज्ज करणे यांसारख्या संरचनेनंतर उपाय योजना यापुढे प्रदेश आणि जनता यांवर होणारा आपत्तीचा आघात कमी होऊ शकेल. आपत्तीमुळे जे कोणतेही नुकसान होऊ शकेल ते कमी करण्यासाठी किंवा टाळण्यासाटी केल्या जाणाऱ्या प्रत्येक गोष्टीस "धोका कमी करणे" असे म्हणतात. धोका कमी करण्याचे असे काम नेहमीच्या आंतर विभागीय समन्वयाने एकत्रितपणे करता येईल.

तीव्रता कमी करणे यामध्ये, विशिष्ट आपत्तींच्या संबंधातील सिध्दतेशी ज्यांचा अतिशय जवळून संबंध आहे अशांकडून केली जाणारी दूरगामी परिणाम असलेली व अशा आपत्तींनंतर तात्काळ करण्यात येणारी आणि त्या आपत्तीमधून अल्पावधीतून बाहेर काढण्याची कृती असा अर्थ अभिप्रेत आहे. तीव्रता कमी करण्याचे प्रयत्नांमध्ये केवळ दुरुस्ती, पुर्नबांधकाम आणि विकसित भागांचे पुनर्वसन यावर भर असू नये तर विकसित झालेले नाहीत अशा भागातील विकासाच्या दृष्टीने पूर्वावश्यक असलेल्या गोष्टी असे त्या प्रयत्नांचे स्वरुप असायला हवे.

## ३.३ तीव्रता कमी करण्याच्या कार्यतंत्राची उद्दिष्टे

ज्या जनसमूहांमध्ये आपल्याला राहायचे आहे व काम करावयाचे आहे ते जनसमूह सुरक्षित असावेत असे जनतेस वाटावे यासाठी जनतेमध्ये आपत्तीच्या धोक्यासंबंधात वाढत्या प्रमाणात जाणीव निर्माण करणे आणि अशा आपत्तींच्या परिणामी होणारी जीवितहानी, दुखापती, आर्थिक खर्च, नैसर्गिक व सांस्कृतिक साधनसंपत्तीचा विनाश यांचा धोका लक्षणीय प्रमाणात कमी करणे.

# नवी मुंबईसाठी तीव्रता कमी करण्याच्या उपाययोजना

# भाग - ४

नवी मुंबईसाठी तीव्रता कमी करण्याच्या उपाययोजना
४.१ पायाभूत सोयींमध्ये सुधारणा
४.१ वाहतुकीच्या पायाभूत सोयी
४.१.१ सेवा आाणि त्यासंबंधातील पायाभूत सोयी
४.१.२ गृहनिर्माणविषयक पायाभूत सोयी
४.२ जनसंपर्क आणि सार्वजनिक माहिती यंत्रणा
४.२.१ बिनतारी संदेशवहन
४.२.२ माहिती फलक
४.२.३ लोकल गाडयांमधील जनसंबंधित यंत्रणा
४.२.४ रेल्वे स्थानके आणि बस स्थानके येथील जनसंबंधित यंत्रणा
४.३.५ केबल टी.व्ही, नेटवर्क
४.२.६ जागतिक माहिती सेवा (जी.आय.एस.)
४.२.७ आकाशवाणी
४.३ जमीन वापरविषयक धोरणे आणि नियोजन
४.३.१ सुरक्षित स्थळे
४.३.२ जमीन भरावाच्या जागांची सुधारणा व संरक्षण
४.३.३ भराव टाकून जमिनीचे पुन:प्राषण करण्यावर नियंत्रण
४.३.४ साठवण करणारी व धोकादायक युनिटे निवासी क्षेत्रातून अन्यत्र हलविणे.
४.३.५ दाटी कमी करणे.

## ४. नवी मुंबईसाठी तीव्रता कमी करण्याच्या उपाययोजना

अगोदरच्या भागांमध्ये निश्‍चित करण्यात आलेला धोका आणि असुरक्षितता विचारात घेऊन तीव्रता कमी करण्याच्या प्रस्तावित उपाययोजनांचे तीन पूरक शिर्षकांखाली वर्गीकरण करण्यात आले आहे.

१. पायाभूत सोयींमध्ये सुधारणा
२. जनसंपर्क आणि सार्वजनिक माहिती यंत्रणा
३. जमीन वापरविषयक धोरणे आणि नियोजन

यांच्या आधारे, अंमलबजावणी यंत्रणांच्या भविष्यातील वाढीच्या दृष्टीने आवश्यक गोष्टी व तसेच आपत्ती व्यवस्थापन योजनेच्या अंमलबजावणीच्या संबंधात त्यांच्यांकडून अपेक्षित असलेल्या विशिष्ट गोष्टी विचारात घेऊन या यंत्रणांसाठी आणखी कोणत्या गोष्टी आवश्यक आहे ते निश्चित करावे लागेल. विशेष साधन सामग्रीची व निविष्टाची (इनपुट) तरतूद केल्यामुळे सेवेच्या क्षमतेत आणि दर्जामध्ये वाढ होईल आणि या यंत्रणांकडे उपलब्ध असलेल्या मर्यादित मनुष्यबळाच्या सक्षम सहयोगाचे सुसूत्रीकरण करता येईल अशी

अपेक्षा आहे. भविष्यात प्रशिक्षण देऊन मानव संसाधनांच्या दर्जात सुधारणा करण्याच्या शक्यता आजमावून पाहण्यासाठी प्रस्ताव आहे.

## ४.१ पायाभूत सोयींमध्ये सुधारणा

नवी मुंबईसाठी पायाभूत सोयींमध्ये आवश्यक असलेल्या सुधारणांचा वाहतुक, सेवा आणि गृहनिर्माण संबंधातील पायाभूत सोयी यांच्या संबंधात अभ्यास करण्यात आला. यामध्ये रस्ता व रेल्वे वाहतूक यंत्रणा, स्वच्छता, मलजलाची विल्हेवाट लावण्याची पध्दती, पावसाळी पाण्याचा निचरा यंत्रणा, झोपडपट्टी सुधार आणि घरदुरुस्ती व रिट्रोफिटिंग कार्यक्रम यांचा समावेश आहे. पाणीपुरवठा, वीजपुरवठा, दूरसंचार सेवा, यांसारख्या मुंबईच्या जीवनवाहिन्या असलेल्या सेवा, इंधन, आरोग्य सेवा पुरवठा आणि अन्नधान्य पुरवठा सेवा या पायाभूत सोयी कार्यक्षम रीतीने चालण्यावर मोठया प्रमाणात अवलंबून आहेत.

तीव्रता कमी करण्याच्या संपूर्ण कार्यतंत्राचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहे. असुरक्षितता कमी करण्याच्या संबंधात संस्थीय स्वरुपाच्या व्यवस्थांच्या बाबतीत आणि या पायाभूत सोयींमध्ये सुधारणा करण्याच्या कार्यतंत्राची अंमलबजावणी करण्याच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष पुरविण्याची आवश्यकता आहे. रस्ते वाहतूक यंत्रणा, पाणीपुरवठा इत्यादींच्या संबंधातील सविस्तर माहिती संकलित करण्याचा सध्याचा प्रयत्न हे असुरक्षितता कमी करण्याच्या दिशेने टाकलेले योग्य पाऊल आहे.

वाहतुकीच्या पायाभूत सोयी

अंदाज करण्यात आलेल्या प्रवासी वाहतुकीच्या गरजा, वाहनांच्या असलेल्या प्रमाणात झालेली वाढ आणि खाजगी व सार्वजनिक वाहनांच्या संख्येत झालेली वाढ यांमुळे सध्या असलेल्या वाहतुकीच्या पायाभूत सोयी आणि रस्ते त्यांच्यावर फार मोठा ताण पडणार आहे.

रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी, पुरामुळे जनजीवन विस्कळित होण्याचे प्रमाण कमी करण्याकरिता आणि तातडीच्या सेवा अधिक कालावधीसाठी उपलब्ध करुन देणे शक्य व्हावे याकरता वाहतुकीच्या पायाभूत सोयींमध्ये सुधारणा करण्याकरता आपत्तीची तीव्रता कमी करण्याचे एक व्यापक कार्यतंत्र आवश्यक झाले आहे.

तथापि, सध्याच्या परिस्थितीत, पायाभूत सोयींच्या क्षमतांमध्ये मोठया प्रमाणात कोणतीही वाढ करायचे झाल्यास फार मोठया प्रमाणात पुनर्वसनाचे काम करावे लागेल व त्यासाठी योग्य प्रकारचे धोरण आणि सहभागात्मक कार्यतंत्र निश्चित करावे लागेल. सध्याच्या स्थितीनुसार, महाराष्ट्र शासन लवकरच "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुनर्वसन व पुन:स्थापन प्रकल्प, जुलै १९९५" यासाठी धोरण निश्चित करण्यासाठी, संस्थात्मक स्वरुपाच्या व्यवस्था करण्यकरीता आणि अंमलबजावणीचे कार्यक्रम ठरविण्यासाठी

नेमलेल्या नियुक्त कार्यबलाच्या (टास्क फोर्स) शिफारशी नुसार एक नागरी धोरण पत्रिका प्रसृत करणार आहे.

तिसरे मार्गक्षेत्र (कॉरिडोर) आणि चवथे मार्गक्षेत्र या जादा रेल्वेमार्ग क्षेत्रासंबंधीच्या प्रस्तावांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने त्यांचे पुर्नरावलोकन करण्याची व त्यांत सुधारणा करण्याची गरज आहे. त्याशिवाय, मुंबई महानगर प्रदेशातील प्रस्तावित प्रवासी रेल्वे मार्गाच्या कामांना गती देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील यासंबंधातील कामांची व त्यानंतरच्या टप्प्यांतील कामाची यशस्वीरित्या अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यापैकी बहुतांशी प्रकल्पांमध्ये पुनर्वसनाच्या घटकाचादेखील अंतर्भाव आहे. या प्रकल्पाचे काम विविध यंत्रणांमार्फत केले जाणार आहे आणि त्यामुळे सहयोगी स्वरुपाचे नियोजन आणि पुनर्वसनाचे व्यवस्थापन यावर भर देऊन समन्वय साधण्याचे धोरण अवलंबिण्याची आवश्यकता असेल.

पादचारी व तसेच वाहने यांच्या सर्व प्रभागांमधील रहदारीचे प्रमाण कमी करण्यासाठी या सर्व भागात रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याच्या प्रस्तावाचा गांभीर्याने पाठपुरावा करण्याची गरज आहे.

उड्डाणपूल (फ्लाय ओव्हर्स)

याशिवाय नवी मुंबई महानगरपालिका रेल्वे स्थानकांच्या ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचे काम हाती घेणार असून अशा पाच उड्डाणपूलांचे काम सध्या प्रस्तावित केलेले आहे. यापैकी बव्हंशी उड्डाणपुलांच्या संबंधात सुरुवातीचे सर्वेक्षणाचे काम सुरु देखील झालेले आहे. हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर रहदारीचा एक विस्तृत आढावा घेण्याची गरज आहे.

मंजुरी देण्यात आलेल्या या पाच उड्डाणपुलांची सूची खाली देण्यात आलेली आहे.

तुर्भे मार्गावरील

१. दिवा जंक्शन
२. घणसोली स्थानक
३. कोपरखैरणे स्थानक
४. बोनकोडे

भविष्यात पामबीच मार्गाच्या सर्व क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधण्यात येतील.

## रस्त्यांचे रुंदीकरण

महत्वाच्या मुख्य रस्त्यांच्या संबंधात आवश्यक असलेल्या गोष्टींपैकी ही एक महत्वाची गोष्ट आहे. ठाणे तुर्भे, खाडी मार्ग, एमआयडीसी मुख्य मार्ग, वाशी स्थानक ते कोपरखैरणे मुख्य मार्ग या मार्गांवर मोठया प्रमणात वाहतुकीची कोंडी होते ती दूर करुन हे मार्ग अधिक रुंद करण्याची गरज आहे. त्या शिवाय जंक्शनची किंवा उड्डाण

पुलांची अशी ठिकाणे आहेत. ज्या बाबतीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

## अतिरिक्त रस्ते

एमआयडीसीचे औद्योगिक क्षेत्र आणि शहर यांच्या दरम्यान होणारी अवजड वाहनांची वाहतुक सुरळीत करण्यासाठी कृषिउत्पन्न बाजार संकुलात एक विकसित ट्रक टर्मिनस कार्यानवित करण्यात यावे आणि सायन-पनवेल महामार्गवरुन टर्मिनसकडे जाणारा रस्ता रुंद करण्याची गरज आहे. त्याच प्रकारे वाहने उभी करुन ठेवण्यात आल्यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी होऊ नये म्हणून वसाहतींमध्ये ट्रक टर्मिनस उभारण्याची आवश्यकता आहे. ठाणे तुर्भे, खाडी रस्त्यावरील ताण कमी करण्यासाठी जे रस्ते बांधण्याची गरज आहे त्यांचा भविष्यातील योजनेत समावेश करण्यात यावा.

## विशेष मार्गक्षेत्रांसाठी तरतूद (कॉरिडोर्स)

अग्निशमनदल, रुग्ण वाहिका आणि पोलीसदल यांच्यासाठी विशेष मार्गक्षेत्रांची तरतुद. नगरपालिका व शासकीय रुग्णालये, अग्निशमन केंद्र आणि पोलिस ठाणी यांची ठिकाणे विचारात घेऊन अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि पोलिस दल यांची ये -जा सुलभ व्हावी यादृष्टीने विशेष मार्गक्षेत्र अशी निश्चितपणे तरतूद करण्याकरिता एक योजना तयार करण्यात यावी. राखीव मार्गक्षेत्रांची ही तरतूद करताना, वाहनांची दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम वाहतुक सुलभ व्हावी यादृष्टीने आतल्या भागावा जोडणाऱ्या लहान मोठया शल्या निश्चित करण्याची गरज आहे. अशा निश्चित कलेल्या मार्गक्षेत्रातंर वाहने उभी करुन ठेवण्यास किंवा कोणत्याही प्रकारचे अन्य अतिक्रमण करण्यास परवानगी देण्यात येऊ नये. या प्रस्तावांतर्गत, काही रुग्णांलयामध्ये दुर्घटना विभागांसाठी अतिरिक्त प्रवेशद्वारे आवश्यक असतील.

## विशेष मार्गक्षेत्रांसाठी तरतूद

नवी मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बीईएसटी आणि केडीएमटी यांच्या सेवांसाठी विशेष मार्गक्षेत्रांची तरतूद.बीईएसटी, एनएमएमटी, एसएसआरटीसी आणि केडीएमटी या सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या यंत्रणा असल्याने त्यांच्यामुळे वाहतुकीची गती मंद होऊ नये व त्यांना आवश्यक ते प्राधान्यदेखील मिळावे यासाठी या सेवांच्या बसगाडयांकरता मुख्य मार्गांवर खास पथ (कंन्स) राखीव ठेवता येतील. खास राखीव पथ (कंन्स) असलेल्या अशा मार्गांवर इतर वाहनांना केवळ सिग्लनच्या ठिकाणी डावीकडे वळण्यास परवानगी देण्यात यावी. या संदर्भात बसगाडयांसाठी मार्ग क्षेत्रातील एक पथ (लेन) राखीव ठेवण्याच्या प्रस्तावाचा या संदर्भात अभ्यास करावा लागेल.

## गाडया उभ्या करुन ठेवण्यास प्रतिबंध असलेले (नो-पार्किंग) रस्ते

अधिक प्रमाणात वाहनांची घनता असलेले रस्ते आणि महत्वाचे मोठे रस्ते हे

नॉन -पार्किंग क्षेत्र असावेत. विशेषत: शहराचे मुख्य रस्ते असणारे पामबीच, ठाणे - बेलापूर, दिवा नाका ते ऐरोली मुलुंड पूर्व या रस्त्यांवर कोणत्याही जागांमधून प्रवेश करण्यास परवानगी असू नये. तसेच रसायनांची साठवण आणि प्रक्रिया करणारी युनिटे ज्या क्षेत्रात मोठया प्रमाणात आहेत. त्या क्षेत्रांमध्येही आगी लावण्याचा मोठा धोका आहे. यांपैकी अनेक युनिटांच्या जवळपास निवासी वसाहती आहेत व त्या वसाहतींचे येथून स्थलांतर करण्याची आवश्यकता भासेल. या ठिकाणांना जोडणारे रस्ते पार्किंग पासून मुक्त ठेवण्यात यावेत, यापुढे आवश्यकता असल्यास तेथील लोकांचे स्थलांतर करणे सोपे होईल. उदाहरणार्थ, संकटकाळात लोकांचे स्थलांतर करणे सुलभ व्हावे यासाठी रिफायनरीजच्या जवळ असलेला एम आय डी सी तुर्भे नाका ते उरण फाटा नाका हा रस्ता वाहने उभी करुन ठेवण्यास प्रतिबंध असलेला (नो-पार्किंग ) रस्ता म्हणून घोषित करण्यात यावा. सर्व रेल्वे स्थानकांकडे आणि बस डेपो / टर्मिनसकडे जाणारे मुख्य रस्ते आणि ठाणे-बेलापूर महामार्ग हे नो-पार्किंग क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावेत. या टप्प्यावर सेवा मार्गाच्या संकल्पनेचया अवलंब करावा, या बाबतीत एमआयडीसी अंतर्गत रस्ता विकसित करण्याचा विचार करावा.

त्याची दुसरी बाजू म्हणजे, यासंबंधात पार्किंग निर्देशक योजनेची अमंलबजावणी करावी लागेल आणि अधिक घनता असलेल्या आणि रेल्वेस्थानक, बस आगार असलेल्या भागात बहुमजली पार्किंगसाठी व्यवस्था निर्माण करावी लागेल.

### ४.१.२ सेवा आणि त्या संबंधातील पायाभूत सोयी

#### ४.१.२.१ सुविधा

मागील तीस वर्षात शहरामध्ये कोणत्याही साथीच्या रोगाचा फैलाव झालेला नाही आणि पाणीपुरवठयाच्या दर्जावर दररोज बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. तरही स्वच्छता विषयक सोयी अपर्याप्त आहेत. प्रसाधनगृहांच्या बाबतीत १.५०या प्रमाणात सोयी उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सध्याच्या २९६ प्रसाधनगृहांशिवाय आणखी २६४ पेक्षा अधिक प्रसाधनगृहांची तरतूद करावी लागेल असा अंदाज आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या झोपडपट्टी स्वच्छता कार्याच्या अंतर्गत या बाबतीत काही प्रमाणात सहाय्यक करता येईल, परंतु संबधित सर्व जनतेला या सोयी उपलब्ध करुन देणे पालिकेची साधना संपत्ती मर्यादित असल्याने शक्य नाही असे वाटते. स्वच्छतेच्या बाबतीत चांगल्या राजकीय पाठबळासह नवोपक्रमाची आणि दृष्टीकोनाची गरज आहे.

विविध मलजल प्रक्रिया केंद्रांच्या अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या मलजलवर प्रक्रिया करण्याच्या व त्यांची विल्हेवाट लावण्याच्या सोयींना जास्तीत जास्त प्राधान्य देण्याची गरज आहे आणि त्याबाबतीत काही अडथळे असतील तर ते लवकरात लवकर दूर करण्याची आवश्यकता आहे.

## जनसमूहांच्या ठिकाणी असणाऱ्या स्वच्छतेच्या पायाभूत सोयी

नवी मुंबईमध्ये मोठया संख्येने देशांतर्गत पर्यटक येत असतात. त्याचप्रमाणे येथे लोक सामूहिकपणे एकत्र येतात अशी अनेक ठिकाणे आहेत. पर्यटक भेट देतात अशा आणि लोक सामूहिकपणे एकत्र येतात अशा या ठिकाणी पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठयाच्या व स्वच्छतेच्या पायाभूत सोयींचा तरतूद करणे आवश्यक आहे. फिरत्या स्वच्छतेच्या सुविधा ही एक वैकल्पिक उपाययोजना करता येईल तसेच स्थानिक रहिवाशांचे आरोग्य सुरक्षित राहावे यासाठी, त्याठिकाणी येणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी स्थायी स्वरुपाच्या स्वच्छतेच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

## नाल्यांचे निस्सारण करणे, तळभाग दुरस्त करणे व ते स्वच्छ करणे

नाल्यांच्या दुतर्फा असलेल्या वस्त्या पुरांच्या दृष्टीने असुरक्षित आहेत. तसेच त्यांचे निस्सारण व तळभाग दुरस्ती न झाल्याने व त्यातील गाळ नियमितपणे काढण्यात येत नसल्याने यांपैकी बहुतेक नाले भरुन वाहू लागतात आणि तुंबतात. नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगर अभियंत्यांच्या विभागांच्या मार्फत नाल्यांचे निस्सारण करण्याचा, त्यांचे तळ भाग दुरुस्त करण्याचा व त्यांची सफाई करण्याचा एक कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे. यासाठी नाल्याच्या बाजूस असलेल्या काही वस्त्यांचे स्थलांतर करावे लागण्याची शक्यता आहे.

## पावसाळी पाण्याच्या निचरावाहिन्यांची क्षमता वाढवणे

पावसाळी पाण्याच्या निचर वाहिन्यांची सध्याची क्षमता वाढवण्याची गरज असून, महाराष्ट्र शासन आणि नवी मुंबई महानगरपालिका त्यावर गांभीर्याने विचार करीत आहे. सध्याची ही समस्या लक्षात येता पावसाळी पाणी धारण करुन ठेवणाऱ्या नैसगिक धारक जलाशयांवर (होल्डिंग पॉन्डस) कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करण्यास आणि त्यात भराव टाकून ते बुजविण्यास परवानगी देण्यात येणार नाही यांची करण्याच्या प्रस्तावामुळे पावसाळी पाण्याच्या निचरा वाहिन्यांच्या क्षमतेत आणखी वाढ होईल आणि किनाऱ्यावरील प्रदूषणही कमी होईल. या वाहिन्या एकमेकांपासून वेगळया करण्यामागील दुहेरी उद्दिष्टे या प्रकल्पाची लवकरात लवकर अमंलबजावणी करुन अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

## संकटकाळीत सेवांचा दर्जा सुधारणे

आपती नंतर पुरवावयाच्या पोलीसदल, अग्निशमन दल आणि रुग्णालये यांच्या संकलकालीन सेवांमध्ये आतापर्यंत साधनसामग्री आणि सुविधा यांच्यामुळे बऱ्याचदा अडथळा निर्माण होऊ असतो. हे विभाग सध्या ज्या बाबींमुळे त्यांना त्यांची आपत्ती नंतरची कामे सुलभ रितीने करण्यास मदत होईल अशा बाबी निश्चित करण्याचे काम करीत आहेत. निश्चित करण्यात आलेल्या अशा बाबी प्राप्त करण्यास या सेवांना सहाय्य

करणे हा आपत्तीची तीव्रता कमी करण्याच्या कार्यतंत्राचाच एक भाग असेल.

**धोकादायक उद्योगांची कामांच्या ठिकाणी आपत्तीच्या मुकबला करण्याची असणारी क्षमता वाढविणे**

सध्या प्रत्येक धोकादायक उद्योगाकडे यांच्या कामाच्या ठिकाणी पुरेशा अग्निशमन क्षमतेसह त्यांची आपत्ती व्यवस्थापन योजना तयार असणे अपेक्षित आहे. तथापि या उद्योगांकडे या संबंधात असलेल्या क्षमता खूपच अपुऱ्या असल्याचे व यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलावर अधिक ताण पडत असल्याचे आढळून आले आहे. अग्निशमन दलाकडून प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्याची व्यवस्थाकरुन त्यांची क्षमता वाढविण्याच्या कार्यक्रमामुळे हे उद्योग भविष्यात त्यांचा कामाच्या ठिकाणी उद्‌भवणाऱ्या आपत्तींच्या मुकाबला करण्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण होण्यास व तसेच नागरी प्रशासनास अतिरिक्त साधनस्त्रोत उपलब्ध होण्यास मदत होईल.

### ४.१.३ गृहनिर्माण विषयावर पायाभूत सोयी

**उपकर प्राप्त इमारतींचे रिट्रोकिटिंग आणि नवीकरण**

गृहनिर्माणासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सोयींची कामे सुरुवातीला सिडकोकडून करण्यात आली.ही कामे अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण वसाहती म्हणून निर्देशिद केल्या जाणाऱ्या नेरुळ, वाशी, कोपरखैरणे येथील वसाहतीतील होती. गृहनिर्माणाच्या या पायाभूत सोयींची दुरुस्ती करण्याची व काही मर्यादेपर्यंत त्यांचे पुर्नबांधकाम करण्याची गरज आहे. सिडकोकडून केल्या जाणाऱ्या दुरुस्ती व पुर्नबांधकाम करण्याच्या कामात त्या संबंधातील लक्ष्ये साध्य करण्याच्या बाबतीत विविध कारणांमुळे आणि विशेषत:आर्थिक कारणांमुळे व्हिलेवाट झाली आहे. आपत्तींची तीव्रता कमी करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सिडकोने या उपकर प्राप्त इमारतींची दुरुस्ती करतांना भूकंप आणि चक्री वादळ यांचे संभाव्य आधानही विचारात घेण्यात येतील याची खात्री करुन घेतली पाहिजे. यासाठी अतिरिक्त निधी आवश्यक असेल तसेच रिट्रोफिटिंग करावयाच्या इमारती निश्‍चित करण्याची व त्याबाबतीत योग्य ते तांत्रिक विकल्प उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

**नियमबाहय वसाहती**

बहुतांशी प्रभागांमध्ये प्रभागाच्या दक्षिण भागात किनारपट्टीला लागून अनेक नियमबाहय वसाहती आहेत. या आधी नमूद करण्यात आल्याप्रमाणे, घरे बांधण्यासाठी वापरण्यात आलेल्या निकृष्ट सामग्रीमुळे या वसाहती चक्रीवादळाच्या धोक्याच्या दृष्टीने या वसाहतीमंधील घरांच्या दर्जात सुधारणा करण्याची गरज आहे. वसाहतींच्या सुधारणा करण्याच्या सध्याच्या तरतूदीच्यानुसार अनेक कार्यक्रम हाती घेण्यात आले, तथापि त्यांना मर्यादित प्रमाणात यश मिळाले. सध्या वाल्मिकी आंबेडकर आवास योजना,

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान हे निवाऱ्याच्या दर्जात सुधारणा करण्याचे महत्वाचे कार्यक्रम आहेत. या झोपडपट्ट्यांना नागरी भागातील मुलभूत सेवा (बीएसयूपी) आणि दलित विकास सुधार योजना (डीव्हीएसवाय) याद्वारे मुलभूत स्वरूपाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

नियमबाह्य वसाहतींची फार मोठी संख्या लक्षात घेता, सध्याच्या धोरणांना निवारा सोयीत सुधारणा करण्याच्या पूरक कार्यतंत्राची जोड द्यावी लागेल. या संदर्भात मुंबई नागरी विकास प्रकल्पांतर्गत (बीयूडीपी) झोपडपट्टी दर्जा सुधारणा कार्यक्रम (एसयूपी) हाती घेण्याचा पुनर्विचार करता येईल. झोपडपट्टी दर्जा सुधार कार्यांतर्गत वसाहतींच्या सहकारी गृह निर्माण संस्थांना सामुहिक धारणाधिकार (भाडेपट्टा धारणा हक्क) दिल्यामुळे आणि निवाऱ्याचा दर्जा सुधारण्यास त्यांना उत्तेजन दिल्यामुळे स्वयंसहाय्य प्रक्रियेमध्ये जनसमूहांना सहभागी करून घेण्याच्या शक्यता दिसून आल्या आहेत. या योजनेखाली समाधानकारक मानकांपर्यंत पायाभूत सोयींचा दर्जा सुधारण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे निवाऱ्याच्या संबंधात सुधारणा करण्याच्या अशा कार्यतंत्रांमध्ये आपत्तींची तीव्रता कमी करण्याचा आणि त्याद्वारे या वसाहतींची असुरक्षितता कमी करण्याचा घटकही विचारात घेणे आवश्यक झालेले आहे.

किमान पोच रस्ते : अग्निशमन दल आणि रूग्णवाहिका यांच्यासाठी किमान पोच रस्ते असावेत यासाठी जेथे पोहोचण्यासाठी योग्य रस्ते नसतील अशा वसाहतींची कामे झोपडपट्टी सुधार कार्यक्रमांसाठी अग्रक्रमाने हाती घेण्यात यावीत. तांत्रिकदृष्ट्या ज्याबाबतीत हे शक्य नसेल त्याबाबतीत या वसाहतींचे सुरक्षित जागी स्थलांतर करण्याचे काम हाती घेण्यात यावे.

## ४.२ : जनसंपर्क व सार्वजनिक माहिती यंत्रणा -

सार्वजनिक माहिती यंत्रणेच्या अंतर्गत जनतेला आपत्तीच्या संदर्भात धोका निर्धारणाच्या टप्प्यापासून आपत्ती व्यवस्थापनाच्या संपूर्ण प्रक्रियेची जाणीव करून देणे व माहिती पुरविणे आवश्यक असते. सार्वजनिक माहिती यंत्रणा सार्थपणे वापरली जावी यासाठी आधी फार मोठ्या प्रमाणात जनसमूहाचे शिक्षण उपक्रम निर्माण करणे, योजनेचा प्रसार आणि सिध्दतेचा सराव या गोष्टी होण्याची आवश्यकता आहे. ही विशिष्ट कामे आपत्ती व्यवस्थापन योजनेत नमूद देखील करण्यात आलेली आहेत. योजनेच्या प्रसार आणि सिध्दता या कामांमध्ये नागरिकांचे गट, अशासकीय संघटना आणि जनाधार संघटना यांना सहभागी करून घेणे हा एक अतिशय महत्त्वाचा घटक असणार आहे. त्याशिवाय इशारा यंत्रणांची माहिती करून देणे आणि अशा यंत्रणांच्या इशाऱ्यानंतर करावयाच्या उपाययोजनांच्या नियमित सराव आणि आपत्तीच्या परिस्थितीत जनतेने काम करावे आणि काय करू नये याविषयीच्या

सूचना अशाही उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. संबंधित संस्था अशी कामे हाती घेण्यास सांगण्यात आले आहे.

### ४.२.१ : बिनतारी संदेशवहन -

कार्यक्षमरितीने समन्वय साधला जावा आणि आपत्तीनंतरचे काम प्रभावीपणे करता यावे यासाठी नवी मुबंई महानगरपालिका, पोलिस दल, अग्निशमन दल, पालिका/शासकीय रूग्णालये, हवामान केंद्र व वाहतूक यंत्रणा यासारख्या अंमलबजावणी करणाऱ्या विभागांमधील संदेशवहन सुव्यवस्थित असणे आवश्यक आहे. अधिक कार्यक्षम बिनतारी यंत्रणा बसवून सध्याच्या संदेशवहन यंत्रणेचा दर्जा वाढवून हे करता येईल. अशी बिनतारी यंत्रणा उभयदिशापारेषक (फुल ड्युप्लेक्स) असावी आणि तिच्याद्वारे वेगवेगळ्या अंमलबजावणी करणाऱ्या विभागांना संपर्क करणे शक्य होईल.

### ४.२.२ : माहिती फलक -

तसेच, आपत्तीची तीव्रता कमी करण्याचा एक भाग म्हणून माहिती दर्शविणारे इलेक्ट्रॉनिक फलक उभारण्यात यावेत आणि या माहितीफलकांचे संनियंत्रण नवी मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रण कक्षातून केले जाऊ शकेल. प्रदर्शित केले जाणारे संदेश हे आपत्तीच्या वेळी केवळ सूचनात्मक प्रकारचे असतील. प्रदर्शित करण्यात आलेल्या माहितीमुळे आपत्तीनंतर करावयाच्या कृती संबंधात जनतेला मार्गदर्शन मिळेल आणि प्रशासनाला आपत्तीचा परिणाम संबंधित स्थानापुरता मर्यादित ठेवण्यास मदत होईल. सामान्यवेळी याच माहिती फलकांचा वापर सामाजिक प्रश्नांसंबंधात समाजाचे उद्‌बोधन करण्यासाठी आणि आपत्तीच्या सिध्दतेसंबंधातील संदेश प्रसारित करण्यासाठी करता येईल. वाहतूक पोलिस आणि नवी मुंबई महानगरपालिका यांनी हे फलक जेथे उभारता येतील अशी ठिकाणे संयुक्तपणे निश्चित केली आहेत. या संदर्भात सर्व रेल्वे टर्मिनस, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस आगारे, बीईएसटी बस आगार, नवी मुंबई महानगरपालिका वाहतूक आगारे, वाशी चौक, सेक्टर-१७, कोपरखैरणे सेक्टर-७ ही महत्वाची ठिकाणे आहेत.

### ४.२.३ : लोकल गाड्यांमधील जनसंबोधन यंत्रणा -

विशेषत: पावसाळ्यात आणि इतर आकस्मिक घटनांच्यावेळी जनतेला रेल्वे सेवा, बीईएसटी आणि एनएमएमटी या सेवांच्या वाहतुकीच्या स्थिती संबंधात माहिती असावी यासाठी लोकलगाड्यांच्या सर्व डब्यांमध्ये जनसंबोधन यंत्रणा बसविण्याची गरज आहे. याबाबतीत गार्ड आणि रेल्वेस्थानके यांच्यामध्ये बिनतारी संदेशवहनाची व्यवस्था असणेदेखील जरूरीचे आहे. अशा यंत्रणेमुळे प्रवाशांना त्यांच्या प्रवास करण्यासंबंधात योग्यवेळी निर्णय घेणे शक्य होईल.

### ४.२.४ : रेल्वे स्थानके आणि बस स्थानके येथील जनसंबोधन यंत्रणा -

नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सर्व रेल्वेस्थानके, बीईएसटी, एनएमएमटीची बस आगारे, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस आगारे जेथे प्रवाशांना वाहतुकीच्या स्थितीसंबंधात अद्ययावत माहिती मिळावी यासाठी जनसंबोधन यंत्रणेची सुविधा उपलब्ध असावी.

### ४.२.५ : केबल टी.व्ही. नेटवर्क–

केबल टी.व्ही. नेटवर्कवर प्रदर्शित करण्यात आलेल्या माहितीमुळे नागरिकांना त्यांच्या प्रवासासंबंधात निर्णय घेण्यास मदत होईल. केबल टी.व्ही. चालकांचा ग्राहक वर्ग स्थानिक असल्याने पुरविण्यात यावयाची माहिती प्रभागनिहाय करावी लागेल.

### ४.२.६ : जागतिक माहिती सेवा (जीआयएस) -

नवी मुंबईतील सर्व पायाभूत सोयी आणि सुविधा या बहुवापरकर्ता तत्वावर जागतिक माहिती सेवा यंत्रणेचा वापर करण्याच्या दृष्टीने अनुरूप करण्याची गरज आहे. म्हणून १:१,००० या प्रमाणात जागतिक माहिती सेवा यंत्रणा विकसित करण्याची आवश्यकता आहे. यामुळे नियोजनकार, प्रशासक आणि तातडीच्या सेवा व सुविधा पुरविणारे यांना सहाय्य होईल.

### ४.२.७ : आकाशवाणी सेवा -

रेडिओ हे एक स्वस्तात उपलब्ध असणारे आणि वीजेची गरज न पडता अनेक दिवस ड्राय सेल बॅटरीवर चालू शकणारे तसेच स्वत:बरोबर कोठेही घेऊन जाता येणारे व वापरण्यास सोपे आणि मोबाईल फोनच्या सेवा पुरवठ्यात जसा अडथळा येतो तसा अडथळा न येणारे साधन असल्यामुळे, नवी मुंबई शहर आकाशवाणी केंद्र उभारणे किंवा नियंत्रण कक्षासाठी केवळ संकटकाळी आणि आकस्मिक घटनेच्यावेळी वापरता येईल अशी स्पेक्ट्रम फ्रिक्वेन्सी उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे.

### ४.३ : जमीन वापराविषयक धोरण व नियोजन :

नवी मुंबई महानगरपालिका प्रदेशासाठी तयार करण्यात आलेल्या सिडकोच्या प्रादेशिक योजनेत जमीन वापराविषयक धोरणाच्या मुलभूत तत्वांची तरतूद करण्यात आलेली आहे आणि नियोजनाची दिशा दर्शविण्यात आलेली आहे. या दस्तऐवजामध्ये समाविष्ट असलेल्या धोरणात्मक चौकटीत राहून आणि नमूद करण्यात आलेले प्राधान्य काम लक्षात घेऊन पुढील गोष्टी आपत्तीची तीव्रता कमी करण्याच्या कार्यतंत्राच्या कक्षेत आणता येतील.

नवी मुंबईच्या संबंधातील जनसमूहाची सिध्दता आणि पर्यावरणीय व्यवस्थापन यावरील तपशीलांमधअये, असुरक्षित वसाहती तसेच पदपथ निवासी यांचे प्रकारनिष्ठ वर्गीकरण देण्यात आलेले आहे. सध्याच्या प्रकारनिष्ठ वर्गीकरणामध्ये मालकी आणि विनियमित केले जाण्यासाठी आवश्यक असलेली पात्रता या बाबी विचारात घेतल्या जातात. असुरक्षिततेच्या प्रकारनिष्ठ वर्गीकरणाच्या संदर्भात सध्याच्या वसाहतींचे तपशीलवार

विश्लेषण केल्यामुळे अशा असुरक्षित वसाहतींचे सुरक्षित जागी स्थलांतर करण्याची एक बृहदयोजना तयार करण्यास मदत होईल.

**४.३.२ : जमीन भरावाच्या जागांची सुधारणा व संरक्षण -**

जमीन भरावाच्या सर्व जागांच्या ठिकाणी सर्रास केरकचरा टाकला जात असल्याने व त्यांच्यावर कोणाचीही देखरेख नसल्यामुळे तेथे प्रचंड प्रमाणात नियमबाह्य वसाहती निर्माण झाल्या आहेत आणि त्यामुळे अगोदरच असुरक्षित असलेल्या वसाहतींच्या संख्येत भर पडली आहे असे आढळून येते तसेच त्याची परिणती मातीचे थर टाकून व त्यांचे घनीकरण करून असुरक्षित वसाहती आणि पदपथ निवासी यांच्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अशा जागांचा वापर करण्याची संधी गमावण्यात आली आहे.

**४.३.३ : भराव टाकून जमिनीचे पुन:प्रापण करण्यावर नियंत्रण -**

सध्या अस्तित्वात असलेल्या जलधारण क्षेत्रांचे आणि पावसाळी पाण्याच्या धारक जलाशयांचे विकास नियंत्रण नियम अधिक कडक करून रक्षण करावे लागेल. कोणत्याही अपवादांसाठी तरतूद करणारे खंड विकास नियंत्रण नियमातून काढून टाकण्यात यावेत.

**४.३.४ : साठवण करणारी व धोकाधायक युनिटे निवासी क्षेत्रांतून अन्यत्र हलविणे -**

एक धोरणात्मक बाब म्हणून निवासी क्षेत्रांमध्ये धोकादायक सामग्रीची साठवण व प्रक्रिया करण्यास सामान्यत: मनाई करण्यात आलेली आहे. तथापि सध्याची परिस्थिती पाहता अशा युनिटांना निवासी क्षेत्रांतून स्थलांतर करण्यास विविध प्रोत्साहने देऊन आणि नंतर त्यासंबंधात अंमलबजावणी करून जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. हे काम क्षेत्रनिहाय पातळीवर म्हणजे प्रभाग पातळीवर करावे लागेल. अशा युनिटांची एक प्रभागनिहाय सूची नवी मुंबई महानगरपालिकेकडे उपलब्ध देखील आहे आणि तिच्या आधारे टप्प्यांटप्प्यांचा एक कार्यक्रम तयार करता येईल.

**४.३.५ : दाटी कमी करणे -**

नवी मुंबई हे एक सुनियोजित शहर असल्याने पायाभूत सोयींच्या संबंधात ते आपल्या क्षमतेच्या कमाल मर्यादेपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. मुख्य शहराची दाटी कमी करण्याचे धोरण म्हणून महाराष्ट्र शासन, नवी मुंबईच्या दहिसर प्रभागासारख्या नवीन वसाहती विकसित करण्यासाठी जमिनीच्या निर्देशित विकास योजनांची अंमलबजावणी करण्याच्या धोरणाचा पाठपुरावा करीत आहे. त्याचबरोबर बंदर, कृषी, लोखंड बाजार व इतर घाऊक बाजार यासारख्या काही मोठ्या व्यापारी कार्यव्यवहारांचे नवी मुंबईच्या बाहेर स्थलांतर करून रोजगारही अन्यत्र हलविण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. कामाचे स्थाननिश्चयन आणि पायाभूत सोयींचा विकास यांचा समावेश करण्याचे धोरण राबवून मुंबई महानगर प्रदेशात प्रादेशिक विकेंद्रीकरण करण्याच्या संभाव्य क्षमतांचा आणखी वापर करून घेण्याची आवश्यकता आहे.

# समन्वय यंत्रणांची आवश्यकता

## भाग - ५

## ५. समन्वय यंत्रणांची आवश्यकता :

### ५.१ : नवी मुंबईची खास वैशिष्ट्ये -

नवी मुंबई शहर आणि ठाणे जिल्हाधिकारी असे करण्यात आलेले विभाजन हे अधिकतर महसुली प्रशासकीय व्यवस्था आहे तर संपूर्ण नवी मुंबईसाठी एक महानगरपालिका असून पालिकासेवांच्या व्यवस्थापनासाठी तिची ८ प्रभागांमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. आपत्ती व्यवस्थानाच्या सर्व बाबतीत जिल्हाधिकारी हे पालिका आयुक्तांना सहाय्य करतील. नवी मुंबईमध्ये सध्या पुढीलप्रमाणे नियंत्रण कक्ष आहेत -

(१) बृहन्मुंबईसाठी असणारा जिल्हा नियंत्रण कक्ष

(२) मुंबई उपनगर जिल्हा नियंत्रण कक्ष

(३) ठाणे जिल्हा नियंत्रण कक्ष

(४) रायगड जिल्हा नियंत्रण कक्ष

(५) नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्ष

(६) पोलिस नियंत्रण कक्ष

(७) अग्निशमन दल नियंत्रण कक्ष

(८) बीईएसटी नियंत्रण कक्ष वाशी

(९) नवी मुंबई महानगरपालिका परिवहन नियंत्रण कक्ष

(१०) रेल्वे नियंत्रण कक्ष

(११) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नियंत्रण कक्ष

(१२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नियंत्रण कक्ष

याशिवाय अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या खास विनंतीवरून, सेनादलाकडून, लोकांचे स्थलांतर करणे, वैद्यकीय सहाय्य, सहाय्याची तरतूद आणि मदत छावण्या उभारणे, संदेशवहन सहाय्य, हाती पोहोचलेल्या पायभूत सोयींची दुरूस्ती, आंतरराष्ट्रीय सहाय्याचे व्यवस्थापन इत्यादींसाठी मदत मिळविता येते. सेवादलाच्या नियंत्रणकक्षाद्वारे या कामांचा समन्वय साधण्यात येईल आणि हा नियंत्रण कक्ष समन्वय यंत्रणेचा एक भाग असेल.

पावसाळ्यामध्ये सर्व प्रभाग कार्यालयांमध्ये तात्पुरत्या स्वरूपाचे नियंत्रण कक्ष उभारण्यात येतात. त्याशिवाय नवी मुंबई महानगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग साथीच्या रोगासंबंधीतील दक्षता म्हणून पाण्याच्या दर्जावर दररोज बारकाईने लक्ष ठेवीत असतो. सेवांमधील अंतर्गत समन्वयावर संनियंत्रण ठेवण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये जल व मलजल नियंत्रण कक्षदेखील आहे.

महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेमार्फत सार्वजनिक वाहतुकीची व्यवस्था चालवते आणि जलदगतीने मोठ्या प्रमाणात रेल्वे वाहतूक सेवा हार्बर रेल्वेने उपलब्ध केलेली आहे. सरासरी दशलक्ष प्रवासी या सेवांचा वापर करतात.

त्यामुळे वाहतूक सेवा कोणत्याही प्रकारे खंडित झाल्यास प्रवासी अनेक ठिकाणी आणि विशेषत: स्थानकांमध्ये, प्रवासामध्ये किंवा सीबीडी बेलापूर, नेरूळ, जुईनगर, सानपाडा, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, ऐरोली या जंक्शनच्या ठिकाणी अडकून पडतात.

नव्या मुंबईची वाशी ही वसाहत प्रामुख्याने एक व्यवसाय व व्यापार केंद्र असल्याने येथे प्रवासी कामाच्या ठिकाणी अडकून पडण्याची फार मोठी शक्यता असते. म्हणून या वसाहतींकडे खास लक्ष पुरविण्याची आवश्यकता आहे. मोठ्या प्रमाणात कर्मचारी आणि कामगार हे नवी मुंबईचे लोकनिवास (डॉर्मिटरी) समजल्या जाणाऱ्या ठाणे, रायगड जिल्हा व मुंबई आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे क्षेत्र यातून येत असतात. त्यामुळे नव्या मुंबईत होणाऱ्या कोणत्याही आपत्तीच्या ठाणे, रायगड, मुंबई आणि नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र यांमधील जनतेवरही परिणाम होत असतो. ठाणे जिल्हा नियंत्रण कक्ष, ठाणे महानगरपालिका आणि मुंबई महानगरपालिका यांच्याशी समन्वय साधून ठाणे आणि रायगड येथील प्राधिकरणांचादेखील समन्वय यंत्रणेमध्ये समावेश करण्यात आला आहे.

अनुभवावरून असे दिसून आले आहे की पूर, रेल्वे अपघात यामुळे आणि वीजपुरवठा खंडीत झाल्यामुळे मुख्यत्वेकरून अशा प्रकारे जनजीवन विस्कळीत होते. म्हणून अशा घटनांच्या बाबतीत राज्य व केंद्र शासनाची अभिकरणे आणि स्थानिक प्राधिकरणे यांच्याशी व विशेषत: हार्बर रेल्वे, पोलिस विभाग आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये समन्वय साधण्याची गरज असते.

नवी मुंबई शहराला आणि जवळपासच्या शहरांना अनेक आपत्तींना सामोरे जावे लागले आहे आणि गेली काही वर्षे या आपत्तींची पुरावृत्ती आणि तीव्रता यामध्ये वाढ होत आहे. आपत्तीच्या परिस्थितीमध्ये विविध नियंत्रणकक्ष, नगरपालिका विभाग आणि राज्य शासनाचे विभाग यांचा सक्रिय सहभाग असतो आणि ते आपत्तीच्या संबंधात इशारा देण्याच्या टप्प्यापासून सहाय्य व पुनर्वसन करण्याच्या टप्प्यापर्यंत, आपत्तीनंतरच्या कार्यात सहभागी असतात. यामुळे अनेक प्रधिकरणे आणि अनेकांचे नियंत्रण अशी स्थिती निर्माण होते त्यामुळे प्रभावी समन्वय यंत्रणा आवश्यक ठरते.

# संस्थात्मक स्वरूपाच्या व्यवस्था

# भाग - ६

६.	संस्थात्मक स्वरूपाच्या व्यवस्था

६.१	नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन समिती

६.२	नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन समितीची कामे

६.३	नवी मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन उपसमित्या

## ६. संस्थात्मक स्वरूपाच्या व्यवस्था :

नवी मुंबई महानगरपालिकेच्या व्यवस्था क्षमतेत असतील अशा बहुतांशी आपत्तींच्या संबंधात महानगरपालिका आयुक्त यांची आदेश क्रमांक पर्यावरण आणि वने डीएमयू २००६/सीआर-११/बीएम-१/क्रमांक २३ जुलै २००६ याद्वारे नवी मुंबईसाठी जिल्हा आपत्ती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. नवी मुंबई महानगरपालिका राज्य शासनाच्या प्राधिकरणांकडून कोणताही हस्तक्षेप न होता, आपत्तीच्या संबंधातील कामे करील. संकटकालीन कार्य केंद्रे (इओसी) आणि २ नियंत्रण कक्ष यांसह प्रभाग स्तरावर सर्व ९ प्रभागांसाठी क्षेत्रस्तरीय योजना तयार करण्यात आल्या असून त्यामध्ये प्रभाग आपत्ती व्यवस्थापक म्हणून काम करावे लागणाऱ्या प्रभाग अधिकाऱ्याकडे विशिष्ट जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. प्रभाग स्तरावरील अधिकाऱ्यांवर सोपविण्यात यावेळी आपत्ती व्यवस्थापकाची कामे भाग-११ मध्ये देण्यात आली आहे.

तथापि, ज्याबाबतीत केंद्रशासनाच्या अभिकरणांसह विविध प्रकारच्या संस्थांशी समन्वय साधणे आवश्यक असते अशा असाधारण स्वरूपाची फार मोठी व्याप्ती असलेल्या आपत्तींच्या बाबतीत अप्पर मुख्य सचिव (गृह) हे नव्या मुंबईतील आपत्तींची स्थिती हाताळण्यासाठी महानगरपालिकेस विविध शासकीय संघटनांकडून सहाय्य उपलब्ध करून देण्यात महत्वाची भूमिका बजावू शकतील.

आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतरच्या कामात आणि आपत्ती उद्‌भवल्यावर त्यानंतरच्या कामात समन्वय साधण्याच्या व्यवस्था वेगवेगळ्या तक्त्यांमध्ये दिल्या आहेत.

## ६.१ नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन समिती :

माननीय महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली काम करणारी एक नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन समिती असेल त्या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल.

**माननीय महानगरपालिका आयुक्त**
**अध्यक्ष**

| | | |
|---|---|---|
| १. | उप आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन) | सदस्य सचिव |
| २. | अतिरिक्त आयुक्त | सदस्य |
| ३. | उप आयुक्त (परिमंडळ -१) | सदस्य |
| ४. | उप आयुक्त (परिमंडळ -२) | सदस्य |
| ५. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | सदस्य |
| ६. | शहर अभियंता | सदस्य |
| ७. | अतिरिक्त शहर अभियंता | सदस्य |
| ८. | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ९. | कार्यकारी अभियंता (विद्युत) | सदस्य |
| १०. | परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम | सदस्य |
| ११. | अग्निशमन अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| १२. | पोलिस उपआयुक्त - परिमंडळ १, नवी मुंबई | सदस्य |
| १३. | पोलिस सहाय्यक आयुक्त, वाहतूक, नवी मुंबई | सदस्य |
| १४. | कमांडंट, आरएएफ | सदस्य |
| १५. | उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल | सदस्य |
| १६. | उपप्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| १७. | विभागीय अधिकारी / कार्यकारी अभियंता (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) | सदस्य |
| १८. | विभागीय अधिकारी (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई) | सदस्य |
| १९. | शिधावाटप अधिकारी, नवी मुंबई | सदस्य |
| २०. | महाव्यवस्थापक (तांत्रिकी), सिडको | सदस्य |
| २१. | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | सदस्य |
| २२. | महाव्यवस्थापक, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड, नवी मुंबई | सदस्य |

२३. आगार व्यवस्थापक, देवनार आगार, बीईएसटी, मुंबई सदस्य
२४. विभागीय रेल्वे प्रबंधक, सीएसटी, मुंबई सदस्य
२५. उपसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य सदस्य
२६. अशासकीय संघटना, अनिरूध्दाज ॲकडमी ऑफ डिजास्टर मॅनेंजमेंट सदस्य
२७. अशासकीय संस्था ठाणे-बेलापूर औद्योगिक संघटना (सहसचिव) सदस्य
२७. अशासकीय संस्था सर्व भ्रमणध्वनी चालवणाऱ्या संस्था सदस्य
२८. अशासकीय संस्था रेडिओ चालवणारे संस्था रेडिओ सिटी सदस्य

आपत्तीचा प्रकार आणि तिची तीव्रता लक्षात घेऊन पालिका आयुक्त समितीवर आवश्यक त्या व्यक्तींची नियुक्ती करू शकतील.

## ६.२ : नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन समितीची कामे -

नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील :
(१) सर्व विभागांमध्ये प्रभावीपणे आंतरविभागीय समन्वय साधला जाण्याची सुनिश्चिती करणे
(२) आवश्यक असेल तेव्हा धोरणात्मक निर्णय घेणे.
(३) आपत्तीच्या स्थितीविषयी शासनाला वेळोवेळी माहिती पुरविणे.
(४) नवी मुंबई महानगरपालिकेचा नियंत्रण कक्ष, पोलिस नियंत्रण कक्ष आणि सेवादल नियंत्रण कक्ष यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या आपत्तीसंबंधातील कार्य अहवालांचा आढावा घेणे आणि योग्य ते निर्देश देणे.
(५) पुढील संबंधित आणि केंद्र शासनाच्या प्राधिकरणांच्या कामांमध्ये समन्वय साधणे. संरक्षण दले, राज्य राखीव पोलिस, आरपीएफ, तटरक्षक, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, महानगर टेलिफोन निगम, ए ए आय, पोर्ट ट्रस्ट, एफसीआय, दूरदर्शन, आकाशवाणी, हवामान शाखाविभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भाभा अणुसंशोधन केंद्र.

माननीय पालिका आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन योजनेच्या संबंधात, सिध्दतेच्या उपाययोजनांचा एक भाग म्हणून आणि विचारविमर्श करण्यासाठी एक अनौपचारिक गट (केंद्रक समिती) तयार करू शकतील. या केंद्रक गटामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असू शकेल व हा गट साधनसामग्री विशेषत: गॅस गळती, घरांची पडझड इत्यादींसारख्या विशिष्ट आपत्ती संबंधात (खाली दिलेल्याप्रमाणे) खास प्रकारची साधनसामग्री उपलब्ध करून ती कामी लावण्यामध्ये आणि अधिक चांगल्या समन्वयासाठी सहाय्य करण्याच्या दृष्टीने वरचेवर आपल्या बैठकी घेऊ शकेल.

**साधनसामग्रीच्या उपाययोजनांसाठी आवश्यक असलेली सामग्री/साधने -**

- रूग्णवाहिका
- नौका/बचाव नौका
- बसगाड्या
- बांधकाम पाडण्याची साधने (क्रेन्स)
- ड्रिलींग रिग्ज (वेधन उपकरण संच)
- मृदावाही उपस्कर
- फोम टेंडर्स
- जनित्रे
- हॅम संच
- हेलिकॉप्टर सेवा
- मोबाईल ट्रॉमा केअर व्हॅन्स
- फिरते क्ष-किरण युनिट
- जनसंबोधन यंत्रणा
- डिझेलवर आणि वीजेवर चालणारे पंप
- स्वयंश्वसन (सेल्फ ब्रिदिंग) उपकरणे
- स्नीफर कुत्रे
- टॅन्कर्स
- तंबू
- टॉक्सिक गॅस मास्क
- कार्पीय (ट्रॅक्टर)
- ट्रक्स
- बॅटरीसह व्हीएचएफ संच
- बिनतारी (वायरलेस) संच

## ६.३ : नवी मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन उपसमिती -

आपत्ती नंतरची कार्यवाही वेगाने व प्रभावीपणे केली जावी यासाठी आपत्ती संबंधातील कामांची अंमलबजावणी नवी मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल. या कामांवर बारकाईने देखरेख ठेवण्याची जबाबदारीदेखील या समितीवर असेल. अशी समिती ही स्थायी स्वरूपाची समिती असेल. या उपसमित्यांची रचना पुढीलप्रमाणे असेल.

**६.३.१ : बचाव काम समिती** आपत्तीच्यावेळी नागरिकांचा बचाव करण्यासाठी प्रत्येकी ३६ सदस्य असलेली तीन बचाव पथके गठीत करण्यात येतील व त्या पथकांमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल.

| | |
|---|---|
| (१) अग्निशमन अधिकारी | - मुख्य अधिकारी |
| (२) अग्निशामक (फायरमेन) | - ९ सदस्य |
| (३) नवी मुंबई महानगरपालिकेचे नागरी संरक्षणाविषयक प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी | - ९ सदस्य |
| (४) नवी मुंबईत राहणारे गृहरक्षक (होमगार्ड) | - ९ सदस्य |
| (५) पोलिस कर्मचारी | - ९ सदस्य |

### ६.३.२ : संरचनात्मकदृढता समिती -

बांधकामाच्या मजबूतीविषयी सुनिश्चिती करणे आणि विकासाची कामे सर्वसाधारण विकास नियंत्रण विनियमांच्या मानांकानुसार होत असल्यासंबंधात संनियंत्रण करणे हे या समितीचे प्रयोजन असेल.

| | |
|---|---|
| (१) नगर अभियंता | अध्यक्ष |
| (२) पालिका उप आयुक्त (आ.व्य.) | सदस्य |
| (३) अप्पर नगर अभियंता | सदस्य |
| (४) नगररचना अधिकारी | सदस्य |

### ६.३.३ : प्रशिक्षण व विकास समिती -

कर्मचारी व नागरिक यांना आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षण देऊन तयार करणे हे या समितीचे प्रयोजन असेल.

| | |
|---|---|
| (१) पालिका उप आयुक्त (आ.व्य.) | अध्यक्ष |
| (२) पालिका उपआयुक्त (प्रशासन) | सदस्य |
| (३) पालिका सहआयुक्त (अतिक्रमण) | सदस्य |
| (४) पालिका सहआयुक्त (योजना) | सदस्य |
| (५) सहाय्यक जनसंपर्क अधिकारी | सदस्य |

**६.३.४ : जनजागृती समिती -** जनतेमध्ये विविध प्रकारच्या आपत्तीसंबंधात आणि आपत्ती व्यवस्थापनातील नागरिकांची जबाबदारी यांविषयी जाणीव निर्माण करणे हे या समितीचे प्रयोजन असेल.

| | |
|---|---|
| (१) पालिका उपआयुक्त (प्रशासन) | अध्यक्ष |
| (२) पालिका सहआयुक्त (योजना) | सदस्य |
| (३) पालिका सहआयुक्त (क्षेत्र) | सदस्य |
| (४) सहाय्यक जनसंपर्क अधिकारी | सदस्य |

# नियंत्रण कक्षांची कामे

# भाग - ७

७. नियंत्रण कक्षांची कामे
७.१ पोलिस नियंत्रण कक्ष
७.२ नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्ष
७.३ अग्निशमन दल नियंत्रण कक्ष
७.४ रेल्वे नियंत्रण कक्ष
७.५ नवी मुंबई जिल्ह्याचा जिल्हा नियंत्रण कक्ष
७.६ नवी मुंबई महानगरपालिका आणि राज्य शासन यांची आपत्तीच्या काळातील आरोग्यविषयक कामे.
७.७ नागरी संरक्षण नियंत्रण कक्ष
७.८ सेनादल नियंत्रण कक्ष

## ७. नियंत्रण कक्षांची कामे -

विविध अंमलबजावणी विभागांच्या अधिकारक्षेत्रातील नियंत्रण कक्षांवर, त्या प्रत्येक नियंत्रण कक्षासमोर नमूद करण्यात आलेल्या सेवा आणि कामे यांच्या संबंधात समन्वय साधाण्याची व ती अधिक सुकर करण्याची जबाबदारी असेल. हे नियंत्रण कक्ष त्यांच्या संबंधित विभागांचा कर्मचारी वर्ग उपलब्ध होण्याची आणि कार्यरत होण्याची खात्री करून घेतील. संकटकालीन परिस्थितीमध्ये नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षा कडून अतिरिक्त मदत मागविता येईल.

## ७.१ : पोलिस नियंत्रण कक्ष -

- नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षाशी समन्वय साधणे.
- वाहने आणि पादचारी यांची वाहतूक मर्यादित करण्यासाठी संबंधित भागाची घेराबंदी करणे.
- वाचविण्यात आलेल्या / आपत्तीग्रस्त लोकांना रूग्णालयात हलविणे.
- बचावार्थ आणि मदत कार्य करणारे कर्मचारी/वाहने सहजरित्या आपत्तीच्या ठिकाणी पोहचू शकतील याची तरतूद करणे.
- प्रेतांची विल्हेवाट लावणे.
- कायदा व सुव्यवस्था राखणे.
- आवश्यक असेल त्याप्रमाणे व तेथे, त्यावेळी बीईएसटी/एनएमएमटी/केडीएमटी आणि एमएसआरटीसी (एसटी) यांच्याशी समन्वय साधून वाहतूक दुसऱ्या मार्गांवर वळविणे.
- जनप्रचारमाध्यमे आणि समाज यांना माहिती पुरविण्यासाठी माहिती केंद्रे उभारणे.
- नवी मुंबई महानगरपालिका/बीईएसटी/केडीएमटी आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या नियंत्रण कक्षांशी समन्वय साधणे म्हणून नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन

कृती योजनांमध्ये, विविध नियंत्रण कक्ष, महानगरपालिकेचे विभाग, राज्य शासनाचे विभाग यांनी एकमेकांशी आणि राज्यपातळीवर समन्वय साधण्याची तरतूद करण्यात आली आहे.

## ७.२ : नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्ष -

खाली नमूद करण्यात आलेली कामे पार पाडण्याबरोबरच एक केंद्रीभूत नियंत्रण कक्ष म्हणून असलेल्या आपल्या अधिकारात नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्ष हा आपत्तीच्या ठिकाणी काम करणाऱ्या सर्व अंमलबजावणी विभागांच्या आणि संस्थांच्या कामांच्या संबंधात सर्व इतर प्रभाग नियंत्रणकक्षांकडून मिळणाऱ्या सहाय्यामध्ये समन्वय साधण्यासही जबाबदार असेल. नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्ष जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून खाजगी वाहने, तात्पुरत्या निवाऱ्याच्या जागा आणि इतर साधने यांचे अधिग्रहण करण्यासाठी सहाय्य मिळू शकेल.

### नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षाची क्षेत्र स्तरावरील/विभाग स्तरावरील प्रचलात्मक कामे पुढीलप्रमाणे आहेत :

- पाणी आणि तयार अन्नपदार्थ यांचा तातडीने पुरवठा करणे.
- अडकून पडलेल्या आणि असहाय्य लोकांना अन्यत्र हलविणे.
- गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेल्या लोकांना तातडीने रूग्णालयात नेण्यासाठी वाहनांची व्यवस्था करणे.
- तात्पुरते निवारे उभारणे.
- सामानसुमान वाचविण्याची कामे करणे.
- प्रेतांची विल्हेवाट लावणेस मदत करणे
- मदत कार्य पथके, मदत कार्य करणारे कर्मचारी आणि मदत कार्य सामग्री तसेच संबंधित कर्मचारी घटनास्थळी पोहोचावेत यासाठी इतर नियंत्रण कक्षांना सहाय्य करणे.
- विविध नियंत्रण कक्षांनी मागणी केलेल्या जादा साधनसामग्रीविषयी संकटकालीन कार्यकेंद्रास कळविणे.
- संकटकालीन कार्यकेंद्राशी संपर्क प्रस्थापित करणे.
- परस्परसहाय्य व अनुक्रिया (रिस्पॉन्स) गट तयार करणे.
- अशासकीय संघटना समन्वयन समिती तयार करणे.
- खाजगी देणगीदार यांच्याकडून प्राप्त झालेली मदत पोहविणे.
- संकटकालीन कार्यकेंद्राला प्राथमिक माहिती अहवाल पाठविणे.
- सर्व माहिती आणि संकटकालीन कार्यकेंद्राने मागविलेली कोणतीही इतर माहिती त्या केंद्रास पाठविणे.

- कर्मचारीवर्ग आणि साधनसामग्री तैनात केल्यासंबंधात किंवा त्यांची कुमक पाठविल्यासंबंधात संकटकालीन कार्यकेंद्रास कळविणे.
- सर्व विभाग अधिकारी आणि आपत्ती कार्यावर नियुक्त असलेले अन्य अधिकारी यांना त्यांची सहजरित्या ओळख पटावी यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेचे चिन्ह असलेल्या खांद्यावर लावायच्या फिती (शोल्डर बॅण्डस्) देणे.
- मदतकार्य करणारे कर्मचारी तसेच अशासकीय संघटनांतील व्यक्ती यांना प्रवेशपत्रे आणि ओळखपत्रे देणे.
- अशासकीय संघटनांमध्ये समन्वय यंत्रणा निर्माण करून समाजाची सहभागिता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ते सहाय्य देऊन अशासकीय संघटनांच्या कामांमध्ये समन्वय साधणे. समितीवर काम करण्यासाठी अशासकीय संघटना निश्चित करणे, विशिष्ट स्वरूपाची कामे खास कार्यगटाकडे सोपविणे व त्यासंबंधात संकटकाली कार्यकेंद्रास कळविणे, विशेष क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संघटनांकडे आपत्तीनंतर करावयाची विशिष्ट कामे सोपविणे व त्यासंबंधात संकटकालीन कार्यकेंद्रास कळविणे, अशासकीय संघटना आणि इतर संघटना व तसेच खाजगी देणगीदार यांच्याकडून थेट करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक सामग्रीच्या वाटपामध्ये समन्वय साधणे, शासकीय किंवा अशासकीय यंत्रणाद्वारे प्राप्त होणाऱ्या मदत सामग्रीचे प्रापण व वाटप यासंबंधात अहवाल देणे, समाजाचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी स्वयंसेवकांच्या कार्याचे समुपयोजन करणे व त्यासंबंधात समन्वय साधणे.
- दगडमातीचे ढिगारे (डबर) हलविण्याचे आणि पूरजलाचे नि:स्सारण करण्याचे काम यांचे आयोजन व समन्वय करणे.
- वीजपुरवठा, पाणीपुरवठा, वाहतूक, संदेशवहन, रस्ते, बोटींचे धक्के, पूल, कालवे, सार्वजनिक इमारती यासारख्या नुकसान पोहोचलेल्या पायाभूत सोयींची तात्पुरती दुरूस्ती करणे.
- रेल्वे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि बीईएसटी, खाजगी वाहतूक, व्यावसायिक आणि नौका वाहतूकचालक यांच्याबरोबर वाहतुकीच्या बाबतीत समन्वय साधणे.
- विशिष्ट कालावधीसाठी संकटकाळी रस्त्यांद्वारे पोचमार्ग उपलब्ध करून देण्याची विनंती करणे आणि अशा पोचमार्गाच्या आवश्यकतेसंबंधात संनियंत्रण करणे.
- जनप्रचार माध्यमे आणि समाज यांना माहिती पुरविण्यासाठी माहिती केंद्र उभारणे.
- नवी मुंबईच्या धोका आणि असुरक्षिततेच्या निर्धारणाच्या संबंधातील दस्तऐवजामध्ये अंतर्भूत असलेली सर्व माहिती सर्व इतर नियंत्रण कक्षांना पुरविणे आणि विशेष परिस्थितीत सर्व नियंत्रणकक्षांना आपत्तीप्रवण ठिकाणांसंदर्भा माहिती देणे.

- आपत्तीचा इशारा आणि आपत्तीची घटना यावर संनियंत्रण ठेवणे आणि त्याबाबतीत पुढील संस्थांच्या सल्ल्यानुसार व त्यांच्याशी समन्वय साधून अधिक चांगल्या सिध्दतेच्या आणि नंतरच्या परिणामकारक कार्यवाहीसाठी संकटकालीन कार्यकेंद्राला आणि इतर नियंत्रण कक्षांना कळविणे : हवामानशास्त्र विभाग (अतिवृष्टी, चक्रीवादळे, भरतीच्या लाटा), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, भाभा अणुसंशोधन केंद्र, हवामानशास्त्र विभाग (भूकंप), उद्योग (औद्योगिक व रासायनिक अपघात), अग्निशमनदल, पोलिस (रस्त्यावरील अपघात आणि व्यत्यय), आरोग्य विभाग (बृहन्मुंबई महानगरपालिका/शासन) (साथीचे रोग आणि अन्न विषबाधा)
- इतर नियंत्रणकक्षांशी समन्वय साधणे.
- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कृती योजनेमध्ये समाविष्ट असलेली सर्व माहिती तसेच पुढील माहिती सहज उपलब्ध होईल अशा प्रकारे तयार ठेवणे.
- नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन कृति योजनेमध्ये दिलेल्या साधनसामग्रीची सूची.
- लागू असेल त्याबाबतीत मुख्य सचिव आणि इतर सचिव व तसेच मंत्रालयातील मुंबई आपत्ती व्यवस्थापन समितीचे आणि नवी मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन समितीचे, कार्यालयीन व निवासी दूरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक आणि मोबाईल क्रमांक
- विविध नियंत्रण कक्षातील अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक, नाव, पत्ते आणि लागू असेल त्याबाबतीत पेजर क्रमांक, घटनास्थळी मदतकार्याचे आयोजन व समन्वय करीत असलेल्या व्यक्तींची सूची, नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग स्तरावरील अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक, नावे आणि पत्ते, शहरातील अशासकीय पदाधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक, नावे आणि पत्ते, मुंबई महानगर प्रदेश योजनेत समाविष्ट असलेली नियोजनविषयक माहिती व तसेच आपत्तीच्या घटनास्थळाचा नकाशा आणि इतर क्षेत्रे कोणत्या मर्यादेपर्यंत बाधित होण्याची शक्यता आहे यासंबंधीच्या सूचना इत्यादी पर्यायी मार्ग, पाणीपुरवठा स्त्रोत यांच्या संबंधीची माहिती, बाधित होण्याची शक्यता असलेल्या अत्यावश्यक सेवांचा आराखडा (लेआऊट) इत्यादी.

## ७.३ : अग्निशमक दले नियंत्रण कक्ष

- बचाव कार्य आणि लोकांचे अन्यत्र स्थलांतर करणे.
- सामानसुमान वाचविण्याची कामे करणे.
- वरील सर्व कामांच्या संबंधात नवी मुबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास कळविणे.
- वरील कामे करण्यासाठी कोणतीही जादा साधनसामुग्री आवश्यक असल्यास त्याबाबतीत नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास कळविणे.

## रेल्वे नियंत्रण कक्ष (मध्य रेल्वे) -

- रेल्वे अपघातांच्या संबंधात बचाव कार्य आणि मालमत्ता वाचविण्याची कामे.
- रेल्वे मार्गांवर पुराचे पाणी भरण्याच्या घटनांचे संनियंत्रण आणि सामुहिक वाहतुकीसाठी आवश्यक असलेल्या सेवांसाठी नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षाशी समन्वय साधणे.
- रेल्वेमार्गांवरील भरलेले पाणी काढून टाकण्यासाठी (नि:स्सारण) करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षाशी समन्वय साधणे.
- जनप्रचार माध्यमे आणि समाज यांना माहिती पुरविण्यासाठी माहिती केंद्र उभारणे.
- वरील सर्व कामांच्या संबंधात नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास माहिती कळविणे.
- वरील कामे करण्यासाठी कोणतीही जादा साधनसामग्री आवश्यक असल्यास त्याबाबतीत नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास कळविणे.

## ७.५ : ठाणे जिल्हा नियंत्रण कक्ष -

मदत कार्यासाठी जागा, इमारती, वाहने आणि साधनसामग्री संपादन करणे, संक्रमण शिबिरे उभारणे आणि अन्नवाटपाची व्यवस्था करणे, स्वयंपाकासाठी कोरडा शिधा आणि स्वयंपाकाची भांडी देण्याची व्यवस्था करणे, सानुग्रह प्रदानाची तरतूद करणे, जनप्रचारमाध्यमे आणि समाज यांना माहिती पुरविण्यासाठी माहिती केंद्रे उभारणे या सर्व कामांच्या संबंधात नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रणकक्षास कळविणे. वरील कामे करण्यासाठी कोणत्याही जादा साधनसामग्री आवश्यक असल्यास त्याबाबतीत नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास कळविणे.

## ७.६ : नवी मुंबई महानगरपालिका आणि राज्य शासन यांची आपत्तीच्या काळातील आरोग्यविषयक कामे -

- औषधे आणि प्रथमोपचार तातडीने पुरविणे.
- गंभीर इजा पोहोचल्यास तातडीने उपचार करण्याची तरतूद करणे.
- प्रेतांची विल्हेवाट लावणे.
- प्रतिबंधात्मक वैद्यकीय आणि साथरोग प्रतिबंधक कृती करणे.
- अन्न, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि कचऱ्याची विल्हेवाट यावर बारकाईने लक्ष ठेवणे.
- रूग्णवाहिका आणि त्या जेथे पाठविता येतील अशी रूग्णालये (सार्वजनिक आणि खाजगी) यांची आवश्यकता निश्चित करणे व त्यांची तरतूद करण्याच्या दृष्टीने विशेष माहिती पुरविणे.
- जनप्रचारमाध्यमे आणि जनता यांना माहिती पुरविण्यासाठी माहिती केंद्र उभारणे.

- वरील सर्व कामांच्या संबंधात नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास माहिती पुरविणे.
- वरील कामे करण्यासाठी कोणतीही जादा साधनसामग्री आवश्यक असल्यास त्याबाबतीत नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास कळविणे.

## ७.७ : नागरी संरक्षण कक्ष - बचाव कार्य आणि लोकांचे अन्यत्र स्थलांतर

- वरील सर्व कामांच्या संबंधात नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास माहिती कळविणे.
- वरील कामे करण्यासाठी कोणतीही जादा साधनसामग्री आवश्यक असल्यास त्याबाबतीत नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षास बोलाविणे.

## ७.८ : सेनादल नियंत्रण कक्ष -

- इशारा देण्यात आल्याच्या कालावधीत महत्वाच्या आधारभूत माहितीसाठी नवी मुंबई आपत्ती व्यवस्था समितीबरोबर संपर्क ठेवणे.
- माहिती गोळा करणे आणि योग्य त्या सेनादलाच्या पथकांना दक्ष राहण्याचा इशारा देणे.
- आवश्यकतेनुसार माणसे व साधनसामग्री यांची ने-आण करण्याच्या बाबतीत समन्वय साधणे.
- आवश्यक असेल तर आपत्तीच्या ठिकाणी नागरी संदेशवहन यंत्रणा उभारण्यात येईपर्यंत संदेशवहन यंत्रणा प्रस्थापित करणे आणि नागरी संदेशवहन यंत्रणेस सहाय्यभूत यंत्रणा उभी करणे.
- नागरी प्रशासनाने मागणी केलेल्या सेनादलाच्या सर्व कामांमध्ये समन्वय साधणे.

**आपत्ती उद्‌भल्यास पुढील कामे करण्यासाठी अपर मुख्य सचिव (गृह) हे सेनादलाला विनंती करू शकतात.**

- क्षेत्र (कमांड) व नियंत्रणासाठी पायाभूत सोयी.
- मदतकार्यासाठी क्षेत्र व नियंत्रण संघटना उभारण्यासाठी पायाभूत सोयी पुरविणे हे सेनादलाच्या दृष्टीने महत्वाचे काम असू शकते. यामध्ये संदेशवहन यंत्रणांची (रेडिओ, दूरध्वनी) आणि विशिष्ट क्षेत्रात निपुण असलेल्या मनुष्यबळाची तरतूद करण्याचा समावेश असेल.
- वैद्यकीय सहाय्य उपलब्ध करुन देणे.

## वैद्यकीय पथकांच्या सहाय्याने वैद्यकीय मदत तसेच सेनादलाच्या जवळच्या रूग्णालयांमध्ये उपचार करण्याची तरतूद -

- मदतकार्य सामग्रीची तरतूद करणे.
- बाधित लोकांना पुरवावयाच्या मदत कार्य सामग्रीची वाहतूक करण्यासाठी लष्करी सहाय्य (विमाने, हेलिकॉप्टर्स, बोटी इत्यादी) आणि वाहने यांची तरतूद करणे.
- मदतकार्य शिबिरे स्थापित करणे -
  मदतकार्य शिबिरे उभारणे आणि त्यांच्या कामावर देखरेख ठेवणे ही कामे सेनादलामार्फत केली जाऊ शकतील.
- रस्ते व पूल यांचे बांधकाम व दुरूस्ती -
  मदतकार्य पथके / सामग्री बाधित क्षेत्रापर्यंत पोहचविणे शक्य व्हावे यासाठी रस्ते व पूल यांचे बांधकाम व दुरूस्ती ही कामे सेनादल अभियंत्यांकडून केली जाऊ शकतात. क्रेन्स, बुलडोझर्स आणि जे.सी.बी इत्यादी सारख्या तांत्रिक आणि संयंत्र साधनांची तरतूद करणे.
- अत्यावश्यक सेवांची देखभाल -
  अत्यावश्यक सेवांची दुरूस्ती, देखभाल व त्या चालविणे ही कामे मदतकार्याच्या सुरूवातीच्या टप्प्यात हाती घेता येतील.
- लोकांचे सुरक्षित क्षेत्रात स्थलांतर करणे -
  आपत्तीपूर्वी आणि नंतर लोकांचे सुरक्षित क्षेत्रात स्थलांतर करण्याच्या कामी सहाय्य करणे.
- आंतरराष्ट्रीय मदतीचे व्यवस्थापन -
  आंतरराष्ट्रीय मदतीचे व्यवस्थापन सेनादलाकडून केले जाऊ शकेल.

# अशासकीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था

# भाग - ८

८.     अशासकीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था

८.१    सामुहिक सिध्दतेस उत्तेजन देणे

८.२    परस्पर सहाय्य आणि साधनस्त्रोत गट

८.३    सामुहिक सहभागाचे स्थलांतर

८.३.१ स्थलांतर करताना

८.३.२ आपत्तीच्या वेळी

८.३.३ मदतकार्य व पुनर्वसन करतेवेळी

## ८. अशासकीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था -

अशासकीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था आपत्ती व्यवस्थापनामध्ये फार महत्वाची भूमिका बजावित असतात आणि आपत्ती व्यवस्थापनाचा अनुभव असलेल्या ध्येयनिष्ठ स्वयंसेवकांची एक मजबूत फळी त्या उभी करीत असतात. त्यांनी निवडलेले मनुष्यबळ, यामधील अनौपचारिकता आणि कार्यपध्दतीतील लवचिकता यामध्येच त्यांचे सामर्थ्य सामाविलेले आहे. या संघटनांना बऱ्याच प्रमाणात स्वायत्तता असते आणि त्यामुळे बदलत्या गरजांनुसार त्या तात्काळ कृती करू शकतात.

तथापि, कामांमध्ये एकसमता असावी आणि प्रभावीपणे समन्वय साधता यावा यादृष्टीने त्यांनी पालिका आयुक्तांना साधनसामुग्रीची उपलब्धता, तिचे वाटप आणि आवश्यकता यांच्या संबंधातील संपूर्ण स्थिती जाणून घेणे शक्य व्हावे याकरिता (मार्गदर्शक तत्वांमध्ये दिलेल्या) सेवांच्या मानांकांचा अवलंब करणे, माहितीची देवाणघेवाण करणे आणि संबंधित कामाचा अहवाल देणे इष्ट करेल. म्हणून पालिका आयुक्तांनी अशासकीय संघटनांना एकूण संस्थीय चौकटीत राहून मदत कार्य करण्यासंबंधात विशिष्ट स्वरूपाची कामे नेमून दिलेली आहेत. शक्य असेल त्याप्रमाणे आणि त्याबाबतीत अशासकीय संघटना सेवा पुरविण्याच्या आपल्या दर्जात सुधारणादेखील करतील. त्याशिवाय सामुहिक स्तरावर आणि विशेषत: घरे कोसळण्याच्या घटना, आगी आणि पूर यासारख्या आपत्तींच्या वेळी मोहल्ला समित्या देखील कार्य करीत आहेत. अशा समित्या प्रभाग स्तरावर निश्चित करण्यात आलेल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापनाची कामे करतांना ज्यामध्ये अशासकीय संघटना/खाजगी क्षेत्र यांना सहभागी करून घेता येईल अशी विशिष्ट कामे इत्यादी.

- शोध व बचाव कार्य
- माहिती प्रसारण
- प्रथमोपचार
- मृतदेहांची विल्हेवाट
- हानी निर्धारण
- तात्पुरत्या निवाऱ्यांच्या ठिकाणी माहितीकेंद्रे चालविणे

- वित्तसहाय्यासह मदतसामुग्रीचे संकलन व वाटप
- सामुहिक सुसज्जतेसाठी मनुष्यबळ, जमावावर नियंत्रण, अफवांवर नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन

पुढील संस्थांना मदतकार्यात आणि पुनर्वसनाच्या कामात सहयोगी करून घेण्यात येईल. यापैकी बहुतांशी संस्थांकडे आवश्यक ती साधनसामुग्री उभी करण्याची क्षमता आहे आणि यापूर्वीदेखील त्यांनी मदतकार्य आणि पुनर्वसनाची कामे करण्यात प्रशासनाला सहाय्य केलेले आहे. या संस्थांमध्ये पुढील संस्थांचा समावेश आहे.

- कृषी उत्पन्न बाजार समिती
- एमजीएम ट्रस्ट
- अनिरूध्दाज ॲकडिमी ऑफ डिजास्टर मॅनेंजमेंट ट्रस्ट
- वायएमसीए
- माता अमृतमयी ट्रस्ट
- रोटरी, लायसन्स आणि जायन्टस् यांचे सेवा क्लब
- डी.वाय. पाटील पब्लिक ट्रस्ट
- संत निरंकारी सेवा दल

## ८.१ सामुहिक सिध्दतेस उत्तेजन देणे :

आपत्तींमुळे अत्यावश्यक सेवा खंडीत होऊ शकतात आणि प्रशासन त्यादृष्टीने सिध्द असूनही प्रशासनाला त्याठिकाणी ताबडतोब जाऊन सेवा पुरविणे कधी कधी शक्य होत नाही.

तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न करणे आणि स्थानिक क्षेत्रांसाठी आपत्ती व्यवस्थापन कृती योजना तयार करणे हे या संबंधातील आवश्यक आणि पूर्वावश्यक घटक आहेत. फार थोड्या प्रमाणातील सिध्दतेमुळे परिणामांची व्याप्ती कमी होते आणि नुकसानही कमी होते, निश्चित करण्यात आलेल्या धोक्यांच्या संबंधात जनसमूहाच्या सिध्दतेसाठी व त्यानंतरची कृती करण्याच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशिक्षण व सराव प्रात्यक्षिके आयोजित केल्यामुळे आवश्यक त्या सिध्दतेच्या किंवा स्थलांतर करण्याच्या संबंधातील शासनाच्या क्षमतेत वाढ होऊनही ती अधिक मजबूत होईल. सामुहिक सिध्दतेच्या उपाययोजना करण्याच्या दिशेने केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना सहाय्य करण्याची महानगरपालिकेची इच्छा आहे.

खाजगी क्षेत्रातील युनिटे, अशासकीय संघटना आणि इतर संस्था, सामुहिक सिध्दतेच्या उपाययोजनांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी साधनस्त्रोत गट म्हणून निश्चित करण्यात आलेल्या आहेत. या संस्थांना या संबंधात यशवंतराव चव्हाण प्रशासकीय विकास अकादमी (यशदा) यांच्याद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमातून प्रशिक्षण घेण्याचा लाभ घेणे शक्य होईल. सामुहिक स्तरावर सर्वसाधारण सिध्दता करण्याचा एक भाग

म्हणून अशासकीय संघटना समाजाला ज्या धोक्याला तोंड द्यावयाचे आहे त्या धोक्याच्या स्वरूपाविषयी जाणीव करून देतील. अशा प्रकारे विशिष्ट स्वरूपाच्या असुरक्षिततेच्या संबंधात आर्थिक धोका असलेल्या क्षेत्रांसाठी स्थआनिक आपत्ती व्यवस्थापन कृती योजना तयार करण्यात येतील. ज्या क्षेत्रांमध्ये उद्योगधंद्यांचे आणि विशेषत: धोकादायक सामुग्रीचे उत्पादन, साठवण आणि वाहतूक करणाऱ्या उद्योगांचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झालेले आहे अशा क्षेत्रांसाठी स्थानिक आपत्ती व्यवस्थापन कृती योजना तयार करण्यात येतील. ज्या क्षेत्रांमध्ये उद्योगधंद्यांचे आणि विशेषत: धोकादायक सामुग्रीचे उत्पादन, साठवण आणि वाहतूक करणाऱ्या उद्योगांचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झालेले आहे अशा क्षेत्रांसाठी परस्पर सहाय्य व साधनस्रोत गट स्थापन करण्यात येतील.

## ८.२ परस्पर सहाय्य व साधनस्त्रोत गट -

औद्योगिक क्षेत्र याबाबतीत स्वयंपूर्ण व्हावे हे परस्पर सहाय्य व साधनस्त्रोत गट स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

- औद्योगिक अपघात हाताळण्यासाठी साधनसामुग्री एकत्रित करण्यास उत्तेजन देणे.
- कामाच्या ठिकाणी व कामाच्या ठिकाणाबाहेर होणाऱ्या औद्योगिक अपघातासंबंधात काम करणे.
- आपत्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी चांगल्या दर्जाचे विशेष ज्ञान व नैपुण्य यांची तरतूद करणे.
- आपत्तीनंतरचे कार्य करण्यासाठी लागणारा कालावधी कमी करणे.
- उद्योगाच्या कामाच्या ठिकाणी संबंधातील योजनेचे कामाच्या ठिकाणाबाहेरच्या संबंधातील योजनेशी एकत्रीकरण करणे.
- आपत्तीच्या व्यवस्थापनात महानगरपालिकेस सहाय्य करणे. सदस्य संघटनासाठी प्रशिक्षण आयोजित करण्याच्या कामात ज्या ठिकाणी क्षेत्रातील संस्थांच्या सहयोग घेण्यात येईल त्या संस्थांमध्ये पुढील संस्थांचा समावेश आहे.
    - ठाणे-बेलापूर औद्योगिक संघटना
    - हर्डेलिया केमिकल्स
    - रेलीज

## ८.३ सामुहिक सहभागाचे क्षेत्र :

नवी मुंबई महानगरपालिका आणि आपत्ती स्थळी काम करणाऱ्या अशासकीय संघटना यांनी समाजाचे नीतिधैर्य आणि आत्मविश्वास कायम राखण्याच्या, स्थानिक साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या आणि आपत्तीचे निवारण वेगाने होण्याच्या दृष्टीने त्या संबंधीच्या कामांच्या सर्व टप्प्यांत जास्तीत जास्त प्रमाणात समाजाला सहभागी करून घेण्याची सुनिश्चिती करावी. आपत्ती व्यवस्थापन करतांना अनेक प्रकारचे पर्याय पुढे असतात

व त्या संबंधात तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता असते. या कामात समाज आणि त्याचे प्रतिनिधी सहभागी झाले तर पर्यायाची निवड करण्याच्या संबंधात क्षेत्रीय संस्थावर पडणारा ताण कमी होईल आणि निर्णयासंबंधातील जनतेच्या प्रतिक्रियेची अनिश्चितताही कमी होईल.

स्थानिक गतीशीलता, लोकाचार आणि नवी मुंबईचा अनुभव लक्षात घेऊन जनतेचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे एक योग्य कार्यतंत्र निश्‍चित करण्यात आलेले आहे. समाजाचे सहाय्य व सहभाग मिळविण्याच्या अशा प्रयत्नांमुळे आपत्ती व्यवस्थापनाचा प्रशासनाचा हेतू आणि त्याविषयी प्रशासनाला असलेली आस्था या संबंधात समाजामध्ये विश्वासाची भावना निर्माण झालेली आहे. पुढील गोष्टीवरून समाजाचा सहभाग सुनिश्चित करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

- समाजातील प्रासंगिक, लोकमत घडविणारे आणि विशिष्ट स्थान असणारे नेते निश्चित करणे आणि ही कामे करण्यास ते समर्थ असल्याविषयीचा प्रशासनाचा त्यांच्या प्रति असलेला विश्वास व्यक्त करणे.
- समाजाच्या मदतीची गरज आहे असे स्पष्टपणे सूचित करणारी चर्चा विचार विमर्श आणि सुसंवाद त्यांच्याशी केल्यामुळे समाज आणि त्याचे नेतृत्व करणारे लोक या कामासाठी पुढे येतील.
- माहिती देवाण घेवाण करण्यासाठी नियमित बैठकी आणि पारदर्शकता दर्शविणारा खुला व्यवहार करण्याचे धोरण.
- स्थानिक स्तरावर समाजाला निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे. सामुहिक सहभागाची प्रमुख क्षेत्रे निश्चित करण्यात येत असून ती खंड दोनमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

### ८.३.१ स्थलांतर करताना -

समाजाचे नेतृत्व करणारे लोक आणि जनाधार संघटना यांच्या मदतीने योग्य ती सुरक्षा पुरवून आणि कायदा व सुव्यवस्था राखून स्थलांतर करण्याचे काम करण्यात येईल. एक युनिट म्हणून संपूर्ण कुटुंबाचे स्थलांतर करण्यात येईल. तथापि पळापळ होताना उद्‌भवणारे चेंगराचेंगरीचे प्रकार व संभ्रम टाळण्यासाठी आणि अमर्याद वाहतूक व्यवस्था किंवा हाती असलेला मर्यादित कालावधी त्यांच्या बाबतीत पुढील क्रमाने तातडीने स्थलांतर करण्याचे काम करण्यात येईल.

- गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेले आणि आजारी लोक
- लहान मुले, स्त्रिया आणि अपंग व्यक्ती
- वृध्द व्यक्ती
- धडधाकट व्यक्ती

**स्थलांतर आवश्यक असेल त्याबाबतीत लोकांना पुढील सूचनांचे पालन करण्यास सांगण्यात येईल.**

- आपली घरे/आस्थापना सुरक्षित करा. दारे खिडक्या बंद करा आति त्यास कुलुप लावा.
- पाणी पुरवठ्याची मुख्य झडप (व्हॉल्व्ह) बंद करा आणि वीजपुरवठा बंद करा.
- अडकून पडू नये आणि लवकरात लवकर निघा.
- स्थलांतर करण्यासाठी सुचविण्यात आलेल्या मार्गांचाच वापर करा. जवळचा मार्ग अवलंबू नका. तो धोकादायक असू शकतो.
- पुराचे पाणी भरलेल्या भागातील निचरा वाहिन्यांची झाकणे; पाण्याचा त्वरित निचरा व्हावा म्हणून संबंधित प्राधिकरणांकडून काढून टाकण्यात आली असण्याची आणि ते दर्शविणारे फलक पाण्याच्या जोरदार प्रवाहांमुळे वाहून गेले असण्याची शक्यता असल्याने पुराचे पाणी भरलेल्या भागात जाऊ नका.
- खाली पडलेल्या वीजवाहक तारांपासून दूर रहा.
- पदपथांवरील झाकणे जोरदार प्रवाहामुळे जागेवरून निखळून गेली असण्याची शक्यता असल्याने पदपथांवर चालू नका.

### ८.३.२ : आपत्तीच्या वेळी -

समाजाचे वर्तन पुढीलप्रमाणे असावे याची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींकडे सोपविता येईल.

- लोक शांत राहतील आणि भयोत्पादक वर्तनास उत्तेजन दिले जात नाही. लोकांच्या सैरवरा होणाऱ्या धावपळीचे व जमावाचे नियंत्रण करणे.
- लोकांना सुरक्षित ठिकाणी थांबून राहण्यास आणि इजांपासून स्वत:चे रक्षण करण्यास उत्तेजन देणे.
- लोक हानी पोहोचलेल्या इमारतींमध्ये किंवा बांधकामामध्ये जाणार नाहीत.
- लोक वीजेचे खांब, सेवा वायर्स/केबल्स यांना स्पर्श करणार नाहीत.
- लोक जीव धोक्यात असेल त्याव्यतिरिक्त इतर परिस्थितीत दूरध्वनीचा वापर करणार नाहीत.
- आपत्तीची पुनरावृत्ती, तीव्रतेत झालेली वाढ किंवा अनुषांगिक संकटकालीन स्थिती त्यासाठी समाजाची सिध्दता करणे.
- जखमींची तपासणी, गंभीर स्वरूपात जखमा झालेल्या व्यक्तींना, त्यांना मृत्यूचा किंवा आणखी जखमा होण्याचा लगेच धोका नसेल तर अन्यत्र हलविण्याचा प्रयत्न व पाहणी करणे.
- जलवाहिन्यांचे नुकसान आजमावण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष पाहणी करणे.

- जलवाहिन्यांचे नुकसान झालेले असेल तर मुख्य झडपेच्या ठिकाणी पाणी पुरवठा बंद करणे.
- पोलिस, अग्निशमन दल किंवा मदत कार्य संघटना यांनी विनिर्देशपूर्वक त्यांचे सहाय्य मागितलेले असेल त्याव्यतिरिक्त इतर वेळी लोकांना बाधित क्षेत्रापासून दूर राखणे.
- लोकांना लहान आगी विझविण्यासाठी एकत्रित करणे आणि आत अडकलेल्या लोकांना बाहेर काढणे.
- आपत्तीच्या वेळी विनंती करण्यात आल्यास कायदा व सुव्यवस्था राखण्यास आणि बाहेर काढण्यास आलेल्या मालमत्तेची राखण करण्यास पोलिसांना मदत करणे.

## ८.३.३ : मदतकार्य आण पुनर्वसन करतेवेळी -

आपत्तीनंतर लगेच लोक नैराश्याने खचून गेलेले आणि असहाय्य दिसून येतात परंतु लवकरच त्यांना जेव्हा असे आढळून येते की आपण काही सर्वस्व गमावलेले नाही तेव्हा ते नव्या उमेदीने पुन्हा उभे राहतात. या टप्प्यावर समाजाला सहभागी करून घेतल्यामुळे आपत्तीतून लवकरात लवकर सावरण्यास आणि मानसिक स्वास्थ्य सुधारण्यास मदत होते. समाजातील लोकांना या नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी कोणत्या ना कोणत्यातरी मदत कार्यात त्यांना गुंतवून ठेवण्यात येईल याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. म्हणून घटनास्थळी मदतकार्य करणाऱ्या संस्था/व्यक्ती.त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या प्रत्येक कामात स्वयंसहाय्य करण्यास उत्तेजन देतील.

- मृतांची ओळख पटविण्यास मृतदेहांची विल्हेवाट लागण्यास आणि नुकसान पोहोचलेल्या अन्नधान्य साठ्याची विल्हेवाट लावण्यास मदत करण्यास उत्तेजन देतील.
- साधनसामुग्री वाहतुकीसाठी चढविणे, उतरविणे, साधनसामुग्रीचे वाटप, तात्पुरते बांधकाम, अन्नवाटप इत्यादींसारख्या कामात श्रमदान करण्यास उत्तेजन देतील.
- हानी आणि नुकसान यांचे अभिलेख अद्ययावत करण्यासाठी त्यांचे सहाय्य मिळवितील.
- कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी त्यांचे सहाय्य मिळवतील.
- स्वच्छतेसंबंधातील आवश्यक तो दर्जा ठेवण्याच्या आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या कामात त्यांचे सहाय्य मिळवितील.
- मानसिक स्वास्थ्य सांभाळण्यासाठी सांस्कृतिक व करमणुकीच्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देतील.

# अहवालविषयक नमुने :

# भाग १

९.१ सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यावरील एकत्रित अहवाल.

९.२ पालिका उपआयुक्त (क्षेत्र) यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल.

९.३ पोलिस दलासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल.

९.४ सहाय्यक पोलिस आयुक्त (वाहतूक) यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल.

९.५ अग्निशमन दलासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल.

९.६ वैद्यकीय सहाय्य विषयक कामांसाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल.

९.७ रेल्वेस्थानक प्रबंधक यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल.

९.८ नवी मुंबई महानगरपालिका परिवहन (एनएमएटी/बीईएसटी) यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल.

## ९. अहवालविषयक नमुने :

संस्थीय स्वरूपाच्या व्यवस्था, अहवालविषयक नमुन्यांद्वारे त्या कार्यान्वित केल्याशिवाय प्रभावी ठरत नाहीत. अशा साधनांमुळे कामाची दिशा निश्चित होते आणि त्यातील माहितीचा साधनस्त्रोत या माहितीला अधिकृतता प्राप्त करून देतात. विविध अंमलबजावणी विभागांसाठी अहवालविषयक नमुने तयार करण्यात आले आहेत. आपत्तीचे स्वरूप आणि व्याप्ती यानुसार हे संकटकालीन कार्य केंद्र/नवी मुंबई नियंत्रण कक्ष यांच्याकडून एकत्रित केले जातील आणि मानवीय आयुक्त व पालिका उपआयुक्त (अतिक्रमणे) यांच्याकडे पाठवले जातील. क्षेत्रीय परिस्थितीचे संनियंत्रण करण्यासाठी देखील हे नमुने उपयुक्त ठरतील.

### ९.१ सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही एकत्रित अहवाल -

पालिका उप आयुक्त (अतिक्रमणे) हे सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यावरील एकत्रित अहवाल सातत्याने माननीय आयुक्त यांच्याकडे पाठवतील.

## माहितीसंबंधातील बाब तपशील आणि अभिप्राय

(१) घटनेचे स्वरूप

(२) बाधित ठिकाणांच्या संख्येचा अंदाज आणि या ठिकाणांची नावे.

(३) परिणामाचे सर्वसाधारण निर्धारण

- अडकून पडलेल्या/बाधित झालेल्या अंदाजित व्यक्ती
- पुढील ठिकाणातून स्थलांतर करण्याची आवश्यकता असलेल्या व्यक्तींची संख्या
- मृत व्यक्तींची संख्या
- जखमी व्यक्तींची संख्या
- नुकसान पोहोचलेली घरे, बांधकामे, क्षेत्रे यांची अंदाजित संख्या

(४) पायाभूत सोयींचे झालेले नुकसान -

- रस्ते वाहतूक
- वीज पुरवठा
- पाणी पुरवठा
- दूरसंचार
- जलवाहिन्या

(५) करण्यात आलेली कार्यवाही

(अ) संपर्क साधण्यात आलेल्या यंत्रणा -

- अग्निशमन दल
- पोलिस
- बीईएसटी
- एनएमएमटी (नवी मुंबई महानगरपालिका परिवहन)
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
- नागरी संरक्षण व गृहरक्षक दल
- जिल्हा नियंत्रण कक्ष
- रेल्वे स्थानक
- हवामानशास्त्र विभाग, कुलाबा
- शासकीय, रेल्वे आणि नवी मुंबईचे रूग्णालय

(६) पुरविण्यात आलेले तातडीचे सहाय्य -

(अ) अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था

- नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसगाड्यांची संख्या क्षमतेसह.
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांची संख्या क्षमतेसह.
- खाजगी बसगाड्यांची संख्या क्षमतेसह

(ब) पुढील ठिकाणी अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी अद्याप वाहतूक व्यवस्था करावयाची आहे.

(क) चालू असलेले / पूर्ण झालेले बचाव कार्य

(ड) पुढील ठिकाणातून स्थलांतर करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या

(इ) पुढील ठिकाणी तातडीने पाणी व अन्न पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली (ठिकाणे व संख्या)

- रेल्वे स्थानके
- बस स्थानके
- तात्पुरते निवारे
- घटनास्थळ

(फ) घटनास्थळी सहाय्य करीत असलेल्या अशासकीय संघटनांची नावे

(७) कार्यान्वित केलेली सार्वजनिक माहिती यंत्रणा -

- दूरदर्शन
- आकाशवाणी
- केबल टी.व्ही.
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारातील जनसंबोधन यंत्रणा.
- नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेच्या आगारातील जनसंबोधन यंत्रणा.
- पुढील ठिकाणी वाहतूक व्यवस्थापनासाठी लावण्यात आलेले माहितीपत्रक
- तात्काळ आवश्यक असलेल्या बाबी

  (१) शोध आणि बचाव कार्य यासाठी सहाय्य

  (२) अन्न

  (३) मनुष्यबळ

नाव :

पदनाम :

दिनांक :

सही :

## ९.२ पालिका उप आयुक्त (परिमंडळ) यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील अहवाल सातत्याने पालिका उपआयुक्त (अतिक्रमणे) यांच्याकडे पाठवतील. माहिती संबंधातील बाब तपशील आणि अभिप्राय

(१) घटनेचे स्वरूप

(२) बाधित ठिकाणांच्या संख्येचा अंदाज आणि या ठिकाणांची नावे

(३) परिणामाचे सर्वसाधारण निर्धारण

- अडकून पडलेल्या / बाधित असलेल्या अंदाजित व्यक्ती
- पुढील ठिकाणांहून स्थलांतर करण्याची आवश्यकता असलेल्या व्यक्तींची संख्या
- मृत व्यक्तींची अंदाजित संख्या
- जखमी व्यक्तींची अंदाजित संख्या
- नुकसान पोहोचलेली घरे, बांधकामे, क्षेत्रे यांची अंदाजित संख्या

(४) पायाभूत सोयींचे झालेले नुकसान

- रस्ते वाहतूक
- वीज पुरवठा
- पाणी पुरवठा
- दूरसंचार
- जलवाहिन्या

(५) करण्यात आलेली कार्यवाही

(अ) संपर्क साधण्यात आलेल्या यंत्रणा

- अग्निशमन दल
- पोलिस दल
- बीईएसटी
- एनएमएमटी (नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवा)
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
- नागरी संरक्षण व गृहरक्षक दल
- जिल्हा नियंत्रण कक्ष
- रेल्वे स्थानक
- हवामानशास्त्र विभाग, कुलाबा
- शासकीय, रेल्वे आणि नवी मुंबईची रूग्णालये

(६) पुरविण्यात आलेले तातडीचे सहाय्य

(अ) अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था

- नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसगाड्यांची संख्या क्षमतेसह
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांची संख्या क्षमतेसह
- बीईएसटीच्या बसगाड्यांची संख्या क्षमतेसह
- खाजगी बसगाड्यांची संख्या क्षमतेसह

(ब) पुढील ठिकाणी अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी अद्याप वाहतूक व्यवस्था करावयाची आहे.

(क) चालू असलेले/पूर्ण झालेले बचाव कार्य

(ड) पुढील ठिकाणातून स्थलांतर करण्यात आलेल्या व्यक्तींच्या संख्या

(इ) पुढील ठिकाणी तातडीने पाणी व अन्न पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली (ठिकाणे व संख्या)

- रेल्वे स्थानके
- बस स्थानके
- तात्पुरते निवारे
- घटनास्थळ

(फ) घटनास्थळी सहाय्य करीत असलेल्या अशासकीय संघटनांची नावे.

(७) कार्यान्वित केलेली सार्वजनिक माहिती यंत्रणा -

- दूरदर्शन
- आकाशवाणी
- टी.व्ही.
- केबल टी.व्ही.
- महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या आगारातील जनसंबोधन यंत्रणा
- नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेच्या आगारातील जनसंबोधन यंत्रणा
- पुढील ठिकाणी वाहतूक व्यवस्थापनासाठी लावण्यात आलेले माहिती फलक.

(८) तात्काळ आवश्यक असलेल्या बाबी :

- शोध व बचाव कार्य यासाठी सहाय्य
- अन्न
- पाणी
- मनुष्यबळ

नाव : पदनाम :

दिनांक सही :

## ९.३ पोलिस दलासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल :

**पोलिस नियंत्रण कक्ष पोलिस उप आयुक्त परिमंडळ १ हे सद्यस्थिती व करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधीचा अहवाल सातत्याने पालिका उप आयुक्त (अतिक्रमणे), नवी मुंबई महानगरपालिका यांच्याकडे पाठवतील.**

**माहिती संबंधातील बाबी तपशील आणि अभिप्राय**

(१) घटनेचे स्वरूप

(२) बाधित झालेल्या ठिकाणांच्या संख्येचा अंदाज आणि या ठिकाणांची नावे

(३) परिणामाचे सर्वसाधारण निर्धारण :

- मृत व्यक्तींची अंदाजित संख्या
- जखमी व्यक्तींची अंदाजित संख्या
- वाहतुकीत अडथळा आलेल्या/वाहतुकीची दाटी झालेल्या रस्त्यांची नावे

(४) करण्यात आलेली कार्यवाही संपर्क साधण्यात आलेल्या यंत्रणा

- अग्निशमन दल
- पोलिस दल
- बीईएसटी
- एनएमएमटी (नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवा)
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
- नागरी संरक्षण व गृहरक्षक दल
- जिल्हा नियंत्रण कक्ष
- हार्बर रेल्वे
- शासकीय, रेल्वे आणि नवी मुंबईचे रूग्णालय

(५) पुरविण्यात आलेले तातडीचे सहाय्य :

(अ) अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था :
खाजगी बसगाड्यांच्या क्षमतेसह संख्या,पोलिस दलाच्या वाहनांची संख्या

(ब) चालू असलेले / पूर्ण झालेले बचाव कार्य

(क) वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेल्या रस्त्यांची नावे

(ड) सेवेत लावलेल्या टोईंग वाहनांची /क्रेन्सची संख्या

(६) कार्यान्वित करण्यात आलेल्या सार्वजनिक माहिती यंत्रणा

(अ) दूरदर्शन

(ब) आकाशवाणी

(क) केबल टी.व्ही.

(ड) पुढील ठिकाणी वाहतूक व्यवस्थापनासाठी लावण्यात आलेले माहितीपत्रक

(७) तात्काळ आवश्यक असलेल्या बाबी शोध व बचावकार्य यासाठी सहाय्य रूग्णवाहिका मनुष्यबळ

नाव : पदनाम :

दिनांक : सही :

**९.४ सहाय्यक पोलिस आयुक्त (वाहतूक) यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील अहवाल सहायक पोलिस आयुक्त (वाहतूक) हे सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील अहवाल सातत्याने पालिका उपआयुक्त (अतिक्रमणे), नवी मुंबई महानगरपालिका यांना सादर करतील.**

**माहिती संबंधातील बाबी तपशील**

**आणि अभिप्राय**

(१) घटनेचे स्वरूप

(२) बाधित झालेल्या ठिकाणांच्या संख्येचा अंदाज आणि या ठिकाणांची नावे

(३) परिणामाचे सर्वसाधारण निर्धारण :

- मृत व्यक्तींची अंदाजित संख्या
- जखमी व्यक्तींची अंदाजित संख्या
- वाहतुकीत अडथळा आलेल्या / वाहतुकीची दाटी झालेल्या रस्त्यांची नावे

(४) करण्यात आलेली कार्यवाही - संपर्क साधण्यात आलेल्या यंत्रणा

- अग्निशमन दल
- पोलिस दल
- बीईएसटी
- एनएमएमटी (नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवा)
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

- नागरी संरक्षण व गृहरक्षक दल
- जिल्हा नियंत्रण कक्ष
- हार्बर रेल्वे
- शासकीय, रेल्वे, नवी मुंबईचे रूग्णालय

(५) पुरविण्यात आलेले तातडीचे सहाय्य :

(अ) अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था खाजगी बसगाड्यांच्या क्षमतेसह.पोलिस दलाच्या वाहनांची संख्या

(ब) चालू असलेले/पूर्ण झालेले बचाव कार्य

(क) सेवेत आलेल्या टोईंग वाहनांची / क्रेन्सची संख्या

(६) कार्यान्वित करण्यात आलेली सार्वजनिक माहिती यंत्रणा :

(अ) दूरदर्शन

(ब) आकाशवाणी

(क) केबल टी.व्ही.

(ड) पुढील ठिकाणी वाहतूक व्यवस्थापनासाठी लावण्यात आलेले माहितीफलक

(७) तात्काळ आवश्यक असलेल्या बाबी शोध आणि बचावकार्य यासाठी सहाय्य रूग्णवाहिका मनुष्यबळ

नाव : पदनाम :

दिनांक : सही :

## ९.५ अग्निशमन दल अधिकाऱ्यांसाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील अहवाल अग्निशमन दल अधिकारी हे सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील अहवाल सातत्याने पालिका उप आयुक्त (अतिक्रमणे), नवी मुंबई महानगरपालिका यांना सादर करतील.माहिती संबंधातील बाबी तपशील आणि अभिप्राय

(१) घटनेचे स्वरूप

(२) बाधित झालेल्या ठिकाणांच्या संख्येचा अंदाज आणि या ठिकाणांची नावे

(३) परिणामाचे सर्वसाधारण निर्धारण :

पुढील ठिकाणातून स्थलांतर करण्याची आवश्यकता असलेल्या व्यक्तींची संख्या

- मृत व्यक्तींची अंदाजित संख्या
- जखमी व्यक्तींची अंदाजित संख्या
- नुकसान पोहोचलेली घरे/बांधकामे/क्षेत्रे यांची अंदाजित संख्या

(४) पायाभूत सोयींचे झालेले नुकसान : वीजपुरवठा पाणीपुरवठा

(५) करण्यात आलेली कार्यवाही - संपर्क साधण्यात आलेल्या यंत्रणा

- नवी मुंबई महानगरपालिका
- पोलिस दल
- बीईएसटी
- नवी मुंबई महानगर पालिका परिवहन सेवा
- नागरी संरक्षण व गृहरक्षक दल
- शासकीय, रेल्वे, नवी मुंबईचे रूग्णालय

(६) पुरविण्यात आलेले तातडीचे सहाय्य :

(अ) चालू असलेले/पूर्ण झालेले बचाव कार्य

(७) कामावर लावण्यात आलेल्या आगीच्या बंबांची संख्या

(अ) चालू असलेले/पूर्ण झालेले बचावकार्य

(८) पुझील ठिकाणांतून स्थलांतर करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या

(९) सेवेत लावलेल्या रूग्णवाहिकांची संख्या

(१०) कार्यान्वित करण्यात आलेली सार्वजनिक माहिती यंत्रणा :

घटनास्थळी स्थापित करण्यात आलेली माहिती केंद्रे

(११) तात्काळ आवश्यक असलेल्या बाबी शोध आणि बचावकार्य यासाठी सहाय्य रूग्णवाहिका मनुष्यबळ

नाव : पदनाम :

दिनांक : सही :

**९.६ वैद्यकीय सहाय्याच्या कामांसाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील अहवाल नवी मुंबई वैद्यकीय सहाय्य नियंत्रण कक्ष वैद्यकीय सहाय्य पुरवइण्याच्या कामांच्या संदर्भात सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील अहवाल सातत्याने पालिका उपआयुक्त (अतिक्रमणे), नवी मुंबई महानगरपालिका यांना सादर करतील. माहिती संबंधातील बाबी तपशील आणि अभिप्राय**

(१) घटनेचे स्वरूप

(२) बाधित झालेल्या ठिकाणांच्या संख्येचा अंदाज आणि या ठिकाणांची नावे

(३) परिणामाचे सर्वसाधारण निर्धारण :

- बाधित झालेल्या व्यक्तींची अंदाजित संख्या
- मृत व्यक्तींची अंदाजित संख्या
- जखमी व्यक्तींची अंदाजित संख्या

(४) पायाभूत सोयींचे झालेले नुकसान :

(अ) रूग्णालये

(ब) वीजपुरवठा

(क) इतर

(५) करण्यात आलेली कार्यवाही - संपर्क साधण्यात आलेल्या यंत्रणा

- नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्ष
- अग्निशमन दल नियंत्रण कक्ष
- पोलिस नियंत्रण कक्ष
- रेल्वे रूग्णालयाचा नियंत्रण कक्ष
- शासकीय, रेल्वे, नवी मुंबईचे रूग्णालय

(६) पुरविण्यात आलेले तातडीचे सहाय्य :

- डॉक्टरांची संख्या
- पॅरामेडिकोज्‌ची संख्या
- उपचार करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या
- रूग्णवाहिकांची संख्या

(७) रूग्णालयात आलेल्या व्यक्ती

- रूग्णालयांची नावे
- आलेल्या व्यक्तींची संख्या
- बाह्यरूग्णोपचार विभागात उपाचार करण्यात आलेल्या व्यक्ती
- दाखल करून घेण्यात आलेल्या व्यक्ती
- दाखल करून घेण्यापूर्वी झालेले मृत्यू
- दाखल केल्यांनतर झालेले मृत्यू

(८) सेवेत लावण्यात आलेल्या रूग्णवाहिकांची संख्या

(९) करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक योजना

(१०) कार्यान्वित करण्यात आलेली सार्वजनिक माहिती यंत्रणा :

(अ) दूरदर्शन

(ब) आकाशवाणी

(क) केबल टी.व्ही.

(ड) पुढील ठिकाणी वाहतूक व्यवस्थापनासाठी लावण्यात आलेले माहितीफलक

(११) तात्काळ आवश्यक असलेल्या बाबी

(अ) विशेष औषधीद्रव्ये/औषधे

नाव : पदनाम :

दिनांक : सही :

## ९.७ रेल्वे स्थानक प्रबंधक यांच्यासाठी सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील

अहवाल रेल्वेस्थानक प्रबंधक सद्यस्थिती आणि करण्यात आलेली कार्यवाही यासंबंधातील अहवाल

सातत्याने पालिका उपआयुक्त (अतिक्रमणे), नवी मुंबई महानगरपालिका यांना सादर करतील. माहिती संबंधातील बाबी तपशील आणि अभिप्राय

(१) घटनेचे स्वरूप

(२) बाधित झालेल्या ठिकाणांच्या संख्येचा अंदाज आणि या ठिकाणांची नावे

(३) परिणामाचे सर्वसाधारण निर्धारण :

- अडकून पडलेल्या/बाधित झालेल्या व्यक्तींची अंदाजित संख्या
- मृत व्यक्तींची अंदाजित संख्या (केवळ रेल्वे अपघातांच्या बाबतीत)
- रेल्वे सेवा (हार्बर लाईन) पूर्णत: सुरू आहे/पूर्णत: बंद पडलेली आहे/ ................ पासून ................ पर्यंतच्या भागात बंद पडलेली आहे.

(४) बाहेरगावची रेल्वे वाहतूक

- येणाऱ्या रेल्वेगाड्या पुढील स्थानकांवर थांबवून ठेवण्यात आल्या आहेत.
- रद्द करण्यात आलेल्या बाहेरगावी जाणाऱ्या रेल्वे गाड्यांची संख्या

(५) पायाभूत सोयींचे झालेले नुकसान :

(अ) रेल्वेचा वीजपुरवठा

(ब) सिग्नल यंत्रणा

(क) रेल्वे रूळ

(६) करण्यात आलेली कार्यवाही - संपर्क साधण्यात आलेल्या यंत्रणा

- नवी मुंबई महानगरपालिका

- पोलिस दल
- अग्निशमन दल
- बीईएसटी
- एनएमएमटी (नवी मुंबई महानगर पालिका परिवहन सेवा)
- हवामानशास्त्र विभाग, कुलाबा

(अ) अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी तातडीने अन्न व पाणीपुरवठा करण्यासाठी केलेल्या सुविधा

(ब) चालविण्यात येणाऱ्या जादा रेल्वे गाड्यांची संख्या

(७) कार्यान्वित करण्यात आलेली सार्वजनिक माहिती यंत्रणा :

- दूरदर्शन
- आकाशवाणी
- केबल टी.व्ही.
- रेल्वे स्थानकांवरील जनसंबोधन यंत्रणा

(८) तात्काळ आवश्यक असलेल्या बाबी शोध आणि बचावकार्य यासाठी सहाय्य रूग्णवाहिका अग्निशमन दल मनुष्यबळ

नाव : पदनाम :

दिनांक : सही :

## ९.८ बीईसटी / एनएमएमटी यांच्यासाठी सद्‍यस्थिती आणि  करण्यात आलेली कार्यावहीचा संक्षीप्त अहवाल बीईसटी / एनएमएमटी यांच्यासाठी सद्‍यस्थिती आणि  करण्यात आलेली कार्यावहीचा संक्षीप्त अहवाल सात्तात्याने उपआयुक्त अतिक्रमण यांच्याकडे पाठवतील. माहिती संबंधातील बाबी तपशील आणि अभिप्राय

(१) घटनेचे स्वरूप

(२) बाधित झालेल्या प्रवाशीमार्गाचा  अदांजीत संख्या आणि या प्रवास मार्गाची नांवे

(३) परिणामाचे सर्वसाधारण निर्धारण :

- अडकून पडलेल्या/बाधित झालेल्या व्यक्तींची अंदाजित संख्या
- मृत व्यक्तींची अंदाजित संख्या (केवळ अपघातांच्या बाबतीत)
  वाहतूकीस अडथळा आलेल्या / वाहतूकीची दाटी झालेल्या रस्त्यांची नावे

(४) करण्यात आलेली कार्यवाही

(५) पायाभूत सोयींचे झालेले नुकसान :

(अ) रेल्वेचा वीजपुरवठा

(ब) सिग्नल यंत्रणा

(क) रेल्वे रूळ

(६) करण्यात आलेली कार्यवाही - संपर्क साधण्यात आलेल्या यंत्रणा

- नवी मुंबई महानगरपालिका
- पोलिस दल
- अग्निशमन दल
- बीईएसटी
- एनएमएमटी / बीईएसटी
- हवामानशास्त्र विभाग, कुलाबा

(अ) अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी तातडीने वाहतूक करण्यासाठी केलेल्या सुविधा

(ब) चालविण्यात येणाऱ्या जादा बस गाड्यांची संख्या (क्षमतेसह) एनएमएमटी बीईएसटी / म.रा.प.म.

(७) कार्यान्वित करण्यात आलेली सार्वजनिक माहिती यंत्रणा :

- दूरदर्शन
- आकाशवाणी
- केबल टी.व्ही.
- रेल्वे स्थानकांवरील जनसंबोधन यंत्रणा

(८) तात्काळ आवश्यक असलेल्या बाबी शोध आणि बचावकार्य यासाठी सहाय्य रूग्णवाहिका अग्निशमन दल मनुष्यबळ

नाव : पदनाम :

दिनांक : सही :

# सामुहिक शिक्षणांद्वारे योजनेचा प्रसार

## भाग - १०

## १०. सामूहिक शिक्षणांद्वारे योजनेचा प्रसार

आपत्ती व्यवस्थापन कृती योजना प्रभावीपणे अंमलात तिच्या तीन स्थरांवर प्रचार करण्याची आवश्यकता आहे.

केंद्र शासनाचे विभाग बहुभाषिक संस्था, सेनादल यांचे राज्यस्तरीय अधिकारी

नव्या मुंबईतील नगरपालिका प्राधिकरणे जिल्हा प्राधिकरणे शासकीय विभाग अशासकीय संघटना व इतर संस्था

सर्वसाधारण जनतेमध्ये जनप्रचार माध्यमाद्वारे योजनेचा आशय सुनियोजित आणि विषयनिष्ठ स्वरुपाचा जनजागृती कार्यक्रमाद्वारे समजावून सांगण्याची गरज आहे.

योजनेचा प्रचार करण्याची जवाबदारी आयुक्त यांच्याकडे विहित असेल आणि असा प्रचार आपत्ती व्यवस्थापनात सहभागी होणाऱ्या प्रत्येक संस्थेद्वारे आयोजित जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येईल.

जनजागृती कार्यक्रमाचा मोठया प्रमाणात प्रसार होण्यासाठी स्थानिक भाषेत प्रचार माध्यमांचा उपयोग करुन घेण्यात येईल.

जसे वृत्तपत्रे , दूरदर्शन, केबल, रेडिओ, साहित्य,शाळा महाविद्यालय व इतर संस्था यांच्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल. त्याच बरोबर आयुक्त समाज आणि संबधित विभाग यांनी कार्यपध्दतीत कर्मचारी, साधनसाम्रगी आणि आपत्तीनंतरची सुस्थिती हयांची कायम सिध्दता ठेवावी व कृतीचा सराव प्रत्यक्षात आयोजित करुन सुनिश्चित करतील.

# प्रभाग स्तरावरील अनुकृती (रिस्पॉन्स) योजना

# भाग - ११

## ११. प्रभाग स्तरावरील अनुकृती (रिस्पॉन्स) योजना :

११.१ उपायुक्त (परिमंडळ) यांच्या जबाबदाऱ्या

११.२ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर विभाग क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या

११.३ विभाग अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या

११.४ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर सहायक पोलिस उपायुक्त/सहायक पोलिस आयुक्त यांच्या जबाबदाऱ्या

११.५ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर सहायक पोलिस उपायुक्त(वाहतूक) यांच्या जबाबदाऱ्या

११.६ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर अग्निशमन अधिकारी / केंद्र अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या

११.७ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर वैद्यकीय अधिकारी (अपघात) यांच्या जबाबदाऱ्या

११.८ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर रेल्वे स्थानक प्रबंधक यांच्या जबाबदाऱ्या

११.९ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर व्यवस्थापक एनएमएमटी (नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवा/सहाय्यक आगार व्यवस्थापक बीईएसटी) यांच्या जबाबदाऱ्या

११.१० आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे उपकेंद्र अभियंता यांच्या जबाबदाऱ्या

११.११ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर महानगर टेलिफोन निगम लिमिटेड यांच्या क्षेत्र प्रबंधकांच्या जबाबदाऱ्या

११.१२ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी

११.१२ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या

११.१३ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर शिधावाटप अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या

११.१४ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर सिडकोचे महाव्यवस्थापक यांच्या जबाबदाऱ्या

११.१५ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या

११.१६ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर कमांडन्ट आर ए एफ यांच्या जबाबदाऱ्या

११.१७ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर उपनियंत्रक, नागरी संरक्षण यांच्या जबाबदाऱ्या

## ११. प्रभाग स्तरावरील अनुक्रिया (रिस्पॉन्स) योजना :

हा दस्तऐवज नवी मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन योजनेचा एक उपविभाग असून तो विभाग पातळीवर सूक्ष्मस्तरीय आपत्ती व्यवस्थापन कृती योजनेसाठी तयार करण्यात आलेला आहे. जेव्हा आपत्ती विभाग स्तरापुरती स्थान सीमित असेल आणि ती स्थानिकरित्या हाताळता येत असेल तेव्हा विभाग स्तरावरील योजना कार्यान्वित होईल. तथापि आपत्तीची झळ शहराच्या फार मोठ्या भागाला पोहोचेल त्याबाबतीत केवळ शहर स्तरावरच नव्हे तर विशिष्ट विभाग स्तरावरदेखील कामांत समन्वय साधण्याची आवश्यकता असेल. अशा परिस्थितीत बाधित झालेल्या प्रभागांची विभाग स्तरावरील योजना नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापन योजनेबरोबरच कार्यान्वित होईल.

### ११.१ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर पालिका उप आयुक्त (परिमंडळ) नवी मुंबई महानगरपालिका यांच्या जबाबदाऱ्या

आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यावर पालिका उप आयुक्त (परिमंडळ) यांनी पालिका उप आयुक्त (अतिक्रमण), संकटकालीन कार्यकेंद्र आणि नवी मुंबईचे क्षेत्र अधिकारी यांच्याशी कायम संपर्क ठेवावा.

| | |
|---|---|
| पोलिस (कायदा व सुव्यवस्था) | सहायक पोलिस आयुक्त आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक |
| पोलिस (वाहतूक) | विभागीय पोलिस निरीक्षक |
| अग्निशमन दल | केंद्र अधिकारी |
| रेल्वे | स्टेशन मास्टर्स |
| बीईएसटी/एनएमएमटी (वाहतूक) | सहाय्यक आगार व्यवस्थापक |
| नवी मुंबई रूग्णालये | निवासी वैद्यकीय अधिकारी |
| महानगर टेलिफोन निगम लिमिटेड | उपविभागीय अभियंता |
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | उपकेंद्र अभियंता |
| महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | प्रादेशिक अधिकारी |
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | प्रादेशिक अधिकारी |

प्रत्येक उप आयुक्त (परिमंडळ) यांनी पुढील उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सिध्दता ठेवणे आवश्यक असेल.

- विभाग स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करून ती नवी मुंबई महानगरपालिकेच्या पालिका सदस्यांना आणि अशासकीय संघटनांना पुरविणे.
- विभागाचे सर्वेक्षण करणे, वाहन मार्गातील अडथळे दूर करून सर्व परिस्थितीत उंच पातळीवरून निम्न पातळीकडे वाहणाऱ्या पाण्याचे आत येणारे व बाहेर जाणारे प्रवाह मार्ग सीमांकित करणे, भरती-ओहोटीच्या वेळी आणि सर्व प्रतिकूल परिस्थितीत नाल्यातील पाण्याच्या पातळीवर बारकाईने लक्ष ठेवणे, या वाहमार्गांवर दक्षतापूर्वक लक्ष ठेवणे.
- उपआयुक्त (परिमंडळ ) यांनी स्वत: प्रत्यक्ष जागेवर हजर राहून आवश्यक असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी हयांना दूरध्वनी केल्यावर तात्काळ सर्व सबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी कामावर हजर राहावयाचे आहेत. व ओळख पटविण्याकरिता दर्शनी भागावर ओळखपत्र वापरणे बंधनकारक आहे. आदेश झाल्यानंतर ......
- पुढील गोष्टी करून विभाग नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
    - आपत्तीच्या वेळी विभाग नियंत्रण कक्षाचा प्रभारी म्हणून उपअभियांत्याच्या श्रेणीच्या एका पर्यवेक्षकाची नियुक्ती करणे.
    - दूरध्वनीद्वारे सर्व बचावकार्य गट सिध्द करणे.
    - परिमंडळ नियंत्रण कक्षाशी थेट दूरध्वनी संपर्क साधणे.
    - स्वच्छता विभागातील मजूर आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे कर्मचारी यांना कोणतेही आपात्कालीन काम करण्यासाठी तयार ठेवणे.
    - पालिका उप आयुक्त (परिमंडळ) हे क्षेत्रीय कामांविषयी आणि तसेच कर्मचारीवर्ग आणि साधनसामग्री तैनात केल्याविषयी व त्यांची कुमक पाठविल्याविषयी तात्काळ कृती केंद्रास कळवतील आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींविषयीदेखील कळवतील.
    - घटनास्थळी माहिती केंद्र स्थापित करणे.
    - वाहतुकीची खाजगी वाहने, तात्पुरते निवारे अधिगृहीत करण्याचे काम उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यामार्फत करता येईल.

## ११.२ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्भल्यानंतर विभागीय क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या

- आपत्ती उद्भवल्यानंतर पालिका आयुक्त (परिमंडळ) आणि विभाग अधिकारी यांच्याशी समन्वय साधणे.
- पुढील कामांचे संनियंत्रण करणे -
    - घरे कोसळण्याच्या आपत्तीच्या वेळी अग्निशमन दलाशी समन्वयसाधुन बचाव कार्य करणे.

- जखमी व्यक्तींना प्राधान्यक्रम देऊन त्यांना रूग्णालयात नेण्याची व्यवस्था करणे.
- मृतदेह रूग्णालयात वाहून नेणे/प्रेतांची विल्हेवाट लावण्याकरिता मदत करणे.
- पूररोधी उपाययोजना करणे
- दगडमातीचे ढिगारे (डबर) हलविणे
- सामानसुमान वाचविण्याची कामे करणे.
- उन्मळून पडलेली झाडे तेथून हलविणे
- नुकसान झालेले रस्ते, पाणी पुरवठा व जलवाहिन्या यांची दुरूस्ती करणे.

## ११.३ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्भवल्यानंतर विभाग अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या :

संबंधित विभाग अधिकारी हे आपत्तीच्या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन योजनेची अंमलबजावणी करणारे अधिकारी असतील. विभाग अधिकारी हा एक अंमलबजावणी करणाऱ्या विविध विभागांच्या क्षेत्रीय कामांमध्ये समन्वय साधण्यास जबाबदार असेल. अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना कार्यक्षमपणे काम करता येता यावे यासाठी त्यांना सहाय्य पुरविण्याची जबाबदारी देखील विभाग अधिकाऱ्यावर असेल. विभाग अधिकारी विभाग योजनेत देण्यात आलेली सर्व माहिती अंमलबजावणी करणाऱ्या विभागच्या अधिकाऱ्यांना पुरवील. विभाग अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचारी वर्गामार्फत पुढील कामे करून घेण्यास प्रत्यक्ष जबाबदार असेल.

- घरे कोसळल्याच्या आपत्तीच्या वेळी अग्निशमन दलाशी समन्वय साधून बचाव कार्य करणे.
- प्राधान्यता देऊन जखमींना रूग्णालयात नेण्याची व्यवस्था करणे.
- मृतदेह रूग्णालयात वाहून नेणे/प्रेतांची विल्हेवाट लावण्याकरिता मदत करणे.
- पुररोधी कामे/दगडमातीचे ढिगारे (डबर) हलविणे
- सामानसुमान वाचविण्याची कामे करणे.
- उन्मळून पडलेली झाडे तेथून हलविणे
- नुकसान पोहोचलेले रस्ते, पाणी पुरवठा व जलवाहिन्या यांची दुरूस्ती करणे.
- अडकून पडलेल्या किंवा बाधित झालेल्या व्यक्तींची नवी मुंबई महानगरपालिकेची वाहने, खाजगी वाहने आणि नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसगाड्यातून वाहतूक/स्थलांतर करणे.

- तातडीने अन्नपाण्याची व्यवस्था करून तात्पुरते निवारे उपलब्ध करून देणे.
- बचाव कार्यावर असलेल्या वाहनांसाठी प्रवेशपत्रिका आणि ओळख पटविणारे स्टिकर्स पुरविणे.
- बचाव कार्य करणारे कर्मचारी तसेच अशासकीय संघटनांतील व्यक्ती यांना प्रवेशपत्रिका आणि ओळखपत्रे पुरविणे.
- प्रभाग अधिकारी, वैद्यकीय अधिकारी (आरोग्य) यांच्यामार्फत पुढील गोष्टींची व्यवस्था करील.
    - प्रतिबंधक औषधे पुरविणे आणि साथरोग रोधी कामे करणे.
    - साथरोगाच्या संबंधात आवश्यक असलेल्या सावधगिरीच्या उपाययोजनांची विशेष माहिती पुरविणे.
- अन्न, पाणी पुरवठा, स्वच्छता आणि प्रेतांची विल्हेवाट यावर देखरेख ठेवणे.

हानी निर्धारणाचे काम विभाग अधिकाऱ्याकडून करण्यात येईल. विभाग अधिकारी आपत्तीनंतरच्या कामांसाठी अशासकीय संघटना आणि खाजगी क्षेत्र यांचे सहाय्य मिळवतील.विभागामध्ये सक्रीय असलेल्या अशासकीय संघटना त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या कामांसह प्रत्येक विभाग योजनेच्या खंड दोनमध्ये दिलेली आहे.

पुढील साधनांसारखी आवश्यक असलेली साधने :

- खोदकाम अवजारे
- चोक क्लियरिंग साधने
- झाडे कापण्याच्या करवती
- पोर्टेबल सर्च लाईट
- बॅटरीज्
- मेगाफोन
- गॅसकटर्स
- जे.सी.बी.
- पोक्लेन
- आर.सी.सी. बीम कटर्स
- जनित्रे
- वाहने आणि तात्पुरते निवारे अधिग्रहीत करण्याच्या कामात क्षेत्रीय अधिकाऱ्यास सहाय्य
- आपत्ती उद्भवल्यानंतर संक्रमण शिबिरांसाठी आवश्यक असलेल्या बाबींचे निर्धारण करणे.
- तात्पुरत्या निवासासाठी संक्रमण शिबिरे आणि मंडप उभारणे.

- अन्नवाटपाची व्यवस्था करणे.
- कपड्यांची व्यवस्था करणे.
- सानुग्रह सहाय्य पुरविणे.
- संक्रमण शिबिरांसाठी असलेली साधनसामुग्री आणि मनुष्यबळ यासाठी अशासकीय संघटना आणि खाजगी क्षेत्र यांचे सहाय्य मिळविणे. जिल्हा नियंत्रण कक्षास क्षेत्रीय कामे तसेच कर्मचारी आणि साधनसंपत्ती तैनात केल्याविषयी व त्यांची कुमक पाठविल्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जागा /बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.४ आपत्तीच्या इशाऱ्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर पोलिस उपायुक्त/ सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्या जबाबदाऱ्या

सहाय्यक पोलिस आयुक्त, पालिका उप आयुक्त (अतिक्रमण) आणि पालिका उप आयुक्त (परिमंडळ) यांच्याशी समन्वय साधून क्षेत्रातील पुढील कामे करण्यास पोलीस उप आयुक्तांचे कार्यालय जबाबदार असेल

- कायदा व सुव्यवस्था राखणे.
- प्राधान्यक्रम देऊन जखमींना रूग्णालयात हलविणे आणि रूग्णालयाच्या ठिकाणी जमावाला नियंत्रित करण्यासाठी बंदोबस्त पुरविणे.
- नवी मुंबई क्षेत्रात २४ तास कार्यरत असणारा नियंत्रणकक्ष उभारणे.
- बघे लोकांच्या हालचाली आणि वाहने व पादचारी यांची रहदारी निर्बंधित करण्यासाठी क्षेत्राची घेराबंदी करणे.
- बाधित क्षेत्रातील मालमत्ता/मौल्यवान चीजवस्तू यांचे रक्षण करणे.
- बचावकार्य आणि मदतकार्य करणारे कर्मचारी/वाहने सहजरित्या पोहोचण्यासाठी पोचमार्गाची तरतूद करणे.
- योग्य प्रकारे ओळख पटविण्याची, तपास करण्याची कार्यवाही करण्याची आणि प्रेतांची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करणे.
- पोलिसांच्या कार्यपध्दतीप्रमाणे पंचनामे करण्यात येतील.
- विशेषत: रेल्वे स्थानके, बस स्थानके आणि शाळा यांच्याबाहेरील जमावाचे नियंत्रण करणे.
- रेल्वे स्थानके, बस स्थानके आणि शाळा यांच्या नजिक पोलिस बंदोबस्त ठेवणे.
- मोठ्या प्रमाणात फिरती गस्त घालण्याची व्यवस्था करणे.
- अडकून पडलेल्या किंवा बाधा पोहोचलेल्या व्यक्तींची पोलिसदलाच्या किंवा खाजगी वाहनातून वाहतूक किंवा स्थलांतर करण्याची व्यवस्था करणे.
- समाजविघातक प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवणे.

- जनतेला माहिती देण्यासाठी जनसंबोधन यंत्रणेचा वापर करणे. माहिती पुरविण्यासाठी आणि (बाधित क्षेत्रे) मनाई क्षेत्रे म्हणून घोषित करण्यासाठी फलकांचा वापर करता येईल.
- शांतता राखण्यासाठी आणि अफवांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोहल्ला समित्यांचे सहाय्य मिळविणे.
- जनप्रचारमाध्यमे आणि जनता यांना माहिती पुरविण्यासाठी माहिती केंद्र.
- पोलिस नियंत्रण कक्षास, क्षेत्रातील कामांविषयी तसेच कर्मचारी वर्ग व सामग्री तैनात करण्यात आल्याविषयी व त्यांची कुमक पाठविण्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.५ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर सहायक पोलिस आयुक्त (वाहतूक) यांच्या जबाबदाऱ्या :

सहाय्यक पोलिस आयुक्त (वाहतूक) हे पालिका उप आयुक्त (परिमंडळ), विभागीय क्षेत्रीय अधिकारी व विभाग अधिकारी यांच्याशी समन्वय साधून पुढील कामे करण्यास जबाबदार असेल.

- नवी मुंबई क्षेत्रात २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- वाहतुकीचे नियंत्रण व संनियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- विशेषत: रेल्वे स्थानके, बस स्थानके आणि शाळा या ठिकाणी वाढत्या प्रमाणात गस्त घालणे.
- आवश्यक असेल त्याप्रमाणे व तेव्हा वाहतूक पर्यायी मार्गांवर वळविणे.
- विविध मार्गांवरील वाहतुकीच्या स्थितीविषयी आणि विशेषत: मोठ्या प्रमाणातील वाहतूक किंवा कोंडी झालेले रस्ते याविषयी माहिती पुरविणे.
- अपेक्षित मार्गांवर जादा बसगाड्या तैनात करण्याची व्यवस्था करण्याकरिता एनएमएमटी/बीईएसटी यांच्याशी समन्वय साधणे.
- टोईंग क्रेन्स मिळविणे आणि अडकून पडलेली/नादुरूस्त झालेली किंवा रहदारीस अडथळा करणारी वाहने ओढून अन्यत्र नेणे.
- जनतेला माहिती पुरविण्यासाठी व मार्गदर्शनासाठी जनसंबोधन यंत्रणेचा वापर करणे.
- वाहतुकीच्या स्थिती संबंधात माहिती पुरविण्यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी नामफलक आणि माहिती फलक उभारणे.
- वाहतूक व्यवस्थापनासाठी आरएसपी, एनसीसी, एनएसएस अशा शासकीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था यांचे सहाय्य मिळविणे.
- अडकून पडलेल्या किंवा बाधित झालेल्या व्यक्तींची पोलिस दलाच्या किंवा खाजगी वाहनातून वाहतूक करण्याची/स्थलांतर करण्याची व्यवस्था करणे व त्यात समन्वय साधणे.

- वाहतूक नियंत्रण कक्षास, क्षेत्रातील कामाविषयी तसेच कर्मचारी वर्ग आणि साधनसामुग्री तैनात करण्यात आल्याविषयी आणि त्यांची कुमक पाठविण्यात आल्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.६ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर अग्निशमन अधिकारी/केंद्र अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या :

अग्निशमन अधिकारी हा पालिका उप आयुक्त (अतिक्रमणे), पालिका उप आयुक्त (परिमंडळ १/२) नवी मुंबई महानगरपालिका आणि विभाग अधिकारी यांच्याशी समन्वय साधून पुढील क्षेत्रीय कामे करण्यास जबाबदार असेल.

- बाधित क्षेत्रातील अग्निशमनाची कामे
- बचावकार्य
- प्राधान्यक्रम देऊन जखमींना रूग्णालयात हलविणे.
- बाधित क्षेत्रांतून व्यक्तींना अन्यत्र स्थलांतरित करणे.
- आपत्तीच्या ठिकाणी विद्युत यंत्रसंच किंवा वीजपुरवठा यांच्या सुरक्षिततेची व्यवस्था करणे.
- झाडे उन्मळून पडल्यामुळे बंद झालेले रस्ते किंवा पायवाटा खुल्या करणे.
- सामानसुमान वाचविणे.
- घरे कोसळण्याच्या आपत्तीत बचाव कार्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेशी समन्वय साधणे.
- अग्निशमन दल नियंत्रण कक्षास, क्षेत्रीय कामांविषयी तसेच कर्मचारी वर्ग आणि साधनसामुग्री तैनात करण्यात आल्याविषयी आणि त्यांची कुमक पाठविण्यात आल्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.७ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर वैद्यकीय अधिकारी (अपघात) यांच्या जबाबदाऱ्या :

वैद्यकीय अधिकारी (अपघात) हे उप आयुक्त (अतिक्रमणे) यांच्याशी समन्वय साधून पुढील क्षेत्रीय कामे करण्यास जबाबदार असतील.

- २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- गंभीररित्या जखमी झालेल्या व्यक्तींवर रूग्णालयात तातडीने उपचार करण्याची व्यवस्था करणे.
- घटनास्थळी जखमींवर टॅगिंग आणि ट्रायेज करून उपचार करण्याची आणि जखमींना तेथून हलविण्याची व्यवस्था करणे.

- तातडीने औषधे व प्रथमोपचार पुरविणे.
- शवपरीक्षा आणि प्रेतांची विल्हेवाट
- रूग्णांना दाखल करण्यासाठी टॅगिंग आणि ट्रायेजसाठी रूग्णालयात एक क्षेत्र सीमांकित करणे.
- रूग्णालयामध्ये किंवा घटनास्थळी आवश्यक असल्यास पोजिशन सेंटर स्थापित करणे.
- तातडीने रक्ताचा पुरवठा व्हावा म्हणून रक्तपेढ्यांशी समन्वय साधणे.
- रूग्णालयामध्ये माहिती केंद्र स्थापित करणे.

संकटकालीन कार्यकेंद्रास, क्षेत्रीय कामांविषयी तसेच कर्मचारी वर्ग आणि सामुग्री तैनात करण्यात आल्याविषयी व त्यांची कुमक पाठविण्यात आल्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.८ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर रेल्वे स्थानक प्रबंधकाच्या जबाबदाऱ्या

रेल्वे स्थानक प्रबंधक हे, विभाग अधिकाऱ्याशी समन्वय साधून पुढील क्षेत्रीय कामे करण्याची व्यवस्था करतील.

- नवी मुंबई क्षेत्रात २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- रेल्वे पोलिसांमार्फत जमावाचे नियंत्रण
- रेल्वे वाहतुकीसंबंधात जनसंबोधन यंत्रणेद्वारे सातत्याने अद्ययावत माहिती पुरविणे.
- रेल्वे प्रवाशांसाठी नवी मुंबई महानगरपालिकेने सुरू केलेल्या तात्पुरत्या निवाऱ्याच्या ठिकाणांची माहिती पुरविणे.
- रेल्वे स्थानकावर प्रवाशांना तातडीने अन्न व पाणी पुरवठा करण्यासारख्या सोयींची तरतूद करणे.
- रेल्वे रूळ व मार्ग यावरील पाण्याच्या पातळीवर बारकाईने लक्ष ठेवणे आणि त्याबाबत संकटकाळी कार्यकेंद्रास वरचेवर कळविणे.
- रेल्वेमार्गांवर पूरप्रवणक्षेत्रांच्या ठिकाणी तैनात करण्यात आलेल्या अभियांत्रिक शाखेच्या कर्मचारीवर्गाशी समन्वय साधणे.
- प्रवाशांसंबंधातील माहिती आणि पर्यायी वाहतूक व्यवस्था या संबंधात पालिका उप आयुक्त (परिमंडळ) आणि विभाग अधिकारी यांच्याशी समन्वय साधणे आणि संकटकालीन कार्यकेंद्रावर वरचेवर माहिती पुरविणे.
- रेल्वे अपघातांच्या बाबतीत :
    - बचावकार्य आणि स्थलांतर
    - जखमींना रूग्णालयात हलविणे.

- रेल्वे रूग्णालये नवी मुंबई महानगरपालिकेची रूग्णालये आणि शासकीय रूग्णालये यांच्याशी समन्वय साधणे.
- बाहेरगावच्या प्रवाशांसाठी करण्यात आलेल्या प्रवासाच्या पर्यायी व्यवस्थांविषयी माहिती पुरविणे आणि अशा सुविधा पुरविणे.
- संकटकालीन कार्यकेंद्रास, क्षेत्रीय कामांविषयी तसेच कर्मचारी वर्ग आणि साधनसामुग्री तैनात करण्याविषयी आणि त्यांची कुमक पाठविण्यात आल्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.९ आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व्यवस्थापक एनएमएमटी/सहायक आगार व्यवस्थापक, बीईएसटी यांच्या जबाबदाऱ्या

आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात व्यवस्थापक एनएमएमटी/ सहायक आगार व्यवस्थापक, बीईएसटी यांच्या जबाबदाऱ्या

- नवी मुंबई क्षेत्रात २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- आगारांमध्ये डिझेलचा पुरेसा साठा करून ठेवणे.
- तैनात करण्यासाठी राखीव बसगाड्या तयार ठेवणे.

**आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याच्या पुढील जबाबदाऱ्या असतील.**

- वाहतुकीची स्थिती आणि प्रवाशांची माहिती या संबंधातील माहितीसाठी रेल्वे स्टेशन मास्तर आणि सहायक पोलिस आयुक्त (वाहतूक) यांच्याशी समन्वय साधणे.
- अडकून पडलेल्या प्रवाशांची वाहतूक व्यवस्था करण्याकरिता एनएमएमटी/ बीईएसटी/केडीएमटी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्याशी समन्वय साधणे.
- प्रवाशांची वाहतूक सुरळीत करण्यासाठी निर्वाचित मार्गांवर जादा बसगाड्या तैनात करणे.
- आवश्यक असेल तर आणि तेव्हा मार्गात बदल करणे.
- बसगाड्या रद्द करणे, मार्गातील बदल, बसगाड्यांना होणारा विलंब, नवी मुंबई महानगरपालिकेच्या तात्पुरत्या निवाऱ्याची ठिकाणे या संबंधात बस आगारांमध्ये जनतेला माहिती पुरविणे.
- नवी मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्ष आणि संकटकालीन कार्य केंद्र यांना क्षेत्रीय कामांविषयी तसेच कर्मचारी वर्ग आणि साधनसामुग्री तैनात करण्यात आल्याविषयी व त्यांची कुमक पाठविण्यात आल्याविषयी कळविणे तसेच आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.१० : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्भवल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे उपकेंद्र अभियंता यांच्या जबाबदाऱ्या

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे उपकेंद्र अभियंता हे प्रभाग अधिकाऱ्याशी समन्वय साधून पुढील क्षेत्रीय कामे करण्यास जबाबदार असतील :

- नवी मुंबई क्षेत्रात २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- आवश्यक असेल तर वीज पुरवठा खंडित करणे.
- प्रकाशव्यवस्थेसाठी वीज पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था.
- बाधित क्षेत्र तसेच त्याचा परिसर येथे प्रकाश झोताची तरतूद करणे.
- वीजपुरवठा पूर्ववत करणे.
- दुरूस्तीच्या कामासाठी संकटकालीन पथके तयार ठेवणे.
- नुकसान पोहचलेल्या वीजपुरवठ्याच्या पायाभूत सोयींची दुरूस्ती.
- वीजपुरवठ्यातील बिघाड किंवा शॉर्ट सर्किटच्या घटनांच्या बाबतीत अग्निशमन दलाशी समन्वय साधणे.
- संकटकालीन कार्यकेंद्र आणि संबंधित नियंत्रण कक्ष यांना क्षेत्रीय कामांविषयी तसेच कर्मचारी वर्ग आणि साधनसामुग्री तैनात करण्यात आल्याविषयी आणि त्यांची कुमक पाठविण्यात आल्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.११ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्भवल्यानंतर महानगर टेलिफोन निगमचे क्षेत्र प्रबंधक यांच्या जबाबदाऱ्या

महानगर टेलिफोन निगमचे क्षेत्र प्रबंधक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून पुढील क्षेत्रीय कामे करण्यास जबाबदार असतील.

- नवी मुंबई क्षेत्रात २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- टेलिफोन लाईन्स पूर्ववत करणे.
- दुरूस्तीच्या कामासाठी संकटकालीन पथके तयार ठेवणे.
- दूरसंचारविषयक पायाभूत सोयींची दुरूस्ती.
- कामासंबंधात संकटकालीन कार्यकेंद्रास कळविणे.

मुख्य कार्यालयास क्षेत्रीय कामांविषयी तसेच कर्मचारी वर्ग आणि साधनसामुग्री तैनात करण्यात आल्याविषयी आणि त्यांची कुमक पाठविण्यात आल्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

## ११.१२ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्भवल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता / प्रादेशिक अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता / प्रादेशिक अधिकारी विभाग अधिकाऱ्यांशी समन्वय साधून पुढील क्षेत्रीय कामे करण्यास जबाबदार असतील.

- नवी मुंबई क्षेत्रात २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- आपत्ती उद्‌भवल्यानंतर संक्रमण शिबिरांच्या आवश्यकतांचे निर्धारण करणे.
- वाहने आणि तात्पुरते निवारे अधिग्रहीत करण्यास विभाग अधिकाऱ्यास सहाय्य करणे.
- तात्पुरत्या निवासव्यवस्थेसाठी संक्रमण शिबिरे आणि मंडप उभारणे.
- अन्नवाटपाची व्यवस्था करणे.
- स्वयंपाकासाठी कोरडा शिधा आणि भांडी यांची व्यवस्था करणे.
- कपड्यांची व्यवस्था करणे.
- सानुग्रह सहाय्य देणे.
- पिण्याच्या पाण्याचा साठा असणाऱ्या उद्योगांची मदत मिळविणे आणि आपत्तीच्यावेळी तो बाधित नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करणे.
- आपत्ती व्यवस्थापनात उद्योगांचा सक्रिय सहभाग प्राप्त करणे.

**प्रादेशिक अधिकारी, वैद्यकीय अधिकारी (आरोग्य) यांच्यामार्फत पुढील गोष्टींची व्यवस्था करणे.**

- प्रतिबंधक औषधे आणि साथरोगरोधी कृती.
- संक्रमण शिबिरे, अन्न व पाणी पुरवठा आणि निवारा इत्यादीसाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री आणि मनुष्यबळ प्राप्त करण्याकरिता खाजगी क्षेत्रातील उद्योगांचे सहाय्य मिळविणे.
- संकटकालीन कार्यकेंद्रास क्षेत्रीय कामांविषयी तसेच कर्मचारी वर्ग आणि साधनसामुग्री तैनात करण्यात आल्याविषयी आणि त्यांची कुमक पाठविण्यात आल्याविषयी कळविणे आणि आवश्यक असलेल्या जादा बाबींचे स्वरूप कळविणे.

**११.१३ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा प्रादेशिक अधिकारी विभाग अधिकाऱ्यांशी समन्वय साधून पुढील क्षेत्रीय कामे करण्यास जबाबदार असेल. प्रादेशिक अधिकारी संकटकालीन कार्यकेंद्राशी आणि क्षेत्र अधिकाऱ्याशी कायम संपर्क ठेवील.

- नवी मुंबई क्षेत्रात २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी ताबडतोब आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

**११.१४ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात शिधावाटप अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या.**

- आवश्यक माल, साधनसामुग्री, जीवनावश्यक वस्तू यांची सूची तयार करणे.

आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर पुढील कामे करणे ही संबंधित शिधावाटप अधिकाऱ्याची जबाबदारी असेल.

- आपत्तीच्या वेळी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा व वाटप करण्यासाठी विभाग अधिकाऱ्यांशी समन्वय साधणे.
- संकटकालीन कार्यकेंद्रे आणि क्षेत्र अधिकारी यांच्याशी कायम संपर्क ठेवणे.

**११.१५ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात महाव्यवस्थापक, सिडको यांच्या जबाबदाऱ्या.**

- सिडकोने बांधकाम केलेल्या, मोडकळीस आलेल्या इमारतींचे सर्वेक्षण व माहिती देणे.
- संक्रमण शिबिरे स्थापित करणे.
- सर्व माल व साधनसामुग्री यांची सूची तसेच कंत्राटदार, यंत्रसामुग्री (क्रेन, पोक्लेम, जेसीबी, डंपर्स, टँकर्स इत्यादी सारखी) यांची सूची.
- २४ तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापित करणे.
- कर्मचाऱ्यांची सूची बनविणे (त्यांचे निवासी पत्ते आणि संपर्क दूरध्वनी क्रमांक यासह)
- आपत्ती व्यवस्थापनासाठी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण.

**आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर पुढील कामे करणे ही संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी असेल.**

- उपायुक्त, (परिमंडळ ) आणि शहर अभियंता यांच्याशी समन्वय साधणे.
- उपायुक्त (परिमंडळ ) यांनी मागणी केल्यानुसार मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री पुरविणे.
- बाधित नागरिकांना संक्रमण शिबिरांमध्ये हलविण्याच्या कामात आणि त्यांच्या अन्नपुरवठ्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करण्यास प्रभाग अधिकाऱ्यास सहाय्य करणे.

**११.१६ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या.**

- संकटकाळी उपलब्ध असावीत यासाठी खाजगी बसगाड्या, ट्रक, डम्पर्स, वॉटर टँकर्स, टेम्पो यांची आणि वाहतूक व्यावसायिकांची नावे, पत्ते व संपर्क दूरध्वनी क्रमांक यासह सूची प्राप्त करणे.

**आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा ती उद्‌भवल्यानंतर पुढील कामे करणे ही संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी असेल.**

- पालिका उपायुक्त, (परिमंडळ )यांच्याशी समन्वय साधून आवश्यक असलेल्या वाहनांचे अधिग्रहण करणे.

**११.१७ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर व आपत्तीच्या वेळी सिध्दता आणि अंमलबजावणी यांच्या संबंधात पुढील कामे करणे ही कमांडट आर ए एफ यांची जबाबदारी असेल.**

- बचाव कार्यात प्रभाग अधिकाऱ्यास सहाय्य करणे.
- कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांशी समन्वय साधणे.
- प्राधान्यक्रम देऊन जखमींना रूग्णालयात हलविणे.

**११.१८ : आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर किंवा आपत्ती उद्‌भवल्यानंतर उपनियंत्रक, नागरी संरक्षण यांच्या जबाबदाऱ्या**

आपत्तीचा इशारा किंवा उदभवल्यानंतर पुढील कामे करणे ही संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी असेल.

- बचाव कार्यात विभाग अधिकाऱ्यास सहाय्य करणे.
- कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांशी समन्वय साधणे.
- प्राधान्यक्रम देऊन जखमींना रूग्णालयात हलविणे.

*दिनांक : ३१/५/२०१५*

• संपादन •

**श्री. जे. एन. सिन्नरकर**

**उप आयुक्त (मुख्यालय / आपत्ती व्यवस्थापन)**

**नवी मुंबई महानगरपालिका**

# जाहीर आवाहन

- कृपया कचरा, प्लास्टिकच्या पिशव्या, प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्या गटारांमध्ये टाकू नये.
- समुद्राला भरती असेल त्याच काळात जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्यास शक्यतो नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे.
- पूर्वानुमानासाठी आकाशवाणी, दूरचित्रवाहिन्यांवरील बातम्या तसेच महानगरपालिकेचे आलेले संदेश पडताळून खबरदारीची उपाययोजना करावी. अफवांवर विश्वासू ठेवू नये.
- सखल भागातील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.
- सुरक्षित ठिकाणी स्थलांतर होत असताना कंदील, बॅटरी, खाद्यपदार्थ, पिण्याचे पाणी, कपडे व आवश्यक ती कागदपत्रे जवळ ठेवावीत.
- कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीकडे ओळखपत्र राहील असे पहावे.
- शक्य झाल्यास घरातील सामान घरात उंचावर ठेवावे.
- जनावरांना अधिक सुरक्षित ठिकाणी हलवावे.
- वाहनांची ॲटोमेटिक डोअर लॉकिंग सिस्टीम बंद करावी.
- सरकारी सूचनांचे पालन करुन सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे.
- सुरक्षित ठिकाणी राहून अचूक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करावा.
- विद्युतप्रवाह बंद करावा व उघडया तारांना स्पर्श करु नये.
- अफवा पसरवू नये व अफवांवर विश्वास ठेवू नये.
- क्लोरीनयुक्त अथवा उकळलेले पाणी प्यावे.
- स्वच्छ व सुरक्षित अन्न सेवन करावे.
- साचलेल्या पाण्यात / डबक्यात किटकनाशके शिंपडावीत.
- आपत्कालीन प्रसंगी धीराने व संयमाने आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.
- आपत्ती सर्व्हेक्षण गटाला अचूक माहिती पुरवून सहकार्य करावे.

# नवी मुंबई महानगरपालिका

**टोल फ्री नंबर : १८००२२२३०९/३१०**

| | |
|---|---|
| तात्काळ कृती केंद्र (मुख्यालय) | २७५६७०६० /२७५६७०६१/६२ |
| बेलापूर अग्निशमन केंद्र | २७५७२१११ |
| नेरुळ अग्निशमन केंद्र | २७७०७१०१ |
| वाशी अग्निशमन केंद्र | २७६६०१०१ |
| ऐरोली अग्निशमन केंद्र | २७७९६६०० |
| नियंत्रण कक्ष परि - १, वाशी | २७८९ ४८०० / २७८९ ५९०० |
| नियंत्रण कक्ष परि - २, ऐरोली | २७७९ २४०० / २७७९ ५२०० |
| **विभाग कार्यालय** | |
| बेलापूर | २७५७ ३८२६ / २७५७ ०६१० |
| नेरूळ | २७७० ७६६९ |
| वाशी | २७६५ ५३७० / २७६५ ९७४१ |
| तुर्भे | २७८३ ४०६९ |
| कोपरखैरणे | २७५४ २४०६ / २७५४ २४४९ |
| घणसोली | २७६९ ८१७५ / २७६९ २४८९ |
| ऐरोली | २७७९ २११४ |
| दिघा | ६५२८ ४९६२ / ६५२८ ४९६३ |

कार्यालय : न.मुं.म.पा. मुख्यालय, भुखंड क्रं.१, किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, से. १५ ए, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४.

Narendra Products : 9820 541 754 / 2757 5858